नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर –४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १७९ * * नागपूर * | शनिवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्राग्रलेख

## खरीखरी...

## वा रे झिरवळ!

महाराष्ट्रातील आपले उच्च पदावर विराजमान झालेले लोकप्रतिनिधी किती संकुचित आणि उथळ विचार करतात, याचा प्रत्यय आज आला. आज महाराष्ट्राच्या विधानसभेचे माजी उपसभापती व कार्यकारी सभापती यांनीच हा प्रत्यय आणून दिला. आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करणे, उग्र भूमिका घेणे गैर नाही. पण आपल्या झिरवळ साहेबांनी एका समाजाच्या आरक्षणासाठी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरून उडी मारली. अगदी लहान मुले खेळतात तशी उडी मारली. आपल्या मंत्रालयात कधीकाळी असा प्रकार घडू शकतो. याची कल्पना मंत्रालयातील उच्च पदस्थांना आली असावी. त्यामुळे त्यांनी उड्या किंवा कोलांटउड्या मारणाऱ्यांना मस्त खेळ करता यावेत. तसेच विधानसभेतील लोकांचे मनोरंजन व्हावे, यासाठी तिथे संरक्षक जाळी बांधलेली आहे. त्यामुळे उडी मारली तरी यमाच्या जाळ्यात आपण सापडत नाही, अशी खात्री देता येते. पण ही उडी मारली म्हणजे आपण किती बहाद्दर आहोत. आपल्या मनात अमुक एका समाजाविषयी किती तळमळ आहे. हे दिसून येते आणि त्याचा फायदा आगामी विधानसभेच्या निवडणुकीत मिळू शकतो. असा मनसोक्त आणि पोक्त विचार करून उड्या मारणारे झिरवळ साहेब राजकारणातही इकडे तिकडे उड्या मारण्यात पारंगत आहेत. मोठ्या साहेबांच्या तबेल्यातून उडी मारून छोट्या साहेबांच्या दिखाऊ महालात उडी मारल्यावरही, आपले पद टिकाऊ नाही. हे दिसून आल्यामुळे हा नवा 'उड्यामारू' प्रयोग झिरवळ यांनी केला असावा असे आमच्या अल्पमतीला वाटते. कोणे एके काळी या विधानसभाचे सभापती ह भ प बाळासाहेब भारदे होते. अनेक वर्ष धीर गंभीर प्रवृत्तीचे शेषराव वानखेडेही होते. सत्शील व्यक्तिमत्वाचे बाळासाहेब चौधरी होते. इतरही अनेक महनीय नेत्यांनी या पदाची शोभा वाढवली. मात्र आता झिरवळ साहेबांनी जो प्रयोग केला आहे. तो न्यूटनच्या सिद्धांताला अनुसरून असला तरी, म्हणजे जमिनीकडच्या गुरुत्वाकर्षणामुळे फळ झाडावरून खाली पडते. पण ते जमिनीवर पडते. मात्र झिरवळरुपी फळ सहाव्या मजल्याच्या झाडावरून तर पडले. पण ते जाळीत अडकले. हे जाळे कोळ्यांचे नाही हे त्यांना माहीत होते आणि आपणही मासा नाही हेही त्यांना माहीत होते. त्यामुळे तोळामासा विचारही न करता किंवा अतिशय गंभीर विचार करून आरक्षण या विषयाचे गांभीर्य सपशेल नष्ट केले. इंग्रजांनी एक कमिशन निर्माण करून भारतातील आरक्षणाचा मुद्दा प्रचारात आणला होता. तेव्हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्याही एका समाजाला आरक्षण देण्यास विरोध केला होता. समाजातील ज्या वर्गावर वर्षानुवर्ष अन्याय झालेला असेल, ज्यांना उच्च वर्णीयांनी हीन वागणूक दिली असेल, शिक्षणावर बंदी घातली असेल आणि मंदिर प्रवेशाला विरोध केला असेल त्यांना आणि जे असे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असतील त्यांना आरक्षण द्यावे. असे डॉक्टर आंबेडकरांनी प्रतिपादित केले होते. त्यावेळी महात्मा गांधीजींनी सुद्धा बाबासाहेबांना समर्थन दिले होते. अशा प्रकारे हा आरक्षणाचा विषय जवळपास शंभर वर्षापासून चर्चित असलेला आहे. भारतीय राज्यघटना तयार करताना ज्या ज्या वर्गाला आरक्षण देणे आवश्यक होते. त्या वर्गाला ते आरक्षण देण्यात आले. त्यानंतर मंडल आयोगाने बऱ्याच अन्य घटकांनाही आरक्षणाचा लाभ दिला. आताही आपले शासन अतिशय विचारपूर्वक कायद्यात बसेल. अशा प्रकारे आरक्षणे देण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी जोरदार मागणी करणे, त्याचा पाठपुरावा करणे आणि राजकीय दृष्टीने तसेच कायदेशीर दृष्टीने विचार करून युक्तिवाद करणे हे समजू शकते. पण आपल्या झिरवळ साहेबांनी जो प्रकार केला आहे. ते पाहता त्यांनी जे पद सांभाळले त्या पदाचा हा अपमान आहे, असे आम्हाला वाटते. यात झिरवळ साहेबांच्या मागणीला आमचा विरोध नाही, हे आम्ही विशेष करून नमूद करू इच्छितो. पण त्यांनी ज्या मार्गाचा अवलंब केला त्याला आमचा घोर विरोध आहे. तेवढेच सांगून झिरवळ साहेबांना शीर साष्टांग नमस्कार करतो!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# विधानसभेसाठी महायुती सरकारची साखर पेरणी

# राज्यातील अकृषक कर माफ

**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ४:** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गावठाण जमिनीवरील अकृषिक कर कायमस्वरूपी माफ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत शुक्रवारी घेण्यात आला. कर धारकांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.



विधानसभेची आचारसंहिता येत्या काहीच दिवसांत लागू होण्याची शक्यता आहे. लोकसभेत महायुतीला फटका बसला होता. विधानसभेला त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महायुती सरकारकडून विविध योजनांच्या नावाने साखर पेरणी केली जात आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील गावागावातील गावठाणांमधील जमिनीवरील अकृषक कर कायमस्वरूपी माफ केल्यानंतर आता अकृषक कर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

गावठाणाबाहेर रहिवासी घरांची संख्या वाढू लागली आहे. दुसरीकडे शहरी भागात ही बहूमजली इमारती वाढू लागल्या आहेत. त्यामुळे इमारतींखालील जमिनींचा संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे महायुती सरकारचे म्हणणे आहे. तसेच वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनीवरील अकृषिक कर रद्द करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्यातील दौंड येथे उभारण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय सभागृहासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास राज्य सरकारने मंजूरी दिली.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाप्रमाणेच महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधीकरणातील अध्यक्ष आणि सदस्यांसाठी जाहिरात काढून अर्ज मागवण्यात येतील. नियुक्तीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती असेल. या संदर्भातील शासन निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सांगली जिल्हयातील टेंभू उपसा जलसिंचन योजनेच्या विस्तारित टप्प्याला आमदार अनिल बाबर विस्तारित टेंभू उपसा सिंचन योजना, टप्पा क्रं.६ असे नांव देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संदर्भात या प्रकल्पाच्या भूमिपूजनाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली होती.

**किल्ल्यांवर दारू-ड्रग्स घेतल्यास शिक्षा व दंड**

गड किल्ल्यांवर दारू आणि ड्रग्स सेवन केल्यास आता दोन वर्षे शिक्षा आणि एक लाख रुपये दंड होणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकार तसेच विविध संघटनांच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र, तरी देखील काही नागरिकांकडून या गडकिल्ल्यांवर असे प्रकार घडत असल्याने राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

## अहमदनगर नव्हे, आता अहिल्यानगर : केंद्र सरकारची मंजूरी

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:** अहमदनगर जिल्हा आता अहिल्यानगर या नावाने ओळखला जाणार आहे. अहमदनगरचे नाव बदलण्याची अनेक दिवसांची मागणी होती. केंद्र सरकारने जिल्ह्याचे नाव बदलण्यास मंजूरी दिली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यात आनंदाची लाट पसरली आहे.

महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याविषयीची माहिती दिली आहे. त्यांनी समाज माध्यमावर ट्विट करत केंद्र सरकारचे आभार मानले आहे. औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशीव आणि आता अहमदनगर जिल्ह्याचे अहिल्यानगर नामाकरण झाले आहे.

## कुठला निषेध नोंदवता? राज ठाकरे यांची टीका



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४:** तुम्ही सत्तेशिवाय राहू शकतं नाही, असं म्हणणं शक्य नव्हतं. म्हणून जनतेच्या सेवेला सत्ता हवी, असे म्हणत तुम्ही आणि तुमच्या सरकारने सत्तेच्या जाळ्यात उड्या मारल्या होत्या ना, असा खोचक टोला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्या आंदोलनावर केला आहे.

## पंतप्रधान मोदी आज पोहरादेवीत

बंजारा विरासत नंगारा म्युझियमचे लोकार्पण



**■ महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. ४:** जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या पोहरादेवी येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शनिवार ५ ऑक्टोबर रोजी येणार आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक यवतमाळ-वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्यासह अनेक मंत्री, आमदार, खासदार उपस्थित राहतील. पोहरादेवीत भव्य नंगारा म्युझियमचे लोकार्पण मोदी यांच्या हस्ते होईल.

## संजय राठोड यांच्या गाडीचा अपघात



मंत्री संजय राठोड यांच्या कारला अपघात झाला. अपघात झाला तेव्हा संजय राठोड त्यांच्या कारमध्ये नव्हते. ते दुसऱ्या एका गाडीमधून मागून येत होते.



पोहरादेवी येथून परत येत असताना आपल्या खासगी वाहनाचा आर्णी तालुक्यातील कोपरा गावानजिक अपघात झाला. मी या वाहनातून प्रवास करीत नव्हतो. पोलीस या अपघात प्रकरणी चौकशी करून जो दोषी असेल त्याच्यावर कारवाई करतील, असे सांगत पत्रकार परिषदेत ते म्हणाले, आपण सुखरूप आहोत. अपघात केवळ वाहनाचा झाला, आपला नाही.




## स्वच्छता ही सेवा पंधरवड्याच्या समारोप दिनीही विविध ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमांचे आयोजन

**नवी मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी**

'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यामध्ये सागर किना-यावरील खारफुटीपासून रेल्वेपर्यंत तसेच लहान मंडईपासून अशियातील सर्वात मोठया एपीएमसी मार्केटपर्यंत विविध ठिकाणी व्यापक लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात आल्या. नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केलेल्या आवाहनास अनुसरुन या मोहीमांमध्ये आबालवृध्द नागरिकांनी उत्साहाने मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला.

'स्वभाव स्वच्छता, सखोल स्वच्छता' अभियानांतर्गत नागरी भागाप्रमाणेच एमआयडीसी भागातही अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व श्री.संतोष वारूळे, परिमंडळ उपआयुक्त श्री.सोमनाथ पोटरे व डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या.

यामध्ये घणसोली विभागातील रबाले एमआयडीसी येथे भूखंड क्र. आर 267 वरील फूड सायन्स लि. या उद्योग समुहातील अधिकारी, कर्मचारी यांनी एकत्र येत घणसोलीचे सहा.आयुक्त श्री. संजय तायडे व स्वच्छता अधिकारी श्री. विजय पडघन यांच्या नियंत्रणाखाली महापालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मी यांच्यासह परिसरात सखोल स्वच्छता केली.

कोपरखैरणे विभाग अधिकारी श्री.सुनिल काठोळे व स्वच्छता अधिकारी श्री.राजुसिंग चव्हाण यांनीही विभागातील अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता मित्रांसह महापे एमआयडीसी परिसरात तेथील उद्योग समुहातील 350 हून अधिक कामगारांसमवेत स्वच्छता मोहीम राबविली. विशेषत्वाने कॉन्सेट्रो, पेमेंट सिस्टीम आर्किटेक्ट यांच्या कर्मचा-यांसह महापे एमपीसीबी गेट ते हायवे पर्यंत सखोल स्वच्छता करण्यात आली. कोपरखैरणे से 19 येथेही मोहीम राबवून खाडी किना-यालगतचा कचरा गोळा करण्यात आला.

अशाचप्रकारे दिघा एमआयडीसी भागातही परिमंडळ 2 चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड व स्वच्छता अधिकारी श्री. प्रविण थोरात आणि अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताप्रेमी नागरिक तसेच कंपनीतील कर्मचा-यांनी स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला.

वाशी विभागात भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन मधील अधिकारी, कर्मचारी व कामगार यांच्या सहयोगातून वाशी विभागाचे सहा.आयुक्त श्री. सागर मोरे व स्वच्छता अधिकारी श्री सुर्यकांत म्हात्रे यांच्या नियंत्रणाखाली से 8, सागर विहार परिसरात राबविण्यात आलेल्या सखोल स्वच्छता मोहीमेत स्थानिक नागरिकही उत्साहाने सहभाग झाले होते.

# नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. 1 च्या स्थानकांवरील वाणिज्यिक जागांचा वापर करण्याची सुवर्णसंधी

### सिडकोतर्फे स्थानकांवरील वाणिज्यिक क्षेत्रांचे अनुज्ञप्तीकरण करण्यासंदर्भातील कार्यशाळेचे आयोजन

**नवी मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी**

नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. 1 च्या स्थानकांवर विकसित करण्यात आलेल्या वाणिज्यिक जागांच्या वाणिज्यिक क्षमतांचे अनुज्ञप्तीकरण करण्याच्या उद्देशाने, सिडकोतर्फे सोमवार, 07 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी 11.30 वाजता नवी मुंबई मेट्रो, सेंट्रल पार्क स्थानक, खारघर, नवी मुंबई येथे 'नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. 1 च्या स्थानकांवरील वाणिज्यिक जागांचे अनुज्ञप्तीकरण' या विषयावर कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत 11 स्थानकांसह 11.1 कि.मी. लांबीचा मेट्रो मार्ग क्र. 1 विकसित करण्यात आला आहे. 17 नोव्हेंबर 2023 पासून या मार्गावर मेट्रो सेवा सुरू झाली असून प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद या सेवेला लाभत आहे. मेट्रोमुळे नवी मुंबईला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. वर्तमानात विकसित करण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कॉर्पोरेट पार्क आणि लॉजिस्टिक पार्क प्रकल्पांमुळे नवी मुंबई हे व्यवसायाकरिता आश्वासक केंद्र म्हणून प्रसिद्धीस आले आहे.

सिडकोतर्फे मेट्रो मार्ग क्र. 1 वरील स्थानकांवर वाणिज्यिक जागा विकसित करण्यात आल्या आहेत. या वाणिज्यिक जागांच्या क्षमतांचा वापर चलनीकरणासाठी करण्याकरिता उपरोक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्यांना सिडकोच्या मेट्रो मार्ग




क्र. 1 ची ओळख, सरेखन आणि मुंबई महानगर प्रदेशातील प्रादेशिक कनेक्टिव्हीटीकरिता त्याचे महत्त्व, मेट्रो स्थानकांवर भाडेपट्ट्यावर उपलब्ध असलेल्या किरकोळ व वाणिज्यिक जागांकरिता अनुज्ञापन संधी, निविदा प्रक्रिया, पात्रतेचे निकष, इ. मुद्द्यांबद्दल माहिती देण्यात येणार आहे. तसेच निविदाकारांकडून देण्यात येणाऱ्या सूचनांवरही चर्चा करण्यात येणार आहे. कार्यशाळेनंतर मेट्रो स्थानकांना भेट देण्यात येणार आहे.

प्रत्येक मेट्रो स्थानकावर 40 चौ.मी. च्या अंतर्गत वाणिज्यिक जागा व 5 स्थानकांवर 7,065 चौ.मी. चे क्षेत्र बाह्य वाणिज्यिक क्षमतांसाठी उपलब्ध आहे. अंतर्गत वाणिज्यिक जागांचा वापर हा क्विक फुड अँण्ड बिव्हरेज, किरकोळ, इलेक्ट्रॉनिक्स, पुस्तकांचे दुकान, पुष्पविक्रेता, कपड्याचे दुकान, भेटवस्तूचे दुकान इ. करीता करता येणार आहे. तर बाह्य वाणिज्यिक जागेचा वापर हा सुपरमार्केट, क्विक फुड अँण्ड बिव्हरेज, किरकोळ, इलेक्ट्रॉनिक्स, कार शो रूम, स्टोअर्स, कॉर्पोरेट कार्यालये इ. करीता करता येणार आहे.

सिडकोतर्फे मेट्रो स्थानकांवर विकसित करण्यात आलेल्या वाणिज्यिक जागांचा वापर करून आपला व्यवसाय वाढवण्याची सुवर्णसंधी किरकोळ जागांसाठी इच्छुक निविदाकार, विकासक, व्यावसायिक आणि विक्रेते यांना उपलब्ध झाली आहे.

# महापालिकेच्या दुर्लक्षामुळे भिवंडीत कचराकोंडी शहरावर आरोग्याचे गंभीर संकट

**भिवंडी, दि. ४ : प्रतिनिधी**

भिवंडी शहर महानगरपालिका क्षेत्रात पसरलेला कचरा ही आता केवळ प्रशासकीय समस्या राहिली नसून शहरातील लाखो नागरिकांचे आरोग्य व जीवन धोक्यात येण्याचे प्रतीक बनले आहे.महानगर पालिका क्षेत्रात रस्त्याच्या कडेला साचलेला शेकडो टन कचरा हळूहळू एक विनाशकारी समस्या बनला आहे.ठेकेदारांचे दुर्लक्ष आणि पालिकेच्या आरोग्य विभागाच्या उदासीनतेमुळे शहर विषारी वायूने ग्रासले आहे.त्यामुळे संपूर्ण भिवंडी शहराचे पर्यावरण धोक्यात आले आहे.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत शहरात स्वच्छता मोहीम सुरू असतानाही प्रमुख रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढीग साचले आहेत.त्यामुळे परिसरात पसरलेल्या दुर्गंधीला कंटाळून नागरिकांनी आता कचऱ्याचे ढीग पेटवून देण्यास सुरुवात केली आहे.आगीतून निघणाऱ्या विषारी धुरामुळे पर्यावरण तर प्रदूषित होत आहेच, पण हा धूर आता शहरातील वातावरणाला विषारी बनवत आहे. त्यामुळे श्वसनाचे आजार झपाट्याने वाढत असून, नागरिकांचा जीव धोक्यात येऊ लागला आहे.नागाव रोडजवळील गॅलेक्सी सिनेमासमोर कचऱ्याचे मोठे डम्पिंग ग्राऊंड तयार झाले असून, त्यात संपूर्ण परिसराचा कचरा टाकला जातो. या डम्पिंग ग्राऊंडमधून निघणारी दुर्गंधी आणि कचऱ्यातून निघणारे विषारी घटक यामुळे संपूर्ण परिसर आजारांचे केंद्र बनत आहे.दुर्गंधी आणि धुरापासून दूर राहण्यासाठी ये-जा करणाऱ्यांना आणि स्थानिक रहिवाशांना नाक दाबून जावे लागत असले तरी आता ते टाळणे कठीण



झाले आहे.प्रभाग समिती स्तरावर कचरा उचलण्याची जबाबदारी खासगी कंत्राटदारांकडे सोपवण्यात आली आहे, मात्र या ठेकेदारांच्या हलगर्जीपणा आणि भ्रष्टाचारामुळे भिवंडीतील जनता नाराज आहे. पालिकेतील काही भ्रष्ट अधिकारी ठेकेदारांना अभय देत असल्याने कचरा उचलण्याऐवजी माती आणि खडे उचलून आपले खिसे भरत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.भिवंडीत पसरणाऱ्या विषारी धुरामुळे आता श्वसनाचे आजार, फुफ्फुसातील संसर्ग आणि इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होत आहेत. या धुक्यात असलेले हानिकारक वायू आणि कण विशेषतः लहान मुले आणि वृद्धांसाठी अत्यंत धोकादायक असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.यावर वेळीच नियंत्रण न आणल्यास भिवंडीला लवकरच मोठ्या आरोग्य आणीबाणीला सामोरे जावे लागू शकते. नागरिकांच्या सातत्याने तक्रारी करूनही पालिकेचे आरोग्य व स्वच्छता अधिकारी गप्प आहेत. प्रशासनाच्या भ्रष्टाचार आणि दुर्लक्षामुळे भिवंडीतील जनतेने जीवाला धोका निर्माण झालेल्या या कचऱ्याच्या ढिगाऱ्याला आग लावण्यास सुरुवात केली आहे.मात्र त्याचे परिणाम शहरातील प्रत्येक नागरिक भोगत असून भिवंडीची वाटचाल आता भीषण संकटाकडे होत असून लवकरच ठोस पावले न उचलल्यास हे संकट वाढू शकते. पालिका व प्रशासनाला तातडीने कारवाई केली नाही तर शहरातील नागरिकांना जीव धोक्यात घालून या विषारी वातावरणात जगावे लागेल.

## नवीन पनवेल येथील शिक्षण संस्थाचालकांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**पनवेल, दि. ४ : प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आणि ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षांसह इतर कार्यकारीणीतील विश्वस्तांविरोधात बुधवारी खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून रितसर चौकशी सुरु केली आहे. विशेष म्हणजे सरकारी यंत्रणांना ही शैक्षणिक संस्था विनापरवानगी किंवा बनावट दस्ताऐवजांवर सुरु असल्याचे समजण्यासाठी १८ वर्षे लागली याचीच चर्चा परिसरात आहे. १८ वर्षांनंतर हे विनापरवानगीचे प्रकरण बाहेर आल्याने मागील १८ वर्षांत हजारो विद्यार्थ्यांनी या संस्थेतून शिक्षण मिळवले असून त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. २००६ ते २०२४ या दरम्यान आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ आणि ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळाने ही फसवणूक केल्याचे पोलिसांच्या तक्रारीत म्हटले आहे. सिडको मंडळाने नवीन पनवेल येथील सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक ४१ येथील जागा नोकरदार महिलांच्या वसतिगृहासाठी या संस्थेला दिली होती. परंतु शिक्षण संस्थाचालकांनी या भूखंडाचे बनावट दस्त बनवून हा भूखंड शिक्षण संस्थेसाठी खरेदी केल्याचे भासवले. तसेच त्यावर महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्थेचे कामकाज सुरु केले. तसेच ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळाने देवद येथील जागा धनराज विस्पुते यांच्या नावावर असताना ती जागा ऋषिकेश शिक्षण संस्थेच्या नावावर दाखवून शिक्षण विभागासमोर मान्यता घेताना बनावट जागेचे कागदपत्र दाखविण्यात आले. त्यानंतर त्या जागेवरसुद्धा विविध शैक्षणिक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून फार्मसी महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, सीबीएसस्सी अशा वेगवेगळ्या शैक्षणिक विभाग सुरु केले. येथील शाळेच्या इमारत बांधकामासाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासह इतर सरकारी यंत्रणांची कायदेशीर परवानगी घेतली नाही. त्यामुळे केंद्रीय व राज्यातील शिक्षण विभाग व इतर सरकारी विभागांच्या परवानगीविना जागेचा वापर आणि शैक्षणिक संस्था चालविल्यामुळे हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या संस्थेचे अध्यक्ष धनराज विस्पुते, सचिव संगिता धनराज देविदास विस्पुते, खजिनदार परिमेला करंजकर, उपाध्यक्ष दिलीप कुमार चव्हाण, सदस्य शोभा दिलीप चव्हाण, महिंद्र देविदास विस्पुते, स्मिता महिंद्र विस्पुते, रमेश आत्माराम विस्पुते, वंदना विजय बिरारी, राकेश चंद्रकांत सोनार, मनोज दुर्गादास सोनार, प्रशांत भामरे, विक्रम धुमाळ या विश्वस्तांवर बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त बनवून सरकारी कार्यालयांची फसवणूक करणे व त्यासाठी कट रचणे याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# कल्याणमध्ये स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्याला पालिका आयुक्तांची नोटीस

**कल्याण, दि. ४ : प्रतिनिधी**

येथील पश्चिमेतील ब प्रभागातील रस्ते, नाले, सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणारे घनकचरा विभागाचे स्वच्छता अधिकारी अविनाश मांजरेकर यांना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या नोटिसीला ४८ तासात उत्तर देण्याची तंबी नोटिसीत देण्यात आली आहे. या कारवाईमुळे इतर प्रभागांमध्ये काम करणाऱ्या स्वच्छता अधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. कचरामुक्त कल्याण, डोंबिवली शहरे करण्यासाठी पालिका प्रशासनाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. स्वच्छता हा पालिके बरोबर नागरिकांच्याही सहभागाचा विषय आहे. हेही नागरिकांना पटवून देण्यासाठी पालिकेकडून विविध उपक्रम राबविले जात आहे. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड उद्याने, बगिचे, सार्वजनिक ठिकाणी सकाळच्या वेळेत फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांशी थेट संवाद साधून आपल्या प्रभागात स्वच्छता होते की नाही. पालिका स्वच्छता अधिकारी, कामगार आपल्या प्रभागात वेळेवर येतात की नाही. आपल्या प्रभागातील कचरा नियमित उचलला जातो की नाही याविषयीची माहिती घेत आहेत. यावेळी नागरिकांकडून होणाऱ्या तक्रारीची गंभीर दखल आयुक्त डॉ. जाखड घेत आहेत. आयुक्त डॉ. जाखड कल्याण पश्चिमेतील रोझाली सोसायटी परिसरातील उद्यानात स्वच्छतेच्या विषयावर नागरिकांशी संवाद साधण्यासाठी गेल्या आठवड्यात आल्या होत्या. यावेळी उपायुक्त अतुल पाटील, उपायुक्त संजय जाधव उपस्थित होते. उद्यानात आलेल्या झुलेलाल चौक, गोदरेज हिल परिसरातील नागरिकांशी आयुक्तांनी संवाद झाला. नागरिकांनी आपल्या भागात नियमित गटार, रस्ते, चौक सफाई होत नसल्याच्या तक्रारी आयुक्तांकडे केल्या. कचऱ्या विषयी पालिकेच्या ब प्रभागात तक्रारी केल्या तर त्याचीही दखल घेतली जात नाही. कचरा एकाच जागी अनेक दिवस साठून राहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरते. या तक्रारी ऐकून आयुक्त डॉ. जाखड संतप्त झाल्या.

ब प्रभागातील स्वच्छतेची जबाबदारी स्वच्छता अधिकारी अविनाश मांजरेकर यांची आहे. ते आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत नसल्याने ब प्रभागात गुणवत्तापूर्ण स्वच्छता होत नसल्याचा निष्कर्ष काढत आयुक्तांनी स्वच्छता अधिकारी मांजरेकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. येत्या ४८ तासाच्या आत या नोटिसीला मांजरेकर यांनी उत्तर दिले नाहीतर त्यांना काहीही म्हणायचे नाही असे समजून त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त नियमाने कारवाई करण्याची तंबी आयुक्तांनी दिली आहे. घनकचरा विभागातून अन्य विभागात वरिष्ठ पदावर जाण्यासाठी मांजरेकर प्रयत्नशील असल्याची जोरदार चर्चा पालिकेत आहे.

# पिंपरीत डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ 17,500 घरांमध्ये सापडल्या अळ्या

**पुणे, दि. ४ : प्रतिनिधी**

शहरात डेंग्यू रुग्णांची संख्या वाढत असून, आतापर्यंत १७८ जणांना डेंग्यूची लागण झाली आहे. चिकुनगुन्याचे ३४ रुग्ण आहेत. शहरातील १७ हजार ५०० घरांमध्ये डेंग्यूच्या अळ्या आढळल्या आहेत. संबंधित घरमालकांकडून तसेच इतर ठिकाणांहून एकूण ७७ लाख ४८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात जूनपासून डेंग्यूबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. ठिकठिकाणी पाणी साचून डासांची उत्पत्ती होण्यास पोषक वातावरण निर्माण होत आहे. डासांमुळे अनेकांना डेंग्यू, मलेरिया, झिका व चिकुनगुन्या या आजारांची लागण होत आहे. या आजारांच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली. आतापर्यंत नऊ लाख १० हजार ९९८ घरांची तपासणी करण्यात आली आहे. त्यांपैकी १७ हजार ४५६ घरांत डासांच्या अळ्या आढळल्या आहेत.

शहरातील दुकाने, व्यावसायिक ठिकाणे, मोकळ्या जागा अशा ४१ लाख ४५ हजार ८१८ ठिकाणांची तपासणी करण्यात आली आहे. त्यांपैकी २२ हजार ३११ ठिकाणी डासांच्या अळ्या आढळल्या आहेत. शहरातील २६४९ वाहन दुरुस्ती, भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. २५३६ बांधकाम प्रकल्प तपासण्यात आले. त्यांपैकी ३७९१ जणांना नोटीस बजावण्यात आली आहे, तर १७८५ जणांवर दंडात्मक कारवाई केली आहे. त्यातून एकूण ७७ लाख ४८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

शहरात डेंग्यूच्या रुग्णांची वाढ होत असल्यामुळे कंटेनर सर्वेक्षणाची मोहीम सुरू आहे. शहरातील बांधकाम प्रकल्प, घरे तपासण्यात येत आहेत. डेंग्यूच्या अळ्या सापडल्या, तर नागरिकांना नोटीस देण्यात येत असून दंडही वसूल केला जात आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात कुठेही स्वच्छ पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांनी केले.

आतापर्यंत ३६ हजार २७९ जणांची तपासणी केल्यानंतर ४३१३ जण डेंग्यू संशयित आढळले होते. त्यांपैकी १७८ जणांना डेंग्यूचे निदान झाले आहे. १६०८ जणांची तपासणी केल्यानंतर ३४ जणांना चिकुनगुन्याचे निदान झाले आहे. या वर्षी चाचण्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढविले आहे. डेंग्यूची रुग्णसंख्या गेल्या वर्षीपेक्षा कमी असल्याचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

## वेश्याव्यवसायातून थायलंडच्या 15 महिलांची सुटका

**ठाणे, दि. ४ : प्रतिनिधी**

थायलंड देशातील महिलांना आर्थिक अमिष दाखवून वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या पाच जणांना ठाणे पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली. या प्रकरणात पोलिसांनी थायलंडच्या १५ महिलांची वेश्या व्यवसायातून सुटका केली आहे.

उल्हासनगर येथील सेक्शन १७ मधील सितारा लॉजिंग अँड बोर्डींगमध्ये विदेशी महिलांना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी साहाय्यक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक नरेश पवार यांच्या पथकाने बुधवारी मध्यरात्री ग्राहकाला पाठवून छापा घातला. याप्रकरणात पोलिसांनी लॉजचा व्यवस्थापक पंकज सिंग (३७) याच्यासह पाच जणांना ताब्यात घेतले. तसेच थायलंडच्या १५ महिलांची सुटका केली.

## जास्त पावसानंतर यंदा राज्यात थंडीचाही कडाका

**पुणे, दि. ४ : प्रतिनिधी**

राज्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यानंतर थंडीचा कडाकाही अधिक राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. तसेच ऑक्टोबरमध्ये देशाच्या बहुतेक भागांत सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यताही वर्तविण्यात आल्याने ऐन दिवाळीत थंडीसह पावसाच्या सरी बसरण्याची शक्यता आहे. राज्याच्या बहुतांश भागाला 'ऑक्टोबर हिट'ला सामोरे जावे लागेल, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे. हिवाळयात सरासरीपेक्षा जास्त थंडी पडण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले. मागील काही वर्षांपासून जगभराला तापमानवाढीचा सामना करावा लागत आहे. प्रशांत महासागरात 'ला – निना' प्रणाली सक्रिय झाल्यास देशभरात सरासरीपेक्षा जास्त थंडी पडू शकते. मात्र त्याबाबत नोव्हेंबरच्या सुरुवातीला अधिक अचूकपणे सांगता येईल, असे ते म्हणाले. ऑक्टोबर महिन्यात देशात सरासरी ७५.४ मिमी पाऊस पडतो. त्या तुलनेत यंदा ११५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मुंबईसह उत्तर कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि पूर्व विदर्भात ऑक्टोबर महिन्यात पावसाचा जोर अधिक राहणार असल्याचे डॉ. महापात्रा यांनी स्पष्ट केले. उत्तर भारतातील काही भागांतून मोसमी वाऱ्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. काही दिवसांतच महाराष्ट्रातूनही मोसमी वारे माघारी परतण्यास सुरुवात होईल. दरम्यान, मुंबईत गेल्या आठवडयात मुसळधार पाऊस कोसळला. त्यानंतर मुंबईतील तापमानात वाढ होऊ लागली आहे. मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास पुन्हा सुरू झाला आहे. २३ सप्टेंबरपासून मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास सुरू होऊन २४ सप्टेंबर रोजी थांबला होता. आता दोन ऑक्टोबर रोजी लेह, लडाख, जम्मू आणि काश्मीर, पंजाब, हरियाना, दिल्ली, हिमाचल प्रदेशातून मोसमी पाऊस पूर्णपणे आणि राजस्थानच्या काही भागातून मोसमी पाऊस माघारी परतला आहे.

## शेकाप तलोजा फेज दोनमध्ये आरोग्य शिबिर संपन्न

**पनवेल, दि. ४ : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्ष तलोजा फेज दोन च्या अध्यक्षा सौ.दीक्षा दिलीप जाधव आणि माजी नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील यांच्या वतीने कोकण शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांना राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र विधान मंडळाच्या वतीने उत्कृष्ट भाषण पुरस्कार भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते देण्यात आला. या निमित्ताने त्यांचा सत्कार तलोजा फेज दोनच्या वतीने करण्यात आला. पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण शेठ घरत, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील, पनवेल काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील, माजी आमदार दत्तूशेठ पाटील शिक्षण संस्थेचे सीईओ रा गो पाटील,महाराष्ट्र राज्य वारकरी संप्रदायाचे पुंडलिक महाराज फडके आदी मान्यवर उपस्थित होते.

या निमित्ताने शेतकरी कामगार पक्ष तलोजा फेज दोन च्या अध्यक्षा सौ.दिलीप जाधव आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील, प्रसाद ढगे पाटील, समाजसेवक जयेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 2 ऑक्टोंबर 2024 रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये साई ब्लड बँक यांच्या वतीने भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 103 लोकांनी रक्तदान केले. त्याचबरोबर येथील सामाजिक कार्यकर्ते भीमा चव्हाण यांच्यामार्फत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते प्रामुख्याने यामध्ये शुगर बीपी कोलेस्ट्रॉल थायरॉईड आदींचे चेकअप करण्यात आले. पनवेल मधील नामकीत संस्था आर आर झुंजून वाला आय हॉस्पिटलच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते तसेच ज्या रुग्णांना चष्म्याची गरज आहे त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले, तसेच ज्यांना वैद्यकीय मदत हवी आहे त्यांना मदत करण्यात आली. तलोजा मधील महिला बचत गटांना मोफत महिला उद्योग शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते, नामांकित व्यक्तींनी त्यांना वेगवेगळ्या व्यवसायाबाबत मार्गदर्शन केले.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**भिवंडी, दि. ३ : प्रतिनिधी**

शहरातील काटई गाव येथील एका चाळीत राहणाऱ्या अल्पवयीन १४ वर्षीय (अंदाजे) मुलीचे अज्ञाताने अज्ञात कारणावरून अपहरण केल्याचे समोर आले आहे.याप्रकरणी अज्ञाताच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,सविता शिनाई सैनी (३५) ही महिला मूळची बिहार राज्यातील ताजपूर येथील असून उदरनिर्वाहासाठी कुटुंबासोबत भिवंडीतील काटई गावातील एका चाळीतील भाड्याच्या खोलीत काही वर्षांपासून राहत आहे.

## प्रसिद्ध कीर्तनकार चैतन्य महाराजांना अटक

**पुणे, दि. ३ : प्रतिनिधी**

प्रसिद्ध कीर्तनकार आणि सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असणाऱ्या चैतन्य सयाजी वाडेकर (महाराज) यांना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अटक केली आहे. चैतन्य महाराज यांनी त्यांच्या इतर दोन भावांसह आणि नातेवाईकांसह घराच्या जवळून जाणारा रस्ता पोकलेनने बेकायदेशीरपणे खोदल्याने पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. याप्रकरणी चैतन्य सयाजी वाडेकर (महाराज), अमोल सयाजी वाडेकर, प्रमोद सयाजी वाडेकर आणि ऋषिकेश शशिकांत सूर्यवंशी यांना अटक करण्यात आली आहे. मध्यरात्री त्यांना अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हाळुंगे परिसरामध्ये चैतन्य महाराज वाडेकर हे राहतात. त्यांच्या घराजवळ एक कंपनी आहे. त्या ठिकाणाहून जाणाऱ्या रस्त्यावरून त्यांचे वाद आहेत. बुधवारी रात्री कंपनीत जाणारा रस्ता बेकायदेशीर खोदला. यावेळी त्यांचे इतर एक नातेवाईक आणि दोन बंधू होते. असं तक्रारीत म्हटलं आहे. तसेच कंपनीच्या कंपाउंडचे पत्रे देखील काढले आहेत. अखेर या प्रकरणी कंपनीचे व्यवस्थापक अजित पाटील यांनी म्हाळुंगे पोलिसात तक्रार दिली आहे. याप्रकरणी म्हाळुंगे पोलिसांनी चैतन्य सयाजी वाडेकर, अमोल सयाजी वाडेकर, प्रमोद सयाजी वाडेकर आणि ऋषिकेश शशिकांत सूर्यवंशी यांना अटक केली आहे. चैतन्य महाराज वाडेकर हे नेहमीच सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असतात. ते रिल्स देखील बनवतात. त्यांचे सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत. त्यांच्या या अटकेमुळे त्यांच्या चाहत्यांना धक्का बसला आहे.

# देशी विदेशी दारुचा ६ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त



■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा दि. ४:** स्थानीक गुन्हे शाखेचे पोलिस पथकाने पेट्रोलिंग दरम्यान धडक कारवाई करीत सेवाग्राम हद्दीत नाकेबंदी दरम्यान कारसह देशी विदेशी दारूचा लाख,हजार आठशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तीन आरोपींवरुध्द सेवाग्रमा पो.स्टे.येथे गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानीक गुन्हे शाखा, वर्धा येथील पथक पोलीस स्टेशन सेवाग्राम परिसरात पेट्रोलिंग करीत असताना मुखबीर कडून एम.एच.०२ सि.एच.९७८३ क्रमांकाच्या कारने सावंगी असोला जिल्हा नागपूर येथील लोओ पोर्ट बार मधून देशी विदेशी दारू चा माल घेऊन वर्ध्याकडे येत आहे. माहितीच्या आधारावर नाकेबंदी करून प्रो. रेड केला असता आरोपी नामे आकाश राजेश तांबेकर वय .(३४) रा. गौरक्षण वार्ड, वर्धा यांच्या ताब्यातून देशी दारू, वदेशी दारूच्या ऑफिसर चॉईस कंपनीच्या शिशा, विदेशी दारूने भरलेल्या ७२ सीलबंद शीशा, रॉयल स्टॅग कंपनीच्या ९६ सीलबंद शिशा, आयकॉनिक व्हाईट कंपनीच्या ३६ सीलबंद शीशा, बर्ग कंपनीच्या ४८ सीलबंद बियरचे कॅन, एम.एच ०२ सि.एच.९७८३ क्रमांकाची कार असा एकूण ६ लाख ७५ हजार ८०० रु.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दारूंचा माल पसार आरोपी बादल धवणे रा. आदिवासी कॉलनी, वर्धा यांच्या सांगण्यावरून लिओ पोर्ट बारचा मालक रा.सावंगी असोला जिल्हा नागपूर येथून आणल्याचे सांगितल्याने तिन्ही आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन सेवाग्राम येथे गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधिक्षक डॉ. सागर कवडे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक अमोल लगड, सलाम कुरेशी, अंमलदार हमीद शेख, सचिन इंगोले, श्रीकांत खडसे,राजेश तिवसकर, प्रमोद पिसे, रामकिसन ईप्पर, आशिष महेशगौरी, विकास मुंढे,अरविंद इंगोले, उदय सोळुंकी सर्व नेमणूक स्थानीक गुन्हे शाखा यांनी केली

# दहेगाव (स्टेशन) येथे आरोग्य तपासणी शिबीर

**वर्धा,दि.४ प्रतिनिधी.** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समन्वयाने राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष, व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) व महात्मा फुले जन आरोग्य योजना याच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत, दहेगाव (स्टेशन) येथे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच राजश्री गावंडे, प्रमुख पाहूणे चॅरिटी कमिशनर निलेश काळे, चॅरिटी अधीक्षक नंदवार, चॅरिटी इनस्पेक्टर उमेश लुंगे तसेच विशेष अतिथी गौरव गावंडे, दीपक होले,.समुदाय आरोग्य अधिकारी सपना डेकाटे, समन्वयक डॉ. अभिषेक जोशी यांची उपस्थिती होती.




प्रमुख पाहूणे निलेश काळे यांनी शिबिरातून विनामूल्य दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांची माहिती दिली. शिबिरात तज्ज्ञांसह वैद्यकीय आरोग्य कर्मचारी सहभागी झाले होते. शिबिरात एकूण रुग्णांनी वैद्यकीय सेवेचा लाभ घेतला. त्यापैकी रुग्णांना पुढील सेवेसाठी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले असून, या शिबिरातील रुग्णांवर शासनाच्या विविध आरोग्य योजनांतर्गत मोफत उपचार करण्यात येणार आहेत,.आवश्यक रक्त चाचण्या आणि ईसीजीसह मोफत औषधे आणि निदान चाचण्यांचा उपस्थितांना लाभ झाला. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि निरोगी जीवनशैली निवडीबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आरोग्य शिक्षण सत्र देखील आयोजित केले गेले.कार्यक्रमाचे संचालन, एन.पी. शिंगयांनी केले तर आभार प्रिया गोडे यांनी मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्मिता हिवरे (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना जिल्हा समन्वयक), डॉ. सोळंकी, डॉ. विखे एडीएचओ वर्धा, मुरलीधर उमाटे, सुनील रहाटे आदींनी सहकार्य केले.

## महिला सरपंचाने थेट पंतप्रधानांकडे ३५० घरकुलांची पत्राव्दारे केली मागणी

**उमरखेड** : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राज्यात लोकप्रिय होत असतांनाच महिलांना आजून एक समस्या सतावत आहे. ती म्हणजे हक्काचे घर, आपल्या स्वप्नातील घरकुल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ग्रामविकासाचे महत्वाचे पाऊल म्हणजे घरकूल योजना. २०२४ पर्यंत सर्वांना घरे मिळणार अशी घोषणा केली होती. महिलांना घर संसार चालवण्याचे, सामाजिक, मानसिक स्थैर्य मिळवून देणारं एकमेव साधन म्हणजे घर. ग्रामीण भागात तर झोपडीवजा घरे, पावसाळ्यात डोह साचणारे काही ठिकाणी तर वर्षभर ओलावा असणारे घरे आहेत. आरोग्याच्या समस्या मग दवाखाना खर्च हा दारिद्याच्या चक्रातून बाहेर कधी निघायचे महिलांनी ? मोलमजूरी करुन चरितार्थ चालवणाऱ्या ह्या महीला घरकूल मिळेल. या आशेने वाट पाहत आहेत. म्हणून देवसरीच्या महिला सरपंच सौ. मिनाक्षी चंद्रमणी सावतकर यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच ३५० घरकूले मिळावीत आशी विनंती ग्रा. पं. देवसरीच्या वतीने पत्राद्वारे करण्यात आली आहे. तसे असे पत्र त्यांनी लिहून पाठवले आहे.

## विजयाश्री वट्टी यांचे तालुका व जिल्हास्तरावर यश



**यवतमाळ** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्यामार्फत शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ चे आयोजन राज्यात केले होते. त्या स्पर्धेचा नुकताच निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये मालखेड खुर्द येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळेतील विषय शिक्षिका विजयाश्री अर्जुन वट्टी यांनी विज्ञान सहावी ते आठवी गटातून जिल्ह्यातून तिसरा तर तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. विजयाश्री वट्टी या उपक्रमशील शिक्षिका असुन विद्यार्थ्यांना वेगवेगळे उपक्रम राबवुन अध्यापन करत असतात. त्याचप्रमाणे सामाजिक कार्य ऑल इंडिया आदिवासी एम्प्लाइज फेडरेशन जिल्हा शाखेत महिला प्रतिनिधी म्हणून करतात.

## शिवसेना (उबाठा) पक्षाचा कार्यकर्ता मेळावा



**यवतमाळ** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा कार्यकर्ता मेळावा, सदस्य नोंदणी व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन स्थानिक राजवाडा पार्क येथे २९ सप्टेंबर रोजी खा. संजय देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड, सागरताई पुरी, किशोर इंगळे, जिल्हाप्रमुख संतोष ढवळे, यवतमाळ शहरप्रमुख विनोद पवार, कल्पना दरवई, गजानन ठोकाळे, अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख सय्यद दाऊद, उपजिल्हाप्रमुख अशिफ आली काजी, भाई अमान, डॉ. गणेश नाईक, राजेश निमोदीया, उपतालुकाप्रमुख संदीप सरोदे यांची उपस्थिती होती.

स्वयंभू सिद्धेश्वर बहुउद्देशीय वारकरी संस्था
बेलगांव (धा.), ता. सेलू, जि. वर्धा द्वारा संचालीत

**राष्ट्रीय सामाजिक विद्यालय,**
**पिपरी (मेघे), ता. जि. वर्धा**

**पाहिजेत**

स्वंयभू सिदेश्वर बहुउदेशिय वारकरी संस्था, बेलगांव (धा.) ता. सेलू, जि. वर्धा व्दारा संचालित राष्ट्रीय सामाजिक विद्यालय, पिपरी (मेघे) ता. जि. वर्धा या 100% अनुदानित शाळेत कनिष्ठ लिपिकाचे पद त्वरीत भरणे आहे. मा. शिक्षणधिकारी (मा.) जि.प. वर्धा यांचे मान्यता पत्र जिपव/शिविमा /मान्यता / डे-7/वशि- 1061/2024 दि. 04/10/2024

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पदाची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक | 12 वी पास<br>एम. एस. सी. आय. टी | 01 | खुला |

मुलाखतीचे स्थळ - राष्ट्रीय सामाजिक विद्यालय,
गजानन नगर, पिपरी (मेघे) ता. जि. वर्धा
मंगळवार दि 08/10/2024
वेळ : दु. 1 ते 3

सचिव
स्वयंभू सिदेश्वर बहुउदेशिय वारकरी संस्था,
बेलगांव (धा.) ता. सेलू,जि. वर्धा

Ministry of Road Transport & Highways, Govt. India
PM Gati Shakti — National Master Plan for Multi-Modal Connectivity
PWD




"दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा, कनेक्टिव्हीटी, उत्पादकता, शाश्वत उपाय आणि सुरक्षा या सर्वाची हमी देणाऱ्या अत्याधुनिक पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी आमचे सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे."
**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

**लोकार्पण समारंभ**
**नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्ग क्र. 53 वर वाडी येथे चार पदरी उड्डाणपुलाचे बांधकाम**
लांबी : 2.3 कि. मी. । किंमत : ₹ 246 कोटी
**नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्ग क्र. 53 वरील व्हेरायटी चौक ते बोले पेट्रोल पंप चौक आणि विद्यापीठ परिसर चौक ते वाडी पर्यंत रस्त्याचे (व्हाईट टॉपिंग) पद्धतिने चौपदरी सिमेंट काँक्रीटचे बांधकाम**
लांबी : 4.89 कि. मी. । किंमत : ₹ 76 कोटी

**प्रकल्पांचे फायदे**
- विद्यापीठ कॅम्पस चौक ते वाडी पोलीस ठाणे यातील प्रवासाचा वेळ 25 मिनिटांवरून 8 मिनिटांवर आणला जाईल.
- वाडी परिसरातील वाहतुकीची वर्दळ कमी होईल.
- महाराजबाग चौक, मारुती सेवा जंक्शन, काटोल बायपास जंक्शन, वाडी जंक्शन आणि खडगांव जंक्शन या मोठ्या चौकात वाहतुकीच्या अनुषंगाने सुरक्षा उपाय योजनेत वाढ.
- व्हेरायटी चौक ते जुना वाडी ऑक्ट्राई नाकापर्यंत समर्पित सायकल ट्रॅक उपलब्ध होईल.
- रस्त्याच्या कडेला सिमेंट काँक्रिट ड्रेनेज बांधल्यामुळे वाडी परिसरातील पाणी साचण्याची समस्येला आळा बसेल.
- रस्त्याच्या दोन्ही बाजूला पादचारी मार्ग (फुटपाथ)
- रस्त्यांवर दिवे बसवण्यामुळे सुरक्षा आणि सुरक्षितता अधिक सुधारेल.

**सायंकाळी 4.30 वाजता, शनिवार, 5 ऑक्टोबर 2024 | एमआयडीसी जंक्शन, वाडी**

शुभहस्ते
**नितीन गडकरी**
केंद्रीय मंत्री, परिवहन, महामार्ग विभाग, भारत सरकार

कार्यक्रमाचे अध्यक्ष
**देवेंद्र फडणवीस**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि पालकमंत्री, नागपूर जिल्हा

प्रमुख उपस्थिती
**शामकुमार बर्वे** खासदार, रामटेक लोकसभा क्षेत्र | **प्रविण दटके** विधान परिषद सदस्य | **अभिजीत वंजारी** विधान परिषद सदस्य | **चंद्रशेखर बावनकुळे** विधान परिषद सदस्य | **सुधाकर अडबाले** विधान परिषद सदस्य | **डॉ. परिणय फुके** विधान परिषद सदस्य
**कृपाल तुमाने** विधान परिषद सदस्य | **अनिल देशमुख** विधानसभा सदस्य | **डॉ. नितीन राऊत** विधानसभा सदस्य | **कृष्णा खोपडे** विधानसभा सदस्य | **विकास कुंभारे** विधानसभा सदस्य | **मोहन मते** विधानसभा सदस्य | **विकास ठाकरे** विधानसभा सदस्य
**समीर मेघे** विधानसभा सदस्य | **ॲड. आशिष जयस्वाल** विधानसभा सदस्य | **टेकचंद सावरकर** विधानसभा सदस्य | **मुक्ताताई कोकड्डे** अध्यक्षा, जिल्हा परिषद, नागपूर

@nitingadkary @officeOfNG | @nitin_gadkari @OfficeOfNG | @gadkari.nitin | gadkari.nitin | Nitin Gadkari

# वनस्पती व प्राण्यांचे संरक्षण अन् संवर्धन



कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
9423714883

**भारतीय वन्यजीव सप्ताह व जागतिक प्राणी दिन विशेष**

भारतातील वनस्पती आणि प्राणी यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने २ ऑक्टोबरपासून राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह साजरा केला जात आहे. हा कार्यक्रम ८ ऑक्टोबरपर्यंत साजरा होत राहणार आहे. तर विश्व प्राणी दिवस दरवर्षी ४ ऑक्टोबर साजरा केला जातो. त्याचे ध्येय प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार थांबवणे, त्यांचे कल्याण व हक्क याबद्दल लोकांना जागरूक करणे, हे आहे.

-------------------

वर्ल्ड एनिमल डे- जागतिक प्राणी दिवस दरवर्षी ४ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, त्याचे ध्येय प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार थांबवणे आणि प्राण्यांचे कल्याण आणि हक्क याबद्दल लोकांना जागरुक करणे आहे. २०२३ साली जागतिक प्राणी दिन बुधवार, ४ ऑक्टोबर रोजी महान किंवा लहान, सर्वांवर प्रेम करा या थीमसह साजरा करण्यात येत आहे.

हा एक दिवस आहे ज्यामध्ये जगभरातील देश प्राण्यांच्या कल्याणासाठी आणि हक्कांसाठी काम करतात. प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार रोखण्यासाठी आणि प्राण्यांच्या कल्याणाची व अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी ४ ऑक्टोबरला जागतिक प्राणी कल्याण दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो.

जागतिक प्राणी दिन प्रथम ४ ऑक्टोबर १९२९ रोजी साजरा करण्यात आला, ज्याची सुरुवात जर्मन लेखक आणि प्रकाशक हेनरिक झिमरमन यांनी प्राणी कल्याणाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी केली. दि.२४ मार्च १९२५रोजी जागतिक प्राणी दिनाचे आयोजन हेनरिक झिमरमन (१८८७-१९४२) नावाच्या जर्मनने केले होते. ते केवळ लेखकच नव्हते, तर त्यांनी मेन्श अंड हुंड- माणूस आणि कुत्रा नावाचे द्वैमासिक देखील प्रकाशित केले, या मासिकाचा उपयोग प्राणी कल्याणाविषयीच्या त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी एक माध्यम म्हणून केला आणि जागतिक प्राणी दिन समितीची स्थापना करण्यासाठी त्याचा वापर केला.

२४ मार्च १९२५ रोजी त्यांच्या समितीने जागतिक प्राणी कल्याण दिनाचे आयोजन केले होते, त्यांनी बर्लिन, जर्मनी येथील स्पोर्ट्स पॅलेस येथे त्यावेळच्या प्राणी कल्याणाच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी त्याचे आयोजन केले होते.

या पहिल्या कार्यक्रमात सुमारे पाच हजार लोक उपस्थित होते आणि हा कार्यक्रम असिसीच्या सेंट फ्रान्सिसच्या मेजवानीच्या दिवसाशी संरेखित होता, जो की ४ ऑक्टोबर होता. शेवटी ४ ऑक्टोबर हा जागतिक प्राणी दिवस म्हणून साजरा करण्याचा ठराव मे १९३१मध्ये फ्लोरेन्स इटलीतील आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसने स्वीकारला. त्यानंतर आज जगभरात प्राण्यांच्या कल्याणासाठी जागतिक प्राणी दिन साजरा केला जातो.

या दिवसाच्या समर्थनार्थ म्हणून समजा ना, राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह भारतभर दरवर्षी २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान भारतातील वनस्पती आणि प्राणी यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो. २ ते ८ऑक्टोबर दरम्यान वन्यजीव सप्ताह- नॅशनल वाइल्डलाईफ वीक साजरा केला जातो. यंदा सन २०२३ मध्ये आपण ६९वा वन्यजीव सप्ताह साजरा करत आहोत.

**वन्यजीव सप्ताहाचा इतिहास –** भारतीय वन्यजीव मंडळाची स्थापना करण्यात आली आणि भारताच्या वन्यजीवांचे संरक्षण करण्याच्या दीर्घकालीन उद्दिष्टांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १९५२ ाध्ये वन्यजीव सप्ताहाची संकल्पना मांडण्यात आली. सुरुवातीला वन्यजीव दिन १९५५ मध्ये साजरा करण्यात आला, जो नंतर १९५७ मध्ये वन्यजीव सप्ताह म्हणून श्रेणीसुधारित करण्यात आला.

पृथ्वीवर प्रचंड जैवविविधता आहे. परंतु जंगलतोड, वाढते शहरीकरण, पशुपक्ष्यांच्या अधिवासांवर मानवी आक्रमण यांसारख्या बाबींमुळे हल्ली माणसाचा जंगली प्राण्यांशी संबधच येत नाही आणि येतो तेव्हा दोन्ही बाजूंना फारसा आनंददायक नसतो ! ही परस्थिती बदलण्याचे प्रयत्न या सप्ताहाच्या निमित्ताने होत आहेत.

**मूळ संकल्पना व सुरुवात –** भारतात १९५२ वन्यजीव सप्ताह साजरा केला जात आहे. नामशेष होत चाललेल्या वन्य पशुपक्ष्यांबाबत जागृती निर्माण करणे हा त्यामागील हेतू आहे. आता या मूळ हेतूचा काळानुसार विस्तार झाला आहे. वन्यजीवांनी मानवी आयुष्यात प्रवेश करण्यामागची कारणे समजावून दिली जात आहेत. खरे तर कोणताही वन्यजीव स्वतःहून माणसांवर हल्ला करत नाही.

परंतु त्यांच्या राहण्याच्या क्षेत्रावर- अधिवासावर शेती, रस्ते वा बांधकामाच्या रूपाने होणारे मानवी आक्रमण मर्यादेपलीकडे गेले की ते जंगलाच्या सीमेवरील खेड्यांत घुसून मुख्यतः पोटासाठी गाई गुरे मारतात व त्यातून मानव- वन्यजीव असा संघर्ष उद्भवतो. भारतासहित जगातील इतरही पुरातन संस्कृतींमध्ये सांगितल्याप्रमाणे मानव आणि वन्यजीवात मैत्री असणे ही संपूर्ण पृथ्वीची गरज आहे, कारण वन्यजीवांखेरीज मानव सुखाने राहूच शकणार नाही. ही जागृती रुजवण्यासाठी भारत सरकारने इंडियन बोर्ड ऑफ वाईल्डलाईफची स्थापना पूर्वीच केली आहे.

जंगल सीमेवरील स्थानिकांना याबाबत योग्य माहिती, मार्गदर्शन व सुविधा पुरवावी तसेच वन्यजीवांबद्दल माहिती मिळवून त्यांचा जीवनक्रम समजून घ्यावा; ज्यामुळे त्यांच्याबद्दलचे गैरसमज दूर होऊ शकतील. तसेच वन्यजीवांचा अधिवास असलेले जंगल तोडण्यास नेहमी विरोध दर्शवावा.

वन्यजीव सप्ताहानिमित्त रत्नागिरीत विविध उपक्रमांना सोमवारपासून सुरवात झाली आहे. रत्नागिरीतील वन्यजीव प्रेमींसाठी लेन्स आर्ट व सह्याद्री संकल्प सोसायटीने एक अनोखा उपक्रम राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून आयोजित करत आहे. या उपक्रमातून निसर्ग सोबती या नेचर क्लबची स्थापना व लोगोचे अनावरण करण्यात आले आहे.

उपक्रमात वन्यजीव व जैवविविधतेचे संवर्धन या विषयी जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन २ ऑक्टोबरला गोगटे-जोगळेकर कॉलेजच्या राधाबाई शेट्ये सभागृहात झाले. याच दिवशी जिल्ह्यातील जैवविविधता, विविध प्रजाती, त्यांचे अधिवास व संवर्धन याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

सृष्टीसंवर्धन फाउंडेशनचे विशाल भावे व सह्याद्री संकल्प सोसायटीचे प्रतीक मोरे व निसर्ग मित्रमंडळ संस्थेतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. रत्नागिरीत अशा स्वरूपाचा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात, दऱ्याखोऱ्यात काम करणाऱ्या सर्वांनी एकत्र येऊन तयार झालेला हा पहिलावहिला उपक्रम असल्याचे निसर्ग सोबतीच्या प्रमुख निखिता शिंदे यांनी सांगितले.




वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून ६-८ ऑक्टोबरला रत्नागिरीतील जैवविविधता आणि वन्यजीव या विषयावर लेन्स आर्टतर्फे निवडक २५० फोटोंचे प्रदर्शन पटवर्धन हायस्कूल येथे भरवण्यात आले. या कालावधीत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नेचर ट्रेलचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा लाभ जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये आणि सर्व निसर्गप्रेमी घेत आहेत.

कोटनिसर्ग सोबती क्लबच्या उपक्रमात पक्षी, प्राणी, सरपटणारे प्राणी आणि फुलपाखरे आणि कीटक अशा वन्यजीवांचे चार विभाग दर्शविले आहेत. नानाविध प्रजातींची ओळख, त्यांचे राहणीमान, त्यांना आवश्यक व पोषक असे विशिष्ट वातावरण आणि त्यांचे संवर्धन याची माहिती तरुण पिढीला निश्चितच होईल, अशी अपेक्षा करण्यात येत आहे, ती आज अत्यावश्यकच!! भारतीय वन्यजीव सप्ताहाच्या समस्त बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

●●●●●●●●●

# जागतिक प्राणी दिवस

जागतिक प्राणी दिन हा प्राणी हक्क आणि कल्याणासाठी कृतीचा एक आंतरराष्ट्रीय दिवस आहे. जागतिक प्राणी दिनाची सुरुवात सायनोलॉजिस्ट हेनरिक झिमरमन यांनी केली होती. त्यांनी २४ मार्च १९२५ रोजी जर्मनीतील बर्लिन येथील स्पोर्ट पॅलेस येथे पहिला जागतिक प्राणी दिन आयोजित केला होता. या पहिल्या कार्यक्रमाला ५००० हून अधिक लोक उपस्थित होते.

पर्यावरणशास्त्राचे संरक्षक संत असिसीच्या संत फ्रान्सिस यांच्या मेजवानीच्या दिवसाशी संरेखित करण्यासाठी हा उपक्रम मूलतः ४ ऑक्टोबर रोजी नियोजित होता. मात्र त्या दिवशी स्थळ उपलब्ध नव्हते. त्यानंतर हा कार्यक्रम १९२९ मध्ये पहिल्यांदा ४ ऑक्टोबरला हलविण्यात आला.

दरवर्षी झिमरमन यांनी जागतिक प्राणी दिनाच्या प्रचारासाठी अथक परिश्रम घेतले. शेवटी पर्यावरणासोबतच प्राण्यांचेही संरक्षण व्हावे, तसेच लोकांमध्ये प्राण्यांविषयी संवेदनशीलता आणि आपुलकीची भावना जागृत व्हावी यासाठी मे १९३१ मध्ये इटलीतील फ्लोरेन्स येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसच्या पर्यावरण परिषदेमध्ये ४ ऑक्टोबर हा जागतिक प्राणी दिन म्हणून सार्वत्रिक करण्याचा त्यांचा प्रस्ताव सवार्नुमते मान्य करण्यात आला आणि ठराव म्हणून स्वीकारण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी ४ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक प्राणी दिवस' म्हणून ओळखला जातो.

या दिवसाच्या समर्थनार्थ राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह भारतभर दरवर्षी दि. २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान भारतातील वनस्पती आणि प्राणी यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो. या दरम्यान वन्यजीव सप्ताह- नॅशनल वाइल्डलाईफ वीक साजरा केला जातो. या वर्षी आपण ७० वा वन्यजीव सप्ताह साजरा करत आहोत.

वन्यजीव सप्ताह करिता भारतीय वन्यजीव मंडळाची स्थापना करण्यात आली आणि भारताच्या वन्यजीवांचे संरक्षण करण्याच्या दीर्घकालीन उद्दिष्टांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १९५२ मध्ये वन्यजीव सप्ताहाची संकल्पना मांडण्यात आली. सुरुवातीला वन्यजीव दिन १९५५ मध्ये साजरा करण्यात आला, तदनंतर १९५७ मध्ये वन्यजीव सप्ताह म्हणून श्रेणी सुधारित करण्यात आला. नामशेष होत चाललेल्या वन्य पशुपक्ष्यांबाबत जागृती निर्माण करणे हा त्यामागील हेतू आहे. आता या मूळ हेतूचा काळानुसार विस्तार झाला आहे. वन्यजीवांनी मानवी आयुष्यात प्रवेश करण्यामागची कारणे समजावून दिली जात आहेत. खरे तर कोणताही वन्यजीव स्वतःहून माणसांवर हल्ला करत नाही. परंतु त्यांच्या राहण्याच्या जागेवर शेती, रस्ते वा बांधकामाच्या रूपाने होणारे मानवी आक्रमण मर्यादेपलिकेडे गेले की ते जंगलाच्या सीमेवरील खेड्यांत घुसून मुख्यतः पोटासाठी गाई गुरे मारतात व त्यातून मानव आणि वन्यजीव असा संघर्ष उद्भवतो.

भारतासहित जगातील इतरही पुरातन संस्कृतींमध्ये सांगितल्याप्रमाणे मानव आणि वन्यजीवात मैत्री असणे ही संपूर्ण पृथ्वीची गरज आहे, कारण वन्यजीवांखेरीज मानव सुखाने राहूच शकणार नाही. ही जागृती रुजवण्यासाठी भारत सरकारने इंडियन बोर्ड ऑफ वाईल्डलाईफची स्थापना पूर्वीच केली आहे. जंगल सीमेवरील स्थानिकांना याबाबत योग्य माहिती, मार्गदर्शन व सुविधा पुरवावी तसेच वन्यजीवांबद्दल माहिती मिळवून त्यांचा जीवनक्रम समजून घ्यावा; ज्यामुळे त्यांच्याबद्दलचे गैरसमज दूर होऊ शकतील.

जागतिक प्राणी दिनाच्या चळवळीला ॲनेका स्वेन्स्का, ब्रायन ब्लेस्ड आणि मेलानी सी सारख्या अनेक सेलिब्रिटींनी समर्थन दिले आहे. सर्व सृष्टीवर प्रेम कराह्न हे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारे सांगितले आहे. जगात अनेक ठिकाणी प्राणिमात्रांना क्रूरपणे वागवले जाते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षच केले जाते. वाढत्या लोकसंख्येमुळे पूर्वीची घनदाट जंगल तुटून तिथे गावाची नगरे व नगरांची महानगरे होत असताना भरपूर प्रमाणात जंगल तोड झाली. त्यामुळे प्राण्यांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे.

काही पाळीव प्राण्यांना अतिशय चांगले वागवले जाते, तर काहींना दिवसभरात खायलाही मिळत नाही. ही समस्या जगापुढे आणण्यासाठी जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. लहान-मोठ्या, पाळीव-भटक्या अशा सर्व प्राणिमात्रांचा यांमध्ये समावेश होतो. अर्जेंटिना मध्ये 1908 पासून हा दिवस 29 एप्रिल रोजी पाळला जातो, ज्याला ब्युनोस आयर्सच्या प्राणी संरक्षण संघटनेचे अध्यक्ष इग्नासिओ लुकास अल्बारासिन यांनी प्रोत्साहन दिले 1926 मध्ये त्याच तारखेला अल्बररासिन मरण पावले, त्यामुळे देशातील प्राण्यांच्या हक्कांच्या चळवळीत अग्रगण्य असलेल्या त्यांना श्रद्धांजली वाहण्याचा हा दिवस बनला.

2003 पासून जागतिक प्राणी दिन संयुक्त राष्ट्र स्थित प्राणी कल्याण चॅरिटी, नेचरवॉच फाउंडेशन द्वारे 2023 च्या उत्सवासाठी लाँच केलेल्या नवीन जागतिक प्राणी दिन वेबसाइटसह समन्वयित केले आहे. बोलिव्हिया, बहामास, चीन आणि कोलंबिया सारख्या अनेक देशांनी जागतिक उत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक कार्यक्रम चालवले आहेत. आज जागतिक प्राणी दिनानिमित्त सर्व प्राणी प्रेमींना हार्दिक शुभेच्छा!

●●●●●●●●●



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

# तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ॲपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ?पल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.

स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला.

सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता.

दोघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले.

कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ॲपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली.

त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ॲपल 1 पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्हने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ॲपल कंपनी सोडली.

१९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ॲनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ॲपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ॲपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ॲपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ॲपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले.

आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ॲपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ॲपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला.

टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ॲपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते.

स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन! ■ ■ ■



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५



# देवीची विविध रूपे आणि उपासना !

कार्यानुसार देवीने विविध रूप धारण करून भक्तांचे रक्षण केले आहे. बऱ्याच देवींच्या मूर्ती द्विभुज असतात. लक्ष्मीदेवी आणि सरस्वतीदेवी यांच्या मूर्ती चतुर्भुज अन् दुर्गादेवीची मूर्ती अष्टभुज असते. विविध देवी कार्यानुसार विविध संख्येने हात धारण करतात. देवीने धारण केलेल्या हातांच्या संख्येवरून तिची कर्मेंद्रिये किती प्रमाणात कार्यरत असतात, हे आपल्याला लक्षात येते.

देवीचा उजवा हात आशीवार्दाच्या म्हणजे वरद मुद्रेत, तर काही वेळा डावा हाता अभयमुद्रेत असतो किंवा तिच्या हातात पायसपात्र (पायस म्हणजे तांदळाची खीर), कमळ किंवा अग्नीकुंड असते. ममत्व, वात्सल्य, प्रीती, प्रेरणा, मेधा, धारणा, कार्यशीलता, आवेश, सद्बुद्धी आणि क्षमा ही देवीची विविध गुणवैशिष्ट्ये आहेत.

**देवीशी संबंधित ग्रंथ :** दुर्गासप्तशती, देवीपुराण, देवीभागवत हे देवीशी संबंधित ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**देवीशी संबंधित स्तोत्र, अष्टक आणि कवचः** मंगल चंडिकास्तोत्र, श्री दुर्गास्तोत्र, श्री अन्नपूर्णास्तोत्र, श्री शताक्षीदेवीस्तोत्र, श्री लक्ष्मीस्तोत्र, श्री चंडिकवच (देवीकवच), श्री महालक्ष्मी अष्टक, श्री भवानी अष्टक, श्री सूक्त इत्यादी देवीशी संबंधित स्तोत्रे, अष्टक आणि कवच आहेत.

**देवीच्या संदर्भातील गीतेः** स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वातंत्र्यलक्ष्मीस्वरूप भारतमातेवर ह्यजयोस्तुते श्री महान मंगले शिवास्पदे शुभदे, आणि ह्यने मजसि ने परत राष्ट्रभूमीला, सागरा प्राण तळमळला ही रचलेली गीते सुप्रसिद्ध आहेत. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी वन्दे मातरम् या गीतात भारतमातेचे वर्णन दुर्गादेवीच्या रूपात केलेले आहे. डॉ. आठवले यांनी शक्तीस्तवन या गीतात दिव्य शक्तीचे तिच्या आध्यात्मिक गुणवैशिष्ट्यांसह वर्णन केले आहे.

**देवीच्या आरती :** श्री गंगा, तुळशी, भवानी, कोल्हापूरची अंबाबाई, दुर्गामाता, महाकाली, एकवीरादेवी, सरस्वतीदेवी, अन्नपूर्णादेवी, सप्तशृंगीदेवी, शांतादुर्गादेवी आणि नवरात्रीतील देवी यांच्या आरती प्रसिद्ध आहेत.

**देवीचे श्लोक :**

१. कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनीम् ॥

अर्थ : हाताच्या अग्रभागी लक्ष्मी वास करते. हाताच्या मध्यभागी सरस्वती आहे अन् मूळ भागात गोविंद आहे; म्हणून सकाळी उठल्यावर आधी हाताचे दर्शन घ्यावे.

२. सर्वमङ्गलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ॥

अर्थ : सर्व मंगल गोष्टींमधील मांगल्यस्वरूप, पवित्र, सर्व इच्छा साध्य करून देणाऱ्या, सर्वांचे शरणस्थान असलेल्या, त्रिनेत्रधारिणी, हे गौरवर्णी नारायणीदेवी (पार्वती), मी तुला नमस्कार करतो.

३. या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम : ॥

अर्थ : हे देवी, तूच सर्व प्राणीमात्रांमध्ये शक्तीच्या रूपाने स्थित आहेस. आम्ही तुला पुनःपुन्हा नमन करतो.

●●●● (क्रमशः) ●●●●

**वाचक लिहितात**

# गरब्यात केवळ हिंदूंनाच प्रवेश द्या!

नवरात्री हा श्री आदिशक्तीच्या उपासनेचा, मांगल्याचा आणि पावित्र्याचा सण आहे; पण आज देशभरात वाढत असलेले महिलांवरील अत्याचार, लाखोंच्या संख्येने महिला बेपत्ता होणे, लव्ह जिहादच्या माध्यमातून हिंदू युवतींना लक्ष्य करणे आदी अनेक प्रकार मोठ्या प्रमाणात उघडकीस येत आहेत. त्यामुळे नवरात्रोत्सवामध्ये लव्ह जिहाद्यांपासून महिलांची सुरक्षितता, तसेच उत्सवांचे पावित्र्य जपणे आवश्यक आहे.

म्हणूनच ज्यांना मूर्तीपूजा मान्य नाही, अशांना नवरात्रीमध्ये देवीच्या मूर्तीसमोर गरबा खेळण्यासाठी प्रवेश देऊ नये. गरबा हा हिंदूंचा धार्मिक सण आहे. हिंदू देवतांवर श्रद्धा असणाऱ्यांनीच तेथे यावे. जे मूर्तीपूजा न मानणारे गरब्यात शिरण्याचा प्रयत्न करतात, त्यातून पुढे लव्ह जिहादह्नचा धोकाही निर्माण होण्याची शक्यता आहे. लव्ह जिहाद रोखण्यासाठी आणि उत्सवाचे पावित्र्य जपण्यासाठी गरब्यात केवळ हिंदूंनाच प्रवेश द्यावा.

या संदर्भात गुजरात, मध्यप्रदेश राज्यांसह महाराष्ट्र सोलापूर जिल्ह्यांतील पोलिसांनी महिलांची सुरक्षेसाठी प्रत्येकाचे आधारकार्ड पाहून प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे, त्याचे आम्ही मनापासून स्वागत करतो; मात्र हा नियम केवळ काही राज्ये वा जिल्ह्यांत नव्हे, तर संपूर्ण देशभरात लागू केला पाहिजे.

आज देशभरात बेकायदेशीररित्या घुसखोरी केलेल्या बांगलादेशी आणि रोहिंग्या मुसलमानांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या घुसखोरांचा गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभाग असल्याचे सुरक्षा यंत्रणांना आढळून आले आहे. हे अतिशय गंभीर असून नवरात्रोत्सवामध्ये काही घातपात करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे गरबा आयोजकांनी हा विषय गंभीरतेने घ्यायला हवा.

ज्या अहिंदूंना नवरात्रीमध्ये गरब्यात सहभागी व्हायचे असेल, तर प्रथम हिंदु धर्म स्वीकारावा. हिंदु देवतांची पूजाअर्जा करावी. मग गरबोत्सवात सामील व्हावे. एरवी गणेशोत्सव, रामनवमी आदींच्या मिरवणुका निघतात, त्या वेळी चुकून अंगावर गुलाल पडला किंवा मोठ्या आवाजात लाऊड स्पीकर्स लावले अशा कारणांमुळे दंगली घडवणारे नवरात्रीच्या गरब्यात आनंदाने कसे काय सहभागी होतात? हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे कोणत्या हेतूने अहिंदु गरब्यात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात, हे महत्त्वाचे आहे.

नवरात्री म्हणजे नऊ दिवस देवीची भक्तीभावाने करायचे व्रत असून त्याचे पावित्र्य जपणे आवश्यक आहे. सध्या नवरात्रीमध्ये चित्रपटांतील अश्लील गाणी लावणे, त्यांवर हिडीसपणे नाचणे, महिलांची छेडछाड करणे, तोकडे कपडे घालून गरब्यात सहभागी होणे आदी प्रकार होतात. यांतून महिलांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते, त्यामुळे हे आपण टाळले पाहिजे. तसेच उत्सवांचे बाजारीकरण रोखण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत.

■ रमेश शिंदे
राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती
९९८७९६६६६६

### समष्टी सेवेतील अडथळे - आपले षडरिपू!

आपण जेव्हा आपल्या सहकाऱ्यांसोबत काही सेवा किंवा कार्य करीत असतो; तेव्हा काही लहानमोठ्या प्रसंगामुळे कधीकधी एकमेकांशी मतभेदांचे किंवा वादविवादांचे प्रसंग निर्माण होतात. आपल्या मनाविरुद्ध काही गोष्टी झाल्यात, की लगेच मनात प्रतिक्रिया येऊन राग येतो आणि मनमुटावाची परिस्थिती निर्माण होते. असं का होतं याचा थोडसं अंतर्मुख होऊन विचार केला तर असं लक्षात येतं की आपल्या रागाला, संतापाला दुसरा कोणी कारणीभूत नसून आपण स्वतः आणि आपलाच दुबळेपणा कारणीभूत असतो !

नीतिशास्त्रात माणसाचे सहा शत्रू सांगितलेले आहेत. त्यांना आपण षडरिपू म्हणून संबोधतो आणि ते म्हणजे काम, क्रोध, लोभ, मद मोह व मत्सर. यापैकी कोणाही एकाच्या तावडीत माणूस सापडला, तरी त्याचे स्वतः वरील नियंत्रण सुटते. श्रीगीतेच्या १८ व्या अध्यायातील ६३ व्या श्लोकात या संदर्भात खालीलप्रमाणे छान सांगितले आहे. 'रागामुळे अत्यंत मूढता म्हणजे अविचार उत्पन्न होतो. त्यामुळे स्मरणशक्ती भ्रष्ट होऊन बुद्धीचा नाश होतो. बुद्धीचा नाश झाला की माणसाचे अंधःपतन होते.'

आपल्या हातून रोजच्या व्यवहारात कळत किंवा नकळत चुका होतच असतात. याबाबतीत आपण काय करू शकतो? तर गव एखादी चूक झाली तर ती स्वीकारुन लगेच तिच्यात सुधार करणे हाच योग्य पर्याय निवडू शकतो. कोणालाही आपल्या वर्तणुकीने किंवा शब्दानं वाईट वाटेल असे वागू नये. यदाकदाचित असे कधी घडलंच तर, आपली चूक मनमोकळेपणाने स्वीकारुन संबंध अबाधित राखता आले पाहिजे. आपले एक कुटुंब आहे असा भाव ठेवून, ताण वाढणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. कोणाबद्दलही अनुचित वक्तव्य करुन दुसरा दुखावेल असे वागण्याचे टाळावे. त्यामुळे वातावरण खराब होऊन आपण हाती घेतलेल्या कार्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता असते. अनेक लोकांना आपण स्पष्ट वक्ते असल्याचा उगाचच अभिमान असतो. तो एक प्रकारचा सुप्त अहंच असतो. त्यामुळे अशी व्यक्ती स्वतःच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवण्यास कमी पडून उगाचच लोकांशी नकळत वैरत्व ओढवून घेते. एखाद्याबद्दलचे दोष योग्य शब्दांमध्ये सांगता आले पाहिजे; अन्यथा त्या व्यक्तीमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. त्या व्यक्तीच्या गुणांबद्दल ही बोलण्याचे धारिष्ट्य आपल्या अंगी असावयास पाहिजे. ते व्यक्त करता ही आले पाहिजे. प्रेम भाव आणि आपुलकी वाढण्यास मदत होऊन आपल्यातील नेतृत्व गुणांची वृद्धी होण्यास सहाय्य होते.

■ श्रीकांत रामचंद्र पाध्ये
नागपूर. ८२७५८६५२८५

## अशोकायन

### अभिजात दर्जा

आनंदी आनंद गडे
महाराष्ट्रात चहूकडे
माय मराठीला मिळाला
उशीरा का होईना दर्जा
हे ही नसे थोडके!

श्रेय घेण्या यशाचे आता
अगणित हस्ती येतील पुढे
मुकश्रोता बनुनी तू यांची
पॉलीटीकल पॉलीसी पहा गडे

दर्जा तर मिळाला पुढे काय?
कॉन्व्हेंटची संख्या
घटेल काय?
येतील पुनश्च मराठीला
सोनियाचे दिस
हे सपन पूर्ण होईल काय?



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# सीग्राम्स रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने क्रिकेट आयकॉन सूर्यकुमार यादवसोबत लाँच केले #CelebrateLarge उत्सव अभियान

**नवी दिल्ली, ४ ऑक्टोबर :** भारतात उत्सवाच्या जल्लोषाला प्रारंभ करतांना, रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने #CelebrateLarge हा नवीन अभियान सुरु केला आहे. हा अभियान दर्शवतो की आजच्या युवकांना विविध उत्सवांना त्यांच्या अनोख्या स्टाईल आणि ऊर्जेने कसे सजवायचे आहे. अभियानाचा टॅगलाइन - जनरेशन लार्ज का सेलिब्रेशन लार्ज युवा पिढीच्या या इच्छेला ब्रँडच्या 'लिव्ह इट लार्ज' तत्त्वज्ञानासोबत सुंदरपणे जोडतो. या अभियानात भारताचा टी२० क्रिकेट कप्तान सूर्यकुमार यादव याचा समावेश आहे आणि हे एक एंगेजमेंट-केंद्रित३६० डिग्री अभियान आहे, ज्यामध्ये एक इंटरएक्टिव एआय फिल्म, एक नवोन्मेष एआर सक्षम उत्सवी कॅनवास आणि भारतीय क्रिकेट सुपरस्टार सूर्यकुमार यादव याच्यासोबत उत्सव साजरे करण्याची संधी समाविष्ट आहे.

एफसीबी इंडिया सोबतच्या सहकार्यात तयार केलेल्या या अभियानात, प्रत्येक टचपॉइंट युवांना लिव्ह इट लार्ज ची प्रेरणा देण्याचे आणि त्यांच्या उत्सवाला नवीन स्तरावर नेण्याचे उद्दिष्ट ठेवते. अभियानाची फिल्म विविध क्षेत्रांतील सर्व प्रमुख उत्सवांचे सुंदर प्रदर्शन करते आणि सूर्यकुमार यादवसोबत #CelebrateLarge साजरे करण्यासाठी दर्शकांना आमंत्रित करते. संपूर्ण अनुभव आजच्या युवांना, म्हणजेच डिजिटल नेटिव्हसाठी लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे, ज्यामुळे त्यांना एक सोपी युजर जर्नी मिळते. रीजेनरेटिव एआय ची शक्ती वापरून एसकेवाय सोबत एक अद्वितीय वैयक्तिक उत्सव अनुभव तयार केला गेला आहे. क्रिकेटरकडून एआय -निर्मित वैयक्तिक शुभेच्छा देखील संपूर्ण ग्राहक अनुभवात एक रोमांचक घटक जोडतात. दर्शकांना सूर्यकुमार यादवसोबत उत्सव साजरे करण्याची एक अद्वितीय संधी देखील यामुळे मिळत आहे, ज्यामुळे त्यांचे उत्सव खरोखरच लार्ज बनतात.

या दरम्यान, प्रिंट आणि आउटडोर अभियानाच्या संप्रेषणावर क्यूआर कोड स्कॅन केल्यास, दर्शक एक एआर व्हर्जन अनलॉक करू शकतात, जो बारीकीने तयार केलेल्या उत्सवी कॅनवासचे प्रदर्शन करते, जे उत्सवाच्या विविध पैलूंना त्याच्या संपूर्ण भव्यतेसह दर्शवते. जनरेशन लार्ज त्यांच्या खाद्य, संगीत, फॅशन, उपहार आणि शुभेच्छांच्या सर्व उत्सवी इच्छांची यादी अद्ययावत ठेवू शकते, www.royalstagfan.com या ब्रँडच्या फॅन कम्युनिटी पेज वर जाऊन, जेथे त्यांना टॉप ट्रेंडिंग उत्सवी माहिती मिळेल. या अभियानाचा प्रचार डिजिटल, प्रिंट, रेडियो आणि ऑउटडोर (ओओएच) मध्ये एका उच्च-डेसिबल३६०-डिग्रीप्रोजनाद्वारे केला जाईल, जेणेकरून एक इमर्सिव, अविस्मरणीय अनुभव प्रदान केला जाऊ शकेल.

पर्नोड रिकार्ड इंडिया चे चीफ मार्केटिंग ऑफिसर आणि ग्लोबल बिजनेस डेवलपमेंटचे प्रमुख कार्तिक मोहिंद्रा म्हणतात, उत्सव हे युवांसाठी त्यांच्या अनोख्या स्टाईल आणि ऊर्जा यांचा समावेश करण्यासाठी परिपूर्ण प्रसंग असतात, ज्यामुळे ते वर्षांनुवर्षे लक्षात ठेवण्यायोग्य आठवणी तयार करतात, आणि नक्कीच, त्यांना 'लिव्ह इट लार्ज' करण्याची संधी मिळते. ब्रँडच्या तत्त्वांनुसार, आमचा सावधपणे तयार केलेला #CelebrateLarge ३६०-डिग्री अभियान विविध अनुभवांची ऑफर देतो, जो या युवा आत्म्याचे प्रतिबिंबित करतो आणि जनरेशन लार्जला सर्वात मोठा उत्सव साजरा करण्यास सक्षम देखील बनवतो.

एफसीबी इंडिया चे चीफ क्रिएटिव ऑफिसर मयुरेश दुबाशी म्हणतात, आजच्या युवामध्ये प्रत्येक उत्सव लार्ज करण्याची एक स्वाभाविक इच्छा आहे. या भावना उत्सवाच्या काळात आणखी जिवंत होतात. या वर्षी, आमच्या #CelebrateLarge अभियानाद्वारे, आम्ही या पिढीला एक अनोखा इंटरएक्टिव्ह प्लॅटफॉर्म देत आहोत ज्याद्वारे ते त्यांच्या उत्सवांचा आनंद पहिल्यांदाच तसाच घेऊ शकतील. रीजेनरेटिव एआय, एआर आणि खाद्य, उपहार, संगीत, फॅशन सिफारिशांसह एक नवीन जीवंत उत्सवी कॅनवास वापरून, आम्ही त्यांना 'लिव्ह इट लार्ज' करण्यासाठी प्रेरित करू इच्छित आहोत.

## ॲक्सिस बँकेतर्फे दिल से ओपन सेलिब्रेशन्सची घोषणा

**मुंबई ४ ऑक्टोबर :** ॲक्सिस बँक या भारतातील सर्वात मोठ्या खासगी क्षेत्रातील बँकेने आज दिल से ओपन सेलिब्रेशन्स लाँच केले असून त्याअंतर्गत ई-कॉमर्स, लाइफस्टाइल, इलेक्ट्रॉनिक्स, प्रवास, डायनिंग आणि किराणावर आकर्षक डील्स व सवलती जाहीर केल्या जाणार आहेत. या ऑफर्सशिवाय बँकेच्या ग्रॅबडील्स प्लॅटफॉर्मवर ५० पेक्षा जास्त लोकप्रिय ब्रँड्स आणि आघाडीच्या भारतीय ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर अतिरिक्त कॅशबॅकचाही लाभ घेता येणार आहे. https://grabdeals.axisbank.com/

ग्राहकांना आघाडीच्या ब्रँड्सवर २५ टक्क्यांपर्यंतची सवलत मिळणार आहे (अमेझॉन, फ्लिपकार्ट, मॅक्स फॅशन, मिंत्रा, तिरा, व्हेरो मोडा), इलेक्ट्रॉनिक्स (आयएफबी, मोटोरोला, रिलायन्स डिजिटल, सॅमसंग, झियोमी), लक्झरी लाइफस्टाइल (कोच, ह्युगो बॉस, मायकेल कॉर्स, तुमी), डायनिंग आणि किराणा (ब्लिंकिट, ईझी डायनर, स्विगी) या व अशा विविध वस्तूंच्या खरेदीवर सवलत दिली जाणार आहे. ज्या ग्राहकांना आपल्या प्रियजनांना भेटण्यासाठी दुसऱ्या शहरात प्रवास करायचा आहे किंवा त्यांना सुट्टीसाठी फिरायला जायचं आहे, त्यांना क्लियरट्रीप, कॅथे पॅसिफिक, मेकमायट्रिप, पेटीएम फ्लाइट्स आणि यात्रा अशा ट्रॅव्हल पार्टनर्सच्या मदतीने तत्काळ बचत करता येईल. सुलभ पेमेंट आणि लवचिकतेसाठी ग्राहकांन आकर्षक ईएमआय प्लॅन्सचाही वापर करता येईल.

ॲक्सिस बँकेच्या ग्राहकांना फ्लिपकार्टवर केलेल्या सर्व खरेदीवर ५ टक्के कॅशबॅक मिळणार आहे. ही ऑफर ६ ऑक्टोबर २०२४ पर्यंत बँकेच्या ग्रॅब डील्स डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून ग्राहकांना ३००० रुपयांपर्यंतचा कॅशबॅक मिळवता येईल.

ॲक्सिस बँकेद्वारे या ऑफर्सचा प्रचार करण्यासाठी मल्टीमीडिया कॅम्पेन लाँच करण्यात आले आहे. हे कॅम्पेन अच्छाई कभी रूकनी नही चाहिये चांगलं काम सुरू राहिलं पाहिजे या तत्वावर आधारित असून ते वर्षभर सुरू राहाणार आहे. या कॅम्पेनचा पहिला टप्पा ओणम आणि गणेश उत्सवादरम्यान लाँच करण्यात आला होता व आगामी टप्पा नवरात्री आणि दिवाळीवर लक्ष केंद्रित करणार आहे.

हे कॅम्पेन एसीएचएच.एआय हे एआय स्थित पोर्टल लाँच केले जाणार आहे, जे ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार फेस्टिव्ह ऑफर्स शोधण्यास आणि सोप्या, प्रेरणादायी भलाईची कामं करण्यास मदत करेल.

याप्रसंगी ॲक्सिस बँकेच्या कार्ड्स व पेमेंट विभागाचे अध्यक्ष संजीव मोघे म्हणाले, या सणासुदीच्या हंगामाच काही नामवंत ब्रँड्सशी भागिदारी करून ग्राहकांना सर्वोत्तम पर्याय आणि ऑफर्स देताना आम्हाला आनंद होत आहे. सणासुदीचा आनंद द्विगुणित करणे आणि खरेदी, लक्झरी लाइफस्टाइल, प्रवास, डायनिंग आणि किराणा यावर मोठ्या प्रमाणावर सवलत देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. आम्हाला आशा आहे, की ग्राहक यातील लाभ, सवलती, कॅशबॅक्सचा आनंद घेतील आणि सणांचा आनंद अविस्मरणीय करतील.



## सा रे ग म पच्या सेटवर तृप्ती डिमरीला तुम जो मिले हो हे गाणे गाताना पाहायला विसरू नका!

**मुंबई ४ ऑक्टोबर :** आपल्या नव्या आवृत्तीच्या प्रसारणाद्वारे सा रे ग म प कार्यक्रमाने धमाकेदार पुनरागमन केले असून त्यातील भारतातील ताज्या दमाच्या गायकांच्या आवाजाने प्रेक्षकांवर मोहिनी घातली आहे. सहा थरारक भागांनंतर नव्या गायकांच्या संगीतमय वाटचालीसाठी हा कार्यक्रम सिध्द झाला आहे. या आवृत्तीत लोकप्रिय संगीतकार जोडी सचिन-जिगर हे परीक्षक असून त्यांना सचेत-परंपरा गुणी संगीतकार दाम्पत्याची तसेच नामवंत गायक-गीतकार गुरू रंधावा या कलाकारांची साथ लाभली आहे. विपुल रॉय आणि सलमान अली या गुणी कलाकारांकडून कार्यक्रमाचे संचालन केले जात असून हा कार्यक्रम भारतातील भावी गायकांच्या गायनकलेचे प्रतीक बनला आहे.

आगामी नवरात्री स्पेशल भव्य प्रीमिअर भागात राजकुमार राव आणि तृप्ती डिमरी हे बॉलीवूडचे कलाकार अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिच्यासह विशेष अतिथी म्हणून सहभागी होतील. किंबहुना आल्या आल्याच तृप्ती डिमरीने आपण यात सहभागी होत असल्याची उत्सुकता व्यक्त केली, सा रे ग म पच्या व्यासपिठावर येणं ही माझी लहानपणापासूनची इच्छा होती. राजकुमार रावने तृप्तीच्या गायनकलेची प्रशंसा करताना म्हटले, तृप्तीने गायनाचं शास्त्रोक्त शिक्षण घेतलं आहे.

राजकुमार रावने तृप्तीच्या गायनकलेचे गुपित उघड करताच तृप्तीने व्यासपिठावर येऊन आपल्या आगामी चित्रपटातील तुम जो मिले हो हे गाणे आपल्या सुरेल आवाजात गाऊन प्रेक्षकांना संमोहित करून टाकले. या बहुप्रतीक्षित भागात या दोन कलाकारांनी स्पर्धकांशी संवाद साधला आणि संगीताबद्दल आनंद व्यक्त केला. त्यांच्या उपस्थितीने या कार्यक्रमाच्या औत्सुक्यात नवा रंग भरला.

# सेंट-गोबेनजिप्रोक इंडियाने उत्तर प्रदेशातील गोंडा येथे नवीन प्रशिक्षण केंद्र सुरू केले

**नागपूर, ४ ऑक्टोबर :** सेंट-गोबेन जिप्रोक इंडियाला उत्तर प्रदेशातील गोंडा येथे आपल्या नवीनतम निवासी प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्याची घोषणा करताना आनंद होत आहे, जे भारताच्या बांधकाम क्षेत्रात कौशल्य विकासासाठी दीर्घकालीन वचनबद्धतेमध्ये एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड आहे. हे केंद्र देशातील ९ वे जिप्रोक प्रशिक्षण केंद्र आहे. या उपक्रमाचा उद्देश ड्रायवॉल आणि खोट्या कमाल मर्यादेच्या व्यवसायांमध्ये मोफत, उद्योग-संबंधित प्रशिक्षण देणे हा आहे, विविध सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींना त्यांचे कौशल्य वाढविण्याची आणि त्यांच्या रोजगाराच्या संधी सुधारण्याची संधी मिळावी यासाठी.



एक दशकाहून अधिक काळ, जिप्रोकने कुशल कामगारांमधील गंभीर अंतर दूर करण्यासाठी उद्योगाशी संबंधित कौशल्यांसह व्यक्तींना सुसज्ज करून भारताच्या बांधकाम लँडस्केपमध्ये बदल केला आहे. जिप्रोकची वचनबद्धता तांत्रिक ज्ञान प्रदान करण्याच्या पलीकडे जाते, आधुनिक बांधकामाच्या विकसित गरजांशी जुळवून घेण्यास सक्षम भविष्यातील तयार कामगार तयार करण्यासाठी एक समग्र दृष्टिकोन समाविष्ट करते. गोंडा प्रशिक्षण केंद्र या मोहिमेला आणखी अधोरेखित करते, ड्रायवॉल आणि खोट्या कमाल मर्यादांच्या स्थापनेत विशेष कार्यक्रम ऑफर करते जे कामगारांना अर्थव्यवस्थेच्या सर्वात महत्वाच्या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यास सक्षम करते.

बांधकाम उद्योगाचा वेगाने विस्तार होत असल्याने कुशल कामगारांची मागणी सर्वकाळ जास्त आहे. या मागणीची पूर्तता करण्यात जिप्रोकच्या प्रशिक्षण केंद्रांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे, जेणेकरून प्रशिक्षकांना व्यापक, व्यावहारिक अनुभव मिळेल ज्यामुळे त्यांची तांत्रिक क्षमता वाढेल आणि त्यांची दीर्घकालीन रोजगारक्षमता वाढेल. सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीकडे दुर्लक्ष करून, सर्वसमावेशकतेसाठी आणि संधींमध्ये समान प्रवेश प्रदान करण्यासाठी जिप्रोकच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करून हे प्रशिक्षण विनामूल्य दिले जाते. याव्यतिरिक्त, सहभागींना जॉब प्लेसमेंट सहाय्याचा फायदा होईल, स्थिर, चांगले वेतन मिळविण्याच्या त्यांच्या मार्गांना आणखी मजबूत करेल.

सेंट-गोबेन इंडिया-जिप्रोक बिझनेसचे व्यवस्थापकीय संचालक सुदीप कोलटे यांनी या उपक्रमावर भाष्य केले: प्रथम फाउंडेशनबरोबरची आमची भागीदारी संपूर्ण भारतात कौशल्य विकास करण्याच्या आमच्या मोहिमेसाठी महत्त्वाची आहे. गोंडा प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनासह, आम्ही बांधकाम उद्योगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये असलेल्या व्यक्तींना सक्षम बनविण्याच्या आमच्या वचनबद्धतेची पुष्टी करतो. त्यांना विशेष ज्ञान आणि व्यावहारिक तज्ञांसह सुसज्ज करून, आम्ही भविष्यातील तयार कार्यबल तयार करण्यात मदत करत आहोत जे भारताच्या पायाभूत सुविधांच्या शाश्वत वाढीस समर्थन देईल.

कौशल्य निर्मिती आणि व्यावसायिक प्रशिक्षणात जिप्रोकची भूमिका शाश्वत वाढीसाठी त्याच्या धोरणाचा आधारस्तंभ आहे. २०१३ पासून कंपनीने एक अशी परिसंस्था तयार करण्यासाठी स्वतःला समर्पित केले आहे जिथे व्यक्ती उद्योग-विशिष्ट कौशल्ये प्राप्त करू शकतात जे केवळ नियोक्त्यांच्या तात्काळ मागण्या पूर्ण करत नाहीत तर त्यांना दीर्घकालीन करिअर प्रगतीसाठी देखील तयार करतात. जिप्रोक उच्च दर्जाचे, व्यावहारिक प्रशिक्षण देते जे शैक्षणिक सिद्धांत आणि वास्तविक जगाच्या अनुप्रयोगामधील अंतर कमी करण्यास मदत करते. गोंडा प्रशिक्षण केंद्रात तांत्रिक ज्ञान, सुरक्षा प्रोटोकॉल आणि शाश्वत बांधकाम पद्धतींचा समावेश असलेले सर्वसमावेशक शिक्षण अनुभव प्रदान केले जातील, जेणेकरून प्रशिक्षणार्थी हे भारताच्या विकसित बांधकाम गरजांमध्ये योगदान देण्यास सक्षम असलेले चांगले व्यावसायिक असतील.

येत्या काही वर्षांत, कौशल्य विकासाच्या माध्यमातून शाश्वत रोजगार संधी निर्माण करण्याच्या आपल्या दृष्टिकोनासाठी सेंट-गोबेन जिप्रोक इंडिया वचनबद्ध आहे. तळागाळातील प्रतिभा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करून, कंपनी भारताच्या बांधकाम क्षेत्राला स्पर्धात्मक, लवचिक आणि निरंतर यशासाठी तयार ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

## नौशीन अली सरदार यांनी स्वत:च्या आभूषणासह चंद्रिकाच्या लुकमध्ये वैयक्तिक स्टाइलची भर केली


**मुंबई ४ ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील नवीन मालिका 'वसुधा'मध्ये चंद्रिकाची प्रमुख भूमिका साकारणाऱ्या प्रख्यात अभिनेत्री नौशीन अली सरदार यांनी मालिकेधील त्यांच्या भूमिकेमध्ये आकर्षक लुकची भर केली आहे, ज्यासाठी त्या त्यांच्या वैयक्तिक कलेक्शनमधील आभूषणांचा वापर करत आहेत. कालातीत मोहकतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या नौशीन यांचा विश्वास आहे की हे समकालीन आभूषण त्यांच्या भूमिकेच्या वास्तविक लुकमध्ये अधिक आकर्षकतेची भर करतात, तसेच भावनिक संबंध जागृत करतात. ज्यामुळे त्या चंद्रिकाच्या भूमिकेत स्वत:ला पाहतात.

एथनिक दागिन्यांचे व्यापक कलेक्शन असण्यासोबत नौशीन चंद्रिकाची मोहकता व दर्जा अधिक उत्साहित करण्यासाठी आकर्षक आभूषणांची निवड करतात. भूमिकेच्या लुकप्रती त्यांच्या विचारशील योगदानामधून कलेप्रती त्यांची समर्पितता दिसून येते.

''मी माझ्या भूमिकांमध्ये नेहमी वास्तविकता व भावनिकतेची भर करण्याचा प्रयत्न करते,'' असे नौशीन म्हणाल्या. ''भूमिकेचा लुक आकर्षक दिसण्यासाठी मी माझ्या टीमसोबत बारकाईने काम करते. साडीचा रंग असो, मेकअप असो किंवा आभूषणे असो मला त्या प्रक्रियेमध्ये सामावून जाण्यास आवडते. सुरूवातीला मी त्यांना माझे वैयक्तिक कलेक्शन दाखवले आणि मी त्यामधून काही आभूषणे परिधान करत असल्याचे समजल्यानंतर त्यांना खूप आनंद झाला. माझ्या मते, भूमिकेसाठी माझ्या स्वत:च्या आभूषणांचा वापर करत असल्यामुळे मला भूमिकेमध्ये सामावून जाण्यास मदत होते.''

प्रेक्षक नौशीन अली सरदार यांची सिग्नेचर मोहकता आणि अद्वितीय स्टाइलचा अनुभव मिळण्याची अपेक्षा करू शकतात. त्या चंद्रिकाच्या भूमिकेमध्ये त्यांच्या मोहकतेची भर करतात, ज्यामधून मालिका 'वसुधा'मध्ये त्यांच्या व्हिज्युअली लक्षवेधक व संस्मरणीय परफॉर्मन्सची खात्री मिळते.

## शब्दकोडे क्रमांक १९४४




**आडवे शब्द :-**
१) मैने प्यार किया, दबंगचा नायक
५) सिद्ध
९) आईचा भाऊ
११) सातव
१२) सट्टयाचा एक प्रकार
१३) भावांच्या बायकांसंबंधी, सामाईक
१७) पाताळ
२०) दोन आण्याचे नाणे
२१) लक्ष्मीचे एक नाव
२३) हाड, छोटे हाड (ग्रा.)
२४) पक्के आश्वासन
२६) माळ, हार (हिं.)
२७) माल
२८) वर्णन करणे
२९) व्रत
३०) कलावंत
३२) एकरुप
३५) वरपांगी
३६) ढग
३७) नकार देणे
३९) वितरण
४१) दात
४३) किंमत
४४) पुरुष
४६) श्रीमंत
४८) हेतू, कारण
५१) साधारण, जेमतेम
५२) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
५४) कणव
५५) लाकूड कापण्याचे हत्यार
५७) कालाचे परिमाण
५८) कैवारी, सांभाळणारा
५९) मनाला आलेला थकवा
६१) कपाळाला झालेली खोलवर जखम
६३) अर्धवर्तुळाकार
६५) आजीची आई
६७) विवाहित स्त्री
६९) सुसर
७०) डोंगराचा उभा भाग
७१) आशीर्वाद
७२) तृष्णा
७३) दक्षतेचा इशारा
७४) दया

**उभे शब्द :-**
१) बाजरी
२) बारीक केस
३) वाकणे, नमणे
४) बाज, पलंग
५) होकार नसणे
६) प्रकृती
७) काढलेली सुट्टी
८) पाळलेले, माणसाळलेले (जनावर)
९) भ्रम, जादू
१०) बागवान
१४) धाक, दरारा
१५) स्तुती
१६) कलेचा साठावा अंश
१८) मागे-पुढे करणे, तारतम्य
१९) किंचित छोटा
२२) घराण्याला कलंक लावणारा
२५) फुटाणे
२६) मत्स्य
२८) वाईट इच्छा
२९) राबता, जाणे-येणे
३०) हात
३१) मोटार(इं.)
३३) आई (इं.)
३४) सापाची एक जात
३५) केस कापणे
३८) एकाद्याच्या वतीने भीड घालणे
४०) उलथणे
४२) धमकी
४५) प्रजा
४६) प्रतिष्ठित
४७) भविष्य कथनाचा एक प्रकार
४९) केलेला अंदाज
५०) तात्पर्य
५३) श्रीरामाची चरित्र गाथा
५५) नवाकोरा
५६) वागणूक
५७) यम, मृत्यू, वेळ
५८) लाकूड तासण्याचे हत्यार
५९) मनाला आलेला थकवा
६०) फिरता पहारा
६२) उष्ण
६४) किंमत
६५) जहाज, जहाजाचा मुक्काम
६६) पाणी, आयुष्य
६८) गाईचे पिल्लू
७०) कशा प्रकारचा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# केआयएमएस हॉस्पिटल्सने २५ नवीन रोबोटिक सर्जरी प्रोग्रॅम्ससाठी इन्ट्युइटिव्हशी केला करार

**नागपूर, ३ ऑक्टोबर :** भारतातील कॉर्पोरेट हेल्थकेअर क्षेत्रातील अग्रगण्य समूह अशी ख्याती असलेल्या कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (केआयएमएस) हॉस्पिटल्सने मिनिमली इनवेसिव्ह केअरमध्ये जागतिक तंत्रज्ञानात आणि रोबोटिक सहाय्यक शस्त्रक्रियांमध्ये आघाडीवर असलेल्या इन्ट्युइटिव्ह या कंपनीशी सामंजस्य करार केला आहे.





महाराष्ट्रातील नागपूर, नाशिक आणि ठाणे; कर्नाटकातील बंगळुरू; तेलंगणातील सिकंदराबाद, बेगमपेट, कोंडापूर व गचीबावली; आंध्र प्रदेशात विशाखापट्टणम, श्रीकाकुलम, राजमुंद्री, ओंगोल, कुरनूल, नेल्लोर व अनंतपूर; तसेच केरळमधील कन्नूर या शहरांमध्ये दा विंची यंत्रणा राबविण्यात येईल.

रुग्ण-केंद्रित प्रणाली आणि प्रक्रियांद्वारे दर्जेदार उपचार उपलब्ध करण्यासाठी केआयएमएस हॉस्पिटल्स कटिबद्ध आहे. देशातील ज्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये प्रगत शस्त्रक्रियांचे तंत्रज्ञान अद्याप पोहोचलेले नाही, तेथे इन्ट्युइटिव्हच्या सहकार्याने हे तंत्रज्ञान घेऊन जाण्याचे केआयएमएस हॉस्पिटल्सचे उद्दिष्ट आहे.आर्थिक मर्यादांमुळे उपचारापासून वंचित राहण्याची वेळ कोणत्याही रुग्णावर येणार नाही, याची तजवीज यातून करण्यात येईल.

या सहकार्याविषयी माहिती देताना केआयएमएस हॉस्पिटल्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. बोलिनेनी भास्कर राव म्हणाले, इन्ट्युइटिव्हसोबत भागीदारी करून केआयएमएस हॉस्पिटल्स आपल्या क्षमतांचा विस्तार करीत आहे, तसेच मिनिमल इनवेसिव्ह केअरच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार करीत आहे. हा आमच्या कटिबद्धतेचाच एक भाग आहे. रोबो-सहाय्यित शस्त्रक्रियेसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा विस्तार करूनभारतातील मध्यम व लहान शहरांमधील रूग्णांना दिलासा देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. याशिवाय, आमच्याशी संबंधित महाविद्यालये आणि संस्थांमधील वैद्यकीय विद्यार्थ्यांना रोबो-सहाय्यित शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण देण्याची योजना आम्ही आखत आहोत. या माध्यमातून आम्ही देशातील आरोग्यसेवेच्या भविष्यात आणखी योगदान देत आहोत.

भारतात १७० हून अधिक दाविंची प्रणाली बसविलेल्या आहेत. त्यांच्या सहाय्याने स्त्रीरोग, मूत्रविज्ञान, सामान्य शस्त्रक्रिया आणि ऑन्कोलॉजीयांसाठीच्या रोबो-सहाय्यित शस्त्रक्रियांकरीता ८५० हूनअधिक प्रशिक्षित सर्जन कार्यरत आहेत. जागतिकस्तरावर १४ दशलक्षाहून अधिक दाविंची प्रक्रिया पार पाडल्या गेल्या आहेत. त्यांबद्दलची माहिती ३८ हजारांहून अधिकवैज्ञानिकलेखांमध्ये देण्यात आली आहे. या प्रणालीची सुरक्षितता, परिणामकारकता आणि फायदे, उदा. शस्त्रक्रिया करताना कमीगुंतागुंत, रुग्णामध्ये जलद सुधारणा यांचीही माहिती या लेखांमध्ये आहे.

## सुशीलाच्या बाळाचा जीव वाचवण्याच्या प्रयत्नात पुष्पाची जाज्वल्य नारी शक्ती उफाळून आली

**मुंबई ४ ऑक्टोबर :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दाखवण्यात आलेल्या पुष्पा (करुणा पांडे) या धडाडीच्या स्त्रीच्या जबरदस्त कहाणीने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. अलीकडे मालिकेत नाट्यमय घटना घडल्या आहेत आणि रविराज (रणजीत खन्ना) व प्रभास (भव्य गांधी) मिळून सुशीलाच्या (तुलिका पटेल) बाळाचे अपहरण करतात आणि त्याला सोडण्याच्या बदल्यात अश्विन (नवीन पंडिता)चा जीव मागतात.

आगामी भागांमध्ये हे नाट्य आणखी तीव्र होते. सुशीलाचा मुलगा रोशन याला वाचवण्यासाठी पुष्पा या खतरनाक नाट्यात उडी घेते. रविराज तिला निर्वाणीचा संदेश पाठवतो, मुलाच्या बदल्यात मुलगा. ही भयंकर मागणी समोर आल्यावर पुष्पाचे मातृत्व आणि तिची नारी शक्ती उफाळून येते. तणाव वाढत जातो, परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागते, पण पुष्पा माघार घेण्यास नकार देते. आपल्या हिंमतीत आणि निर्धारात दुर्गा मातेची ताकद एकवटून एका निष्पाप जीवाला वाचवण्यासाठी ती आपले सर्वस्व धोक्यात घालते.

पुष्पाची दुर्दम्य इच्छाशक्ती त्या बाळाला वाचवण्यासाठी आणि कुटुंबाच्या रक्षणासाठी पुरेशी होईल का? पुष्पाला या संकटाला तोंड देताना पाहताना प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचेल.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, पुष्पाच्या समोर तिच्या जीवनातील एक अत्यंत कठीण संघर्ष आहे. भावनिक दृष्ट्या ती भीती आणि निर्धार यांच्या कात्रीत सापडली आहे.

# कृष्णमृगांवर उपचार आणि केले निसर्गाच्या हवाली



■ महासागर प्रतिनिधी,
वर्धा: दि. ४:

पीपल फॉर एनिमल्स द्वारा संचालित करूणाश्रम या वन्यजीव बचाव केंद्रा मार्फत राबविण्यात येत असलेले विविध वन्यजीव संवर्धन प्रकल्प कार्यरत आहे. त्यातील एक महत्वाचा भाग म्हणजे आपत्कालीन परिस्थितीतुन वाचविण्यात आलेले वन्य प्राण्यांची शुश्रुषा करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्याचे काम अविरतपणे सुरू आहे. सध्या सुरू असलेल्या वन्यजीव सप्ताह २०२४ च्या निमित्ताने राष्ट्रीय स्तरावर शासना तर्फे वन्यजीव संवर्धनासाठी होत असलेल्या विविध प्रयत्नांचा एक भाग म्हणजे बोर व्याघ्रप्रकल्प व पीपल फॉर एनिमल्स, वन्यजीव बचाव केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बोर व्याघ्रप्रकल्पाच्या विविध गवताळ भागात काळविटांचे वास्तव्य व संख्या या बाबत पाहणी करण्यात आली असता त्याठिकाणी संख्या वाढवि याकरिता पीपल फॉर एनिमल्स वन्यजीव बचाव केंद्रातील विविध भागातून वनविभागा मार्फत वाचविण्यात आलेल्या काळविटांची योग्य शुश्रूषा करून व त्यांची योग्य आरोग्य तपासणी करून त्यांच्या योग्य वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून बोर व्याघ्रप्रकल्पाच्या संरक्षित गवताळ प्रदेशात मुक्त करण्यात आले. यामध्ये मुख्यतः काळवीटांना, ४ मादी व एक नर, दोन अजगरांना असे एकुन ७ वन्यजीवांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. बोर मधील काळवीट संवर्धन अभियाना अंतर्गत काळविटांच्या संख्येत वाढ झाल्यास भविष्यात बोर व्याघ्र प्रकल्पात जैवविविधात बहरण्यात मदत होईल व सदर अभियान हे वन्यजीव प्रेमींकरिता वन्यजीव अभ्यास या दृष्टिकोनातून दिलासा देणारी बाब आहे. सदर प्रकल्प हा बोर व्याघ्रप्रकल्पाचे संचालक मंगेश ठेंगडी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक उपवनसंरक्षक दत्तात्रय लोंढे, हिंगणी बफर वनपरिक्षेत्र अधिकारी अभय तलहन, पीपल फॉर एनिमल्स वन्यजीव बचाव केंद्राचे संचालक आशिष गोस्वामी, वन्यजीव विभाग प्रमुख कौस्तुभ गावंडे पशुचिकित्सक डॉ. रोहित थोटा, क्षेत्रसहायक श्री खेलकर वनरक्षक अतुल अखंडे, काळे, ऋषिकेश गोडसे, अभिषेक खेडुलकर व देवर्षी बोबडे उपस्थित होते



# शिक्षिकांचा अभाव, अल्पवयीन मुलींच्या समुपदेशनात अडथळे

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. ४:

दिवसेंदिवस राज्यात मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी अल्पवयीन मुलींचे समुपदेशन होणे आवश्यक आहे. यासाठी शाळांमध्ये शिक्षिकांची संख्या पुरेशी हवी असताना जिल्ह्यातील ६२३ शाळांमध्ये एकही महिला शिक्षक नाही, अशी स्थिती आहे. मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना राज्यभरातून समोर येत आहेत. बहुतांशवेळा मुली आपला त्रास, समस्या या महिला कर्मचारी किंवा शिक्षिकांकडे मनमोकळेपणाने व्यक्त करतात. मात्र, त्याच समस्या पुरुष कर्मचाऱ्यांकडे सांगताना त्या संकोच करतात. त्यामुळे शाळेत एकतरी महिला कर्मचारी असावी. परंतु, जिल्ह्यातील अनेक शाळांत महिला शिक्षिकाच नसल्याचे चित्र आहे.

मुली सहजासहजी आपल्या समस्या इतरांना सांगत नाहीत. वर्गशिक्षिका सर्वच मुलींच्या जवळच्या असतात. त्या मुलींच्या समस्या समजून घेऊन समुपदेशन करू शकतात. मात्र, शाळांत महिला शिक्षिकाच नसल्याने समुपदेशन करणार कोण? हा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्ह्यात जिल्हा परिषदेसह इतर माध्यमांच्या सुमारे हजार शाळा आहेत. यामध्ये शाळांमध्ये महिला शिक्षक कार्यरत नसल्याची बाब समोर आली आहे.

अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली आहेत. शाळांत विविध समित्या स्थापनेसह तक्रारपेट्या लावण्याचे सूचना दिल्या आहेत, परंतु शिक्षिकाच नसतील, तर मुलींचे समुपदेशन होणार कसे, असा प्रश्न आहे. त्यामुळे ज्या शाळांत मुली आहेत. तेथे महिला शिक्षकांची नियुक्ती होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सुमारे दहा वर्षांपुर्वी राज्यांच्या शिक्षण संचालकांना प्राथमिक शाळांमध्ये टक्के महिला शिक्षिकांची पदे भरण्याचे आदेश दिले होते.

# स्वच्छतेसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन



■ महासागर प्रतिनिधी,
मेहकर दि. ४:

मेहकर शहराची स्वच्छता राखणे हे केवळ नगर पालिकेचेच काम नसून त्यासाठी नागरिकांनी उस्फूर्त सहभाग नोंदवणे महत्त्वाचे आहे. स्वच्छतेमुळे शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडते. त्यामुळे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. स्वच्छता अभियान २.० अंतर्गत शहरात दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत विविध भागांत नगर पालिकेच्या माध्यमातून स्वच्छतेचे काम करण्यात आले. या अभियानाचा समारोप आणि उत्कृष्ट कार्य केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांना बक्षीस वितरण सोहळा आज, दि. २ ऑक्टोबर रोजी नगर पालिकेत पार पडला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री जाधव बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार संजय रायमूलकर होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री जाधव म्हणाले की, केवळ नगर पालिकेनेच स्वच्छता करावी अशी धारणा नागरिकांनी ठेवू नये. प्रत्येकाने या कामात योगदान द्यावे. शहरातील अतिक्रमणे ही शहराच्या सौंदर्यात बाधा आणतात. त्यामुळे अधिकाऱ्यांनी त्याकडेही लक्ष द्यावे, असा सूचक इशारा त्यांनी दिला. सफाई कर्मचाऱ्यांनी राबवलेल्या स्वच्छता अभियानाचे आमदार रायमूलकर यांनी यावेळी कौतुक केले. हे माझे शहर आहे अशी भूमिका ठेवून सर्वांनी स्वच्छतेच्या कामात सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. मुख्याधिकारी रामराजे कापरे यांनी प्रास्ताविकात पालिकेने राबवलेल्या स्वच्छता अभियानाचा आढावा घेतला. स्वच्छता अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना यावेळी केंद्रीय राज्यमंत्री जाधव व आमदार रायमूलकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. एक झाड आईसाठी'' या अभियानांतर्गत त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सर्वांनी स्वच्छता राखण्याची शपथ घेतली. कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार नीलेश मडके, अजय पिंपरकर, सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप मेटांगळे, ठाणेदार शिंगटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, जिल्हा उपप्रमुख राजेंद्र गाडेकर, शहरप्रमुख जयचंद बाठिया, माया मस्के, वैशाली सावजी, कविता दांदडे, रविराज रहाटे, नीरज रायमूलकर, भूषण घोडे, अख्तर चुडीवाले, तौफिक कुरेशी, हनीफ गवळी, मनोज जाधव, समाधान सास्ते, अक्का गायकवाड, अजय चैताणे, सुधीर सारोळकर, अजय मापारी, संजय गिरी, श्रीकृष्ण जयवाळ, गणेश डोंगरे, संतोष राणे, अनिल मुळे, विशाल शिरपूरकर, शेख जफर, बंडू जवंजाळ उपस्थित होते. उत्कृष्ट कार्य केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांसह उपस्थित केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार संजय रायमूलकर व इतर मान्यवर.

# लाडकी बहीण योजनेचे लाटलेले पैसे भावांनी केले परत

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला दि. ४:

राज्य सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत सुमारे अडीच कोटी महिला लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. मात्र या योजनेमध्ये काही अपहार आणि गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. असाच काहीसा प्रकार अकोला येथे उघडकीस आला होता. लाडकी बहीण योजनेसाठी चक्क ६ भावांनी अर्ज केला होता. या प्रकरणी एक अपडेट समोर आली असून सहापैकी दोघांनी ९ हजार रुपये शासनाकडे परत केले, तर चौघांनी याबाबत एक खुलासा केला आहे.

अकोला जिल्ह्यातील ६ पुरुषांनी नारीशक्ती दूत ॲपवर स्वत:चे आधार अपलोड करून संपूर्ण खोटी माहिती भरली होती. महिला व बालकल्याण विभागाला आधार सीडींगदरम्यान हा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून या सहा पुरुषांना नोटीस बजावत या सर्व प्रकाराचा खुलासा मागवला होता.



## दोघांनी नऊ हजार केले परत, चौघांनी सादर केला खुलासा

प्रशासनाने नोटीस बजावल्यानंतर सहापैकी दोघांनी तीन महिन्यांचे आलेले प्रत्येकी ४ हजार ५०० रुपये असे एकूण ९ हजार रुपये परत केले आहेत. या दोघांनी १ ऑक्टोबर रोजी जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालयाकडे रकमेचा चेक सोपवला आहे. तर लाडका भाऊ म्हणून चुकीने अर्ज भरला, असा खुलासा उर्वरित चौघांनी सादर केला आहे. याच

## नांदेड येथे सीएससी केंद्र चालकाने हडपले बहिणींची पैसे

नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील मनाठा येथील एका सीएससी केंद्र चालकाने आधार कार्डवर खाडाखोड करून लाडक्या बहिणींचे सुमारे ३ लाख रुपये हडप केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. केंद्र चालकाने लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरताना महिलांच्या आधारकार्डसोबत छेडछाड केली. पोर्टलवर महिलांचे आधारकार्ड नंबर टाकण्याऐवजी त्यांच्या पतीचे आधारकार्ड नंबर टाकले. त्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आणि इतर योजनांचे पैसे आले आहेत, असे सांगून त्याने अनेकांचे आधारकार्ड आणि बँकेचे पासबुक जमा करून घेतले.

कागदपत्रांच्या आधाराने त्याने महिलांच्या खात्यात आलेले लाडकी बहीण योजनेचे पैसे स्वत:च्या खात्यात जमा करून घेतले. लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यावर आल्यानंतर रोजगार हमी योजनेचे पैसे आले आहेत, असे सांगून त्या केंद्र चालकाने पुरुषांचे अंगठे घेतले. त्यानंतर बँकेत जमा झालेली रक्कम काढून घेतली. केंद्र चालकाने जवळपास जणांच्या आधार क्रमांकाचा वापर करून त्यांच्या परस्पर ३ लाख १९ हजार ५०० रुपये उचलले होते. हा प्रकार समोर आल्यानंतर प्रशासानाने चौकशीचे आदेश दिले असून केंद्र चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## नगर पंचायत कार्यालय, सेलू, जिल्हा वर्धा

### ई-निविदसुचना क्र. १ (२०२४-२५)

क्रमांक. नपसे/निविदा/बा.वि./१३५१/२०२४
कार्यालय नगर पंचायत सेलू, जि. वर्धा
दिनांक ०१/ १० /२०२४

मुख्याधिकारी नगरपंचायत सेलू यांचे वतीने **"साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अनुदान सन २०२४२५"** मध्ये सेलू शहरातील विकास कामे करणे करीता कामाची अंदाजित रक्कम २६,८६,९०४/ निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे पंजीबध्द कंत्राट दाराकडून आवश्यक त्या वर्गानुसार दिनांक ०४/१०/२०२४ ला सकाळी ११ वाजता ते दिनांक ११/१०/२०२४ ला सायं. ५.०० वाजता पर्यंत निविदा सादर करावी. (निविदेतील अटी व शर्ती सविस्तर महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.)

स्वाक्षरी
मुख्याधिकारी
नगरपंचायत, सेलू जि. वर्धा


# बालसंरक्षणाबाबत मुख्याध्यापकांना मार्गदर्शन



## जागेश्वर विद्यालयात कार्यशाळा

अकोला
शिक्षण व महिला व बालविकास कार्यालयातर्फे बाल संरक्षण या विषयावर बाळापूर तालुक्यातील मुख्याध्यापकांची कार्यशाळा वाडेगाव येथील जागेश्वर विद्यालयात झाली. बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चाईल्ड हेल्पलाईन, विविध कायदे याविषयी त्यात मार्गदर्शन करण्यात आले. मुख्याध्यापक सुनील म्हसने कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी होते. सक्षम टीमचे समुपदेशक गोपाळ मुकुंदे यांनी विद्यार्थी सुरक्षितता व उपाययोजना याबाबत चित्रफितीद्वारे सुबोध भाषेत मार्गदर्शन केले. तालुका विधी सेवा प्राधिकरणाचे विधीज्ञ ड. प्रवीण अंभोरे, ड. दीपक बरडे यांनी पॉक्सो कायद्याबाबत माहिती दिली. चाईल्ड हेल्प लाईनच्या समन्वयक हर्षाली गजभिये यांनी हेल्पलाईन बाबत सांगितले. जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे संरक्षण अधिकारी सुनिल लाडुलकर यांनी बाल संरक्षण यंत्रणा, महिला व बालविकास विभागांतर्गत बालकांसाठी विविध योजनांची माहिती दिली. सखी सावित्री समितीची रचना व कार्य या विषयावर एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशनचे महेंद्र गणोदे यांनी सादरीकरण केले. तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, केंद प्रमुख, विस्तार अधिकारी सहभागी झाले होते. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर व शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांच्या मार्गदर्शनात ही कार्यशाळा झाली. चाईल्ड हेल्पलाईनची स्टिकर्स यावेळी शाळांना वाटण्यात आली. गटशिक्षणाधिकारी वैशाली रामटेके यांनी प्रास्ताविक केले. मनोज वाडकर यांनी सूत्रसंचालन केले. विस्तार अधिकारी देविदास पवार यांनी आभार मानले. रोहित भाकरे व वैभव भदे यांनी परिश्रम घेतले.


## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### Tender Notice

Commissioner NMC invites Offline tenders for the following works. These tenders can be submitted by the Registered Contractors of NMC. The Terms and Conditions of tenders are available on the Tender Form. The sale and purchase of Tender Form can be done at E.E.(Slum) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

**Name of Department :- Slum Department**

| Tender No. | Name of the work | BOQ Cost (Rs.) | EMD |
|---|---|---|---|
| 1 | Construction of Compound Wall of Public Toilet in Narendra Nagar Square in pr no 16. | 418326 | 4200 |
| 2 | Supply of Computer Set From Official Employees of Slum Department Under ( Gharkul Nirmal Samiti) | 463000 | 4600 |

**Note : (1)** Tender sale & submission start date : 04/10/2024. **(2)** Tender submission end date/sales end date : 10/10/2024 up to 5.00 pm. **(3)** Date of opening of Tender (if possible) date : 11/10/2024 up to 5.00 pm. **(4)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document.

**Advt No : 607/PR,**
**Dt : 04/10/2024**

**Executive Engineer (SLUM),**
**N.M.C., Nagpur**



MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-tender Notice

Superscribed Item rate e-tenders are invited from established, reputed, experienced contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the work of **1. Various Civil maintenance work and providing roofing shed and extension to watchman cabin at Bijli nagar Dist. Nagpur (Part-A) Various Civil maintenance. Works at Bijli nagar staff quarter Dist. Nagpur. (Part-B) (Rs. 36.81 Lacs approx) 2. Various Civil maintenance work at 11KV ST Stand substation Nagpur Dist. Nagpur. (Rs. 10.01 Lacs approx)3.Annual Contract of Upkeeping of office and Pump Operation at Prakash Bhawan Premises Gaddigodam Nagpur.(Rs. 21.83 Lacs approx)4.Construction of Compound wall at 33 KV Kalamna Sub-station Nagpur Dist. Nagpur. (Rs. 25.62 Lacs approx) 5.Maintenance work of office building of Network Operation & Monitoring Centre including HR and Account section of at O&M Division Office Gandhibagh, Dist. Nagpur. . (Rs. 27.58 Lacs approx)** vide e-tender specification No SEC/NGP/e-T-55/2024-25 to **SEC/NGP/e-T-59/2024-25 respectively.** The e-tender with all details will be available on MSEDCL's website www.mahadiscom.in from **Dated – 07.10.2024 to 13.10.2024** and submission on **14.10.2024 up to 13.00 Hrs. Corrigendum if any will NOT be published,** the bidders have to check it on website itself. **Contact No. 7875760519.**

**PRO No. NZ/414/2024**
**Dated 04 .10.2024**

**Superintending Engineer (C)**
**CCCM Circle, Nagpur**



## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### TENDER NOTICE

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites tenders in appropriate form for the following works. These tenders can be purchased by registered contractors from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur. Purchase and submission of tenders can be done from the office of the Executive Engineer (Electrical), NMC, Nagpur.

| Name of the work | Project Cost |
|---|---|
| Providing and Erecting Full IP C.C.T.V. System at Dikshabhoomi under Zone No. 01, Laxminagar. | 8,34,090/- |

**Note :** Rates are exclusive of G.S.T. **(1)** Tender Submission end date : 07.10.2024 (03:00 pm.) **(2)** Date of Opening of Tender (If Possible) : 07.10.2024 (03:30 pm.)

**Advt No : 592/PR, Dt : 03/10/2024**

**Executive Engineer**
**(Electrical) N.M.C., Nagpur**



## Change Of Name

MY OLD NAME WAS **MURTUJA ASHIK HUSAIN BOHARA.** NOW MY NEW NAME IS **MURTAZA ASHIQHUSAIN ARVIWALA.**
**ADD** : BOHRA KABRASTAN F. NO 3 SHUJAEE MANZIL DR.AMBDKAR S.Q NAGPUR 440017 (MS).

MY OLD NAME WAS **ASHIK HUSAIN BOHARA.** NOW MY NEW NAME IS **ASHIQ HUSAIN ABDUL HUSAIN ARVIWALA.**
**ADD** : BOHRA KABRASTAN F. NO 3 SHUJAEE MANZIL DR.AMBDKAR S.Q NAGPUR 440017 (MS).

MY OLD NAME WAS **RASHIDA ASHIK HUSAIN BOHARA.** NOW MY NEW NAME IS **RASHIDA ASHIQ HUSAIN ARVIWALA.**
**ADD** : 35 SANGAM NAGAR NEAR MASJID BACK SIDE PILI NADI UPPALWADI NAGPUR 440026.

MY OLD NAME WAS **TAHEERA MURTUJA BOHARA.** NOW MY NEW NAME IS **TAHERA MURTAZA ARVIWALA.**
**ADD** : BOHRA KABRASTAN F NO 3 SHUJAEE MNZIL BINAKI MANGALWARI DR. AMBDKAR S.Q NAGPUR 440017 (MS).

MY OLD NAME WAS **TAHERA ARVIWALA.** NOW MY NEW NAME IS **TAHERA MURTAZA ARVIWALA.**
**ADD** : BOHRA KABRASTAN F NO 3 SHUJAEE MANZIL BINAKI MANGALWARI DR. AMBEDKAR MARG S.Q NAGPUR 440017 (MS).

MY DAUGHTER OLD NAME WAS **TASNEEM ARVIWALA.** NOW MY DAUTHER NEW NAME IS **TASNEEM MURTAZA ARVIWALA.**
**ADD** : BOHRA KABRASTAN F NO 3 SHUJAEE MANZIL BINAKI MANGALWARI DR. AMBEDKAR MARG S.Q NAGPUR 440017 (MS).

MY SON OLD NAME WAS **SAIFUDDIN ARVIWALA.** NOW MY SON NEW NAME IS **SAIFUDDIN MURTAZA ARVIWALA.**
**ADD** : BOHRA KABRASTAN F NO 3 SHUJAEE MANZIL BINAKI MANGALWARI DR. AMBEDKAR MARG S.Q NAGPUR 440017 (MS).

MY OLD NAME WAS **MURTUJA ARVIWALA.** NOW MY NEW NAME IS **MURTAZA ASHIQHUSAIN ARVIWALA.**
**ADD** : BOHRA KABRASTAN F NO 3 SHUJAEE MANZIL BINAKI MANGALWARI DR. AMBEDKAR MARG S.Q NAGPUR 440017 (MS).

MY OLD NAME WAS **KHEMI ASHOK RANGWANI.** NOW MY NEW NAME IS **LAXMI MANOJ PANJWANI.**
**ADD** : FLAT NO G 403, PYRAMID CITY PHASE-2, JARIPATKA NAGPUR 440014.

MY OLD NAME WAS **SAYYED KASHIF RAZA NAQVI.** NOW MY NEW NAME IS **KASHIF MOHSIN NAQVI.**
**ADD** : WAQAR VILLA HAKIM JI KA BADA BHALDARPURA NAGPUR.

MY OLD NAME WAS **MOHSIN HASAN KHAN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD MOHSIN HASAN.**
**ADD** : 138 GUJRI BAZAR KAMPTEE NAGPUR 441002.

MY OLD NAME WAS **PYARE SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **PYARE SAHAB.**
**ADD** : P NO 34/A LAXMI NAGAR KALMNA MARKET NAGPUR - 440008.

MY OLD NAME WAS **RESHMA SANTOSH OHRE.** NOW MY NEW NAME IS **RESHMA SANTOSH ORE.**
**ADD** : MOTTI BAAG RAILWAY BRIDGE PARYATT MOMINPURA ROAD, MOTTI BAAG BEZONBAGH NAGPUR 440004.

MY OLD NAME WAS **SANTOSH OHRE.** NOW MY NEW NAME IS **SANTOSH ORE.**
**ADD** : MOTTI BAAG RAILWAY BRIDGE PARYATT MOMINPURA ROAD, MOTTI BAAG BEZONBAGH NAGPUR 440004.

MY OLD NAME WAS **LAXMIDEVI MOOLCHAND DAYARAMANI.** NOW MY NEW NAME IS **LAXMI MOOLCHAND DAYARAMANI.**
**ADD** : GONDWANA CHOWK, 001/101 JAISHREE PLAZA BAIRAMJI TOWN, KATOL ROAD, NAGPUR 440013.


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# बालांगण



## दोस्त हे मस्त

### पिग्मी मार्मोसेट



पिग्मी मार्मोसेट ही माकडांची सर्वात छोटी प्रजाती. त्यांचा आकार माणसाच्या हाताच्या पंजाइतका असतो. हा छोटासा प्राणी अगदी सहजतेने तुमच्या हातात मावू शकतो. ही प्रजाती दक्षिण अमेरिकेत आढळते. दुर्मीळ असं हे माकड झाडाच्या बुंध्यावर राहतं.

## खादाडी



### क्रीमी ड्रायफ्रूट मिल्कशेक

छोट्यांनो, थंडीत गरम पदार्थ खाल्ले जात असले तरी ड्रायफ्रुट्समुळे आपल्याला शक्ती मिळते. त्यामुळे तुम्ही ड्राय फ्रूट मिल्कशेक बनवू शकता. त्यासाठी बदाम, काजू, पिस्ता, सुकं अंजीर आणि खजूर घ्या. खजूर सोडून इतर घटक भिजवून ठेवा. भिजवलेल्या बदामांची सालं काढा. आता वेलची पूड, दूध आणि ड्रायफ्रूट्स मिक्सर जारमध्ये घाला. फिरवून घ्या. खजूर आणि अंजीरामुळे गोडवा येतो. हवी असेल तर साखर घाला.

## लाईफस्टाईल



### मेंदू तल्लख राहावा म्हणून...

वय वाढू लागलं की मेंदूचा आकार छोटा होत जातो. पण काहींची स्मरणशक्ती आणि बुद्धी तल्लखच राहते. तरुण वयात डोक्याचा वापर करत राहिल्याने मेंदू लवचिक बनतो, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. लहान वयातल्या सवयींनुसार मेंदूच्या भविष्यातल्या कामाची दिशा ठरते. मेंदूला चालना देणारे छंद असतील तर पुढेही तो तुम्हाला साथ देतो. त्यामुळे कोडी सोडवा, भरपूर वाचन करा आणि मेंदू तल्लख ठेवा.

## योगा टाईम

### डोळ्यांसाठी योगा

गॅझेट्सच्या वाढत्या वापरामुळे दृष्टीवर दुष्परिणाम होतो. पण डोळ्यांची काळजी घेण्याच्या हेतूने योगाचा खूप चांगला उपयोग होऊ शकतो. यासाठी आधी पद्मासनात किंवा मांडी घालून बसा. लक्ष एका ठिकाणी केंद्रित करा आणि बुबुळं गोलाकार फिरवत रहा. पाच ते दहा वेळा हा प्रकार करा. यामुळे लांबची आणि जवळची दृष्टी सुधारते.



## सणाची मजा

उत्सवरंग

नवरात्र सुरु झालंय. तुमच्या घरीदेखील घट बसले असतील. हा सण नऊ दिवस आणि नऊ रात्रींचा. दिवसा पूजा-अर्चा, स्तोत्र पठण असतंच, पण संध्याकाळची भारी मजा असते. तुम्ही भोंडला खेळता का? भोंडला म्हणजे अंगणामध्ये पाट मांडायचा, त्यावर हत्तीची प्रतिमा ठेवायची, या प्रतिमेची पूजा करायची आणि नंतर भोंडल्याची गाणी म्हणत हत्तीभोवती फेर धरायचा. आई किंवा आजीकडून तुम्ही भोंडल्याची गाणी ऐकलीही असतील. यात ऐलमा पैलमा गणेश देवा, तुझा खेळ मांडिला करीन तुझी सेवा, एक लिंबू झेलू बाई दोन लिंबं झेलू, यादवराया राणी रुसून बसली कैसी... यासारखी गाणी असतात. या गाण्यांचं पुस्तक बाजारात विकत मिळतं. पण या जुन्या गाण्यांबरोबरच भोंडल्याची काही नवी गाणीही रचली गेली आहेत. तुम्ही त्यांचाही आनंद घेऊ शकता. भोंडल्याचा शेवट आणखी रंजक असतो. ज्यांच्या घरी भोंडला असतो ते जमलेल्या बच्चेमंडळींसाठी छानसा खाऊ तयार ठेवतात. त्याला खिरापत म्हणतात. पण गमतीची बाब म्हणजे हा खाऊ काय आहे हे जमलेल्या बच्चेमंडळींनी ओळखायचं असतं. तो पदार्थ गोड आहे की तिखट, कडक आहे मऊ याबद्दल थोडं फार सांगितलं जातं. एकदा खिरापत ओळखली की तुम्ही ताव मारायला तयार! एका दिवशी एकापेक्षा जास्त मैत्रिणींकडेही भोंडला असू शकतो. मग काय मजाच मजा! कुठे दही-पोह्याची खिरापत, कुठे खाऱ्या दाण्यांची खिरापत, भडंग चिवड्याची खिरापत तर कुठे वेगवेगळ्या चॉकलेट्सची खिरापत. या खिरापती खाल्ल्या की जेवायची गरजच रहात नाही. भोंडल्याबरोबर दांडियाही खेळतात. गरब्यासारखाच दांडियाही रंगतो. संगीताच्या तालावर नाच रंगात येतो. टिपऱ्यांचा आवाज खूप छान वाटतो. रंगीबेरंगी कपडे परिधान करुन सजून धजून आलेल्या मित्रमैत्रिणी अगदी ओळखू येत नाहीत इतक्या वेगळ्या दिसतात. रात्र संपते पण हा खेळ संपू नये असं वाटतं. तर मित्रांनो, आपणही अशा रंगांगं खेळांमध्ये भाग घेऊ या! नवरात्रीची आनंद लुटू या!



## कलेत गती आहे?

कोण होणार?

दोस्तांनो, तुम्ही संगीतमय रिॲलिटी शो बघत असाल. तुमच्यासारखीच छोटी-छोटी मुलं खूप छान गातात. त्यांचं कौतुकही होतं. अशाच कार्यक्रमांमधून अनेकांना करीअरची वाट गवसते. तुम्हालाही गाण्याची, वादनाची, संगीताची आवड असेल तर यात उत्तम करीअर घडू शकतं. शिक्षण पूर्ण करता करता तुम्ही ही आवड जोपासू शकता. एकीकडे अभ्यासक्रम पूर्ण करू शकता तर दुसरीकडे कलेची साधना करु शकता. कलेतल्या करीअरसाठी विविध पदव्या आणि पदविका उपलब्ध अभ्यासक्रम आहेत. बऱ्याच राज्यांमध्ये संगीत विद्यापीठांमधून विद्यार्थी घडत आहेत. ही विद्यापीठं तुमच्यातल्या कलेला आकार देण्याचं काम करतात. शाळेत असतानाही तुम्ही गायन,वादन किंवा नृत्य शिकू शकता. बारावीनंतर याच विषयात पदवी मिळवू शकता. पीएचडीही करु शकता. संगीत प्रवेशिका, संगीत विशारद आणि संगीतालंकारासारखे अभ्यासक्रम बारावी, पदवी आणि द्विपदवीच्या दर्जाचे असतात. साधारणतः आठ वर्षांच्या अभ्यासानंतर तुम्ही कलेत पारंगत होता. गायन, वादन, नृत्य, अभिनय अशा विविध कलांसाठीचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट, पुणे; राष्ट्रीय नाट्य कला अकादमी, दिल्ली; नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस, मुंबई; कलकत्ता विद्यापीठ, बनारस हिंदू विद्यापीठ, गंधर्व विद्यापीठ, खैरागढ आदी ठिकाणांहून तुम्ही संबंधित कलेचं शिक्षण मिळवू शकता. एकूण काय तर आवड आणि मेहनतीची तयारी असेल तर तुम्ही कलेच्या क्षेत्रात चांगलं यश मिळवू शकता. सेलिब्रिटी म्हणून मिरवू शकता.



## राखा पर्यावरणाचा समतोल

काळजी घेऊ

मित्रांनो, पृथ्वीवर माणसांची संख्या वाढतीये आणि आपल्या सवयींमुळे पर्यावरणाचं संतुलन धोक्यात येतंय. वातावरणात मोठ्या प्रमाणावर धूर मिसळतोय, आवाजाचं प्रदूषण वाढतंय, निरनिराळ्या कारखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या दुषित पाण्यामुळे जलस्त्रोत प्रदुषित होत आहेत. एकंदरच पृथ्वीवरच्या पर्यावरणाचा तोल ढासळत असल्यामुळे पर्यायानं आपलं जीवनच धोक्यात येत आहे. काही उपायांनी आपण हे ढासळतं संतुलन थांबवू शकतो. * घरातली विजेवरची उपकरणं स्टॅंडबाय मोडवर ठेवू नयेत. कारण यामुळे उपकरण वरकरणी बंद झाल्यासारखं वाटत असलं तरी अंतर्गत यंत्रणा सुरु असते आणि त्यासाठी विजेचा पुरवठाही सुरु असतो. * खोलीबाहेर पडताना बल्ब, ट्यूब, टीव्ही, पंखा, ए.सी., रेडिओ आदी उपकरणं बंद असल्याची खात्री करु या! एवढी दक्षता घेतली तरी बरीच वीज वाचेल. दिवसाउजेडी पडदे लावून बल्ब लावून अभ्यास करण्याची सवय असेल तर ती ही बदलू या. * तुम्ही अभ्यासाच्या नोट्स काढता. यासाठी नवीन वही खरेदी करता अथवा फुलस्केप विकत आणता. पण या कामासाठी जुन्या वह्यांमधील राहिलेले अथवा पाठकोरे कागद वापरले तर? कशी वाटते ही युक्ती! प्रत्येकानं हा निश्चय केला तर किती कागद वाचतील. * आपल्या परिसरामध्ये बरीच झाडं असतात. झाडांवर छोटे-मोठे पक्षी येतात. त्यांच्यासाठी धान्य आणि पाणी ठेवू या. एवढं केलं तरी पर्यावरण रक्षणाच्या कामी आपलाही खारीचा वाटा उचलला जाईल.



## सागरातली रंगीत वस्ती

छोटे उस्ताद

सागरात अनेक कवचधारी प्राणी आढळतात. यापैकी चिंगळ, खेकडे, शेवंड हे प्राणी आपल्या विशेष परिचयाचे. पण पांढऱ्या, गुलाबी किंवा काळ्या रंगाची चिंगळ, काळे किंवा जांभळे खेकडे, तपकिरी, केशरी रंगांची शेवंडे यापेक्षाही किती तरी वेगळ्या रंगात, आकारात हे प्राणी सापडतात हे तुम्हाला माहित आहे का ? समुद्राच्या भरती ओहोटीच्या सीमेवरील खडकांना घट्ट







चिकटून राहणारे खुबे किंवा बारनॅकल्स हेही कवचधारी प्राणीच. जांभळ्या, पिवळट, पांढऱ्या किंवा तपकिरी रंगाच्या बारनॅकल्सना दारासारख्या दोन झडपा असतात. लाटेबरोबर येणारे अन्नकण पकडण्यासाठी स्पर्शिका बाहेर असतात ह्या झडपा उघडल्या जातात आणि धोका जाणवताच त्या बंद केल्या जातात. पिवळसर रंगाच्या कवचावर लाल, तपकिरी ठिपके असणारे ठिपकेदार सँड क्रॅब व लुनार बॉक्स क्रॅब हे खेकडे याच गटातले. छोटे असले तरी त्यांच्या नांग्या मजबूत असतात. लुनार बॉक्स खेकडा मागच्या पायांनी वाळूत खड्डा खणत जातो व मागे सरकत खड्ड्यात उतरतो. रिकाम्या शंखात घर करणारा टर्मिट क्रॅब तुम्हाला माहीत असेल. आपल्या शरीराचा आकार वाढला की टर्मिट क्रॅब दुसऱ्या रिकाम्या आणि मोठ्या शंखाच्या शोधाला लागतो. तळावरील खाद्यपदार्थ शोधणारा हा खेकडा दिवसा खडकाच्या कपारीत राहतो. छोटे अपृष्ठवंशीय प्राणी हे त्याचे खाद्य. टर्मिट क्रॅबच्याही अनेक जाती वेगवेगळ्या शंखातून राहताना सापडतात. प्रवाळांच्या बेटांच्या आसपास राहणारी चिंगळ प्रवाळांप्रमाणेच सुंदर रंगाची असतात. निळे डोळे आणि लाल पांढरे पट्टे असलेल्या या चिंगळाचे आणि सी अर्चिनचे खूपच सख्य असते. दिवसा सी-अर्चिनच्या काटेरी अंगाखाली लपून बसणाऱ्या या चिंगळाबद्दल अधिक माहिती जाणून घ्या.




## जेवणानंतरची डुलकी

स्मार्ट फन


बालमित्रांनो, जेवण झालं की आपल्याला शरीर जड झाल्यासारखं वाटतं. सुस्ती येते आणि झोप येऊ लागते. अशा वेळी अभ्यासाला बसलो, की मन एकाग्र होत नाही. डोळ्यांवर झापडं येतात. यामागचं शास्त्रीय कारण जाणून घेण्याचा प्रयत्न तुम्ही कधी केला आहे का? सामान्यतः प्रत्येक व्यक्तीच्या शरीरात पाच लीटर रक्त असतं. हे रक्त संपूर्ण शरीरात संचार करत असतं. शरीरातील विविध भागात होणारा रक्ताचा पुरवठा आणि त्याचं प्रमाण वेगवेगळं असतं. हे प्रमाण आवश्यकतेनुसार बदलत असतं. हृदयाकडून येणारं रक्त अवयवांच्या गरजेनुसार विविध प्रमाणात त्यांच्यापर्यंत पोहोचत असतं. मेंदू, मांसपेशी, यकृत आणि शरीरातील इतर अवयवांना हा रक्तपुरवठा होत असतो. जेवण केल्यानंतर जेवणाच्या पचनक्रियेसाठी रक्ताची आवश्यकता अधिक भासते. त्यामुळे जेवणानंतर रक्ताचा जास्त प्रवाह पोटाकडे जातो. त्याचा परिणाम म्हणजे मेंदूकडे जाणारा रक्तप्रवाह थोड्या कालावधीसाठी काही प्रमाणात कमी होतो. मेंदूचा रक्तपुरवठा कमी झाल्यामुळे मेंदूची क्रियाशीलता मंदावते. क्रियाशीलता मंदावल्यामुळे आपल्याला सुस्ती किंवा झोप येते. मेंदूला पुन्हा योग्य प्रमाणात रक्तपुरवठा सुरू होण्यासाठी थोडा कालावधी लागतो. त्यानंतर पुन्हा नेहमीप्रमाणे हा पुरवठा सुरू होतो.




## के नांग हुआन आणि देसी ऑलिंपिक

गेम टाईम

प्राण्यांवर नियंत्रण ठेवणं तसं कठीणच. सर्कशीतला रिंग मास्टर वाघ-सिंहासारख्या प्राण्यांना आपल्या तालावर नाचवतो. पण पिंजऱ्यातून बाहेर सोडलेल्या एखाद्या डुकरावर नियंत्रण मिळवायचं असेल तर माणूस खूप धाडसी हवा. निकोबार बेटांवरच्या आदिवासी जमातींमध्ये असाच एक खेळ लोकप्रिय आहे. के नांग हुआन नावाच्या या खेळात डुक्कर आणि माणसाची लढाई पहायला मिळते. पिंजऱ्यातल्या डुकराला मैदानात सोडलं जातं. कान पकडून त्या चवताळलेल्या डुकरावर नियंत्रण मिळवण्याचं काम स्पर्धक सहभागी झालेल्या खेळाडूला करायचं असतं. प्राण्याला शांत करण्यात यशस्वी होणारा खेळाडू लढवय्या मानला जातो. अशा प्रकारच्या खेळात माणसाच्या क्षमतेची परीक्षाच असते. छोट्यांनो, तुम्हाला ऑलिंपिक स्पर्धा माहीत असेल. याच धर्तीवर भारतातही अनोख्या ऑलिंपिकचं आयोजन केलं जातं. याला देसी किंवा ग्रामीण भागातलं ऑलिंपिक म्हणतात. पंजाबमधला शेतकरी वर्ग १९३३ पासून किला रायपूर स्पोर्टस फेस्टिवलचं आयोजन करतो. बाईकवरून केले जाणारे स्टंट्स, बैलगाड्यांची शर्यत, केसांनी गाडी ओढणं, दातांनी सायकल उचलणं, शेतीच्या उपकरणांचा वेगळ्या पद्धतीने वापर करणं असे मजेदार खेळ इथे खेळवले जातात. हा महोत्सव तीन दिवस सुरू राहतो. देसी ऑलिंपिक पाहण्यासाठी पंजाबच्या विविध भागातले लोक येतात. स्पर्धकांना बरीच तयारी करावी लागते. ग्रामीण बाजाचे खेळ ही या महोत्सवाची ओळख. हे खेळ बघताना अंगावर अक्षरशः शहारे येतात. या ऑलिंपिकमध्ये सहभागी व्हायचं तर तुमच्यात भरपूर धाडस असायला हवं.



## ठिपके जुळवा



## जिज्ञासा

### ओळखा पाहू...

१) माजी आयपीएस अधिकारी किरण बेदींना मॅगसेसे पुरस्कार कोणत्या वर्षी मिळाला?
२) मेधा पाटकर कोणत्या आंदोलनाशी संबंधित आहेत?
३) कथकली, मोहिनीअट्टम आणि ओट्टामथुल्लाल या कोणत्या राज्यातली नृत्यकला आहे?
४) नरेंद्र मोदीनी उद्घाटन केलेला सर्वात लांब पूल कोणता?
५) लुधियाना हे शहर कोणत्या नदीकिनारी वसलं आहे?
६) राष्ट्रकुल स्पर्धेचं आयोजन किती वर्षांनी केलं जातं?
७) ब्लिचिंगसाठी कोणत्या घटकाचा वापर केला जातो?
८) जगातलं सर्वात उंचीवरचं विमानतळ कोणतं?
९) पेनिसिलिनचा वापर काय म्हणून केला जातो?
१०) ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या स्थापना कोणत्या वर्षी झाली?

१) १९९४ २) नर्मदा बचाओ ३) केरळ ४) बोगीबिल सेतू ५) सतलज ६)चार वर्षांनी ७) क्लोरिन ८) ल्हासा,तिबेट ९)प्रतिजैविक १०)११६३

## ई-कोलायविषयी...

हेल्थ वेल्थ

ई कोलाय नावाच्या बॅक्टेरियांचं नाव तुम्ही ऐकलं असेल. विशेषतः पावसाळ्यात याविषयीची बरीच चर्चा असते. बरेचदा रस्त्यावरच्या गाड्यांवर मिळणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये हे बॅक्टेरिया आढळतात. आता ई कोलाय म्हणजे नेमकं काय? ते आरोग्याला घातक असतात का? या प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ या. भाज्या किंवा मांसामध्ये ई कोलाय आढळतात. या किंवा इतर बॅक्टेरियांचं वैशिष्ट्य सांगायचं तर प्रत्येक वेळी ते आरोग्याला घातक ठरतीलच असं नसतं. शरीरात गेलेले ई कोलाय आतड्यात राहतात. त्यांच्यामुळे अन्नपदार्थांचं विघटन आणि पचन होण्यास मदत होते. पण काही प्रकारचे ई कोलाय आतड्यातून रक्तात प्रवेश करतात. यामुळे मात्र तुम्ही आजारी पडू शकता. पोट दुखणं, पोटात गोळे येणं, उलट्या, जुलाब ही ई कोलायच्या संसर्गाची लक्षणं आहेत. म्हणूनच पावसाळ्यात बाहेरचं न खाण्याचा सल्ला दिला जातो. अर्थात



कोणत्याही ऋतूत बाहेरचं खाणं टाळायला हवं. उष्णतेमुळे ई कोलाय मरतात. त्यामुळे पाणी उकळून पिणं, भाज्या, मांस शिजवून खाणं अशी काळजी घ्यायला हवी. २००६ मध्ये पालकात धोकादायक ई कोलाय सापडला होता. १९९३ मध्ये हॅमबर्गरमधल्या मांसातही तो होता. शेणात ई कोलाय आढळतो. शेणाचा खत म्हणून वापर केला जातो. अशा शेतांमध्ये पिकवलेल्या तसंच दूषित पाण्याने धुतलेल्या भाज्या तसंच फळांमध्ये हे बॅक्टेरिया असू शकतात. त्यामुळे आपण काय खातो याकडे लक्ष द्या. अन्न नीट शिजवलेलं असल्याची खात्री करा. अर्धवट शिजलेलं मांस टाळा. तलाव, समुद्र, स्वीमिंग टॅंकमधलं पाणी पोटात जाणार नाही याची काळजी घ्या.

# डॉन अरूण गवळीच्या मुलीला भायखळ्यातून उमेदवारी?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४:
शिवसेना ठाकरे गटाने अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी यांची कन्या गीता गवळी यांच्याशी संपर्क साधल्याचे समोर आले आहे.
आमदार मिलिंद नार्वेकर यांनी गीता गवळी यांची दगडी चाळीत जाऊन भेट घेतली. तसेच गीता गवळी देखील भायखळा विधानसभा मतदारसंघातून लढण्यास इच्छुक असल्याचे समजते.

लोकसभा निवडणुकीच्यावेळी गीता गवळी यांनी भाजपला पाठिंबा दिला होता. मात्र त्यानंतर झालेल्या राजकीय घडामोडींनंतर गीता गवळी यांनी ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे.



गीता गवळी या त्यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय सेनेच्या नगरसेविका देखील होत्या. दक्षिण मुंबईमध्ये अरुण गवळी यांना मानणारा मोठा वर्ग आहे. निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला गीता गवळी यांचा फायदा होऊ शकतो, हे लक्षात घेवून शिवसेना ठाकरे गटाकडून त्यांना भायखळ्यातून उमेदवारी दिली जाण्याचे संकेत आहेत.


## Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project

**E-TENDER NOTICE NO: 2024_DOAWB_1105188**

**(Supply, Installation, Fabrication, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank- funded SMART Project. Swamini Mahila Krushak Farmer Producer Company Ltd., Powaritola, Tal & Dist. Gondia is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in tender and procurement section. The last date for submission of online bid is **24/10/2024 up to 03.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit,**
**SMART Project Dist. - Gondia**

## Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project

**E-TENDER NOTICE NO : 2024_DOAWB_1104590_**

**(Supply, Installation, Fabrication, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank- funded SMART Project. Kaneriram Mahila Shetkari Producer Company Limited At-Kaneriram, Tal. - Sadak Arjuni, Dist. Gondia is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in tender and procurement section. The last date for submission of online bid is **24/10/2024 up to 04.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit,**
**SMART Project Dist. - Gondia**



# सीएसएमटी परिसरात महिलेवर गँगरेप

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४:
सीएसएमटी रेल्वे स्थानकाबाहेर एका २९ वर्षीय महिलेवर दोन नराधमांनी अत्याचार केला. ही घटना २२ सप्टेंबर रोजी घडली. पण ती आज उजेडात आली. याप्रकरणी आरोपींविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला २२ सप्टेंबर रोजी रात्रीच्या सुमारास सीएसएमटी रेल्वे स्थानक परिसरात एकटीच उभी होती. त्याचवेळी दोन अज्ञात व्यक्ती तिच्याजवळ आले. काही कळण्याच्या आत त्यातील एका व्यक्तीने तिचे तोंड दाबले. त्यानंतर दोन्ही आरोपींनी पीडित महिलाला रेल्वे स्थानकाबाहेरील टॅक्सी स्टँडच्या मागे नेऊन आळीपाळीने अत्याचार केला, असे पीडितेने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

या घटनेनंतर महिलेने रेल्वे पोलिसांत धाव घेतली. छत्रपती शिवाजी महाराज लोहमार्ग पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला. आता पुढील तपासासाठी हा गुन्हा मुंबई पोलिसांच्या माता रमाबाई मार्ग पोलिस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

याआधी पुण्यात कोंढव्यातील बोपदेव घाट परिसरात २१ वर्षीय तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी घडली होती. तरुणी आपल्या मित्रांसोबत रात्रीच्या सुमारास बोपदेव घाट परिसरात गेली होती. तेथे रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास तिघांनी तिच्यावर सामुहिक बलात्कार केला. याप्रकरणी पोलिसांना शुक्रवारी पहाटेच्या सुमारास माहिती मिळाली. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.




# महासागर नागपूर वृत्तसागर

■ शनिवार, दि. ५, ऑक्टोबर २०२४ ■


# महाराष्ट्राची मान शरमेने खाली

## हे सरकार फक्त मलई खाण्यात मग्न : नाना पटोले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था रसातळाला गेली आहे. शासन व प्रशासनात प्रचंड भ्रष्टाचार बोकाळला आहे. सरकारला फक्त मलई खाण्यात जास्त रस असल्याने जनतेच्या प्रश्नांकडे त्यांचे लक्ष नाही. राज्यात मुली व महिला सुरक्षित नाहीत हे सातत्याने होत असलेल्या घटनांवरून दिसत आहे, अशी टीका प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली.



नागपूर येथे शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना पटोले म्हणाले, पुण्यात शाळकरी मुलीवर व्हॅन चालकाने अत्याचार केला. त्याआधी एका कॉलेजमध्ये मुलीवर अत्याचाराची घटना घडली. आता बोपदेव घाटात एका मुलीवर सामूहिक अत्याचाराची घटना समोर आली आहे. महाराष्ट्राची मान शरमेने खाली घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. सावित्रीबाईंच्या भूमीत अशा घटना वाढत आहेत ही चिंतेची बाब आहे. याला सरकारच जबाबदार आहे. या सरकारचे शेवटचे दिवस उरले आहेत. त्यांनी काही कारवाई करावी अशी अपेक्षा आहे. नरहरी झिरवळ यांच्या आंदोलनावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ साली धनगर, आदिवासी समाजाला आरक्षणाचे आश्वासन दिले होते पण ते पूर्ण केले नाही. आरक्षणाच्या नावावर भाजप व फडणवीस यांनी जाती-जातीत भांडणे लावली. आज तेच लोक त्यांना जाब विचारत आहेत. ज्यांनी आश्वासन दिले त्यांना आता त्याची पूर्तता करावी लागणार आहे. यावेळी एका एनजीओच्या महिला सुरक्षासंदभार्तील ॲप नाना पटोलेंच्या हस्ते लाँच करण्यात आले. हे ॲप महिलांच्या सुरक्षेसाठी महत्वाचे आहे, असे पटोले यांनी सांगितले. महाराष्ट्रात मुलींवर अत्याचाराच्या सातत्याने घटना घडत आहेत. पण, राज्य सरकार त्यावर नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरले आहे. बदलापूर येथील शाळेत मुलींवर अत्याचार, नागपुरात ८ वर्षीय चिमुकल्या मुलीवर २० रुपयाचे आमिष देऊन अत्याचार केल्याची घटना घडली. पुण्यात व्हॅन चालकांकडून दोन मुलींवर अत्याचार आणि बोपदेव घाटात एका मुलीवर सामूहिक अत्याचाराची घटना घडली आहे, असे पटोले म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी महाराष्ट्रात पोहरादेवीला येत आहेत. पण २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांनी पोहरादेवीला भेट दिली होती. त्यावेळी बंजारा समाजाला आदिवासी जातीत समावेश करण्याचे लेखी आश्वासन रामराव महाराज यांना दिले होते. ते अद्याप पूर्ण केलेले नाही. नरेंद्र मोदी संतांशीही खोटे बोलतात त्यांच्यावर कोण विश्वास ठेवणार? पोहरादेवीला जगभरातील बंजारा लोक येतात, मोदींच्या जुमलेबाजीला व भूलथापांना आता बंजारा समाज बळी पडणार नाही, असेही पटोले म्हणाले.

# प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिक निर्माण कंपनीवर कारवाई

## वर्धमाननगरातील एच. जी. इंडस्ट्रीवर मनपाचा छापा



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

राज्यात सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी असताना सुद्धा नागपुरात सर्रास कॅरी बॅगचे उत्पादन करणाऱ्या लकडगंज झोन अंतर्गत वर्धमाननगर स्थित एच.जी. इंडस्ट्रीज फॅक्टरीवर नागपूर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापन विभागाने छापा टाकून जप्ती कारवाई केली, शुक्रवारी (ताः ४ ) रोजी करण्यात आलेल्या कारवाई दरम्यान ५८९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक, कॅरीबॅग्स, खर्रा पन्नी ज्याची किंमत अंदाजे ७० हजार ६८० इतकी आहे त्याला जप्त करण्यात आले.

मनपा घनकचरा व्यस्थापन विभागाचे संचालक आणि उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले यांनी सांगितले की, गुप्त सूचनेनुसार वर्धमाननगर स्थित एच.जी. इंडस्ट्रीज येथे सिंगल यूज प्लास्टिक कॅरीबॅगचे मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरु असल्याची माहिती मिळाली. या माहितीनुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार ही कारवाई करण्यात आली. शुक्रवारी (ता. ०४) संबंधित फॅक्ट्रीवर छापा टाकण्यात आला. याप्रसंगी ग्रीन फाउंडेशनचे श्रीकांत शिवणकर, उपद्रव शोध पथकाचे प्रमुख श्री. वीरसेन तांबे आणि त्यांची चमू सुशील गुप्ते, प्रेमदास तरवटकर, नथू खांडेकर, अरविंद बघेले, राणा प्रताप सिंह या संपूर्ण कारवाइ प्रसंगी उपस्थित होती.

मनपातर्फे महाराष्ट्र पर्यावरण नियंत्रण विभागाला देखील याची माहिती देण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी श्रीमती शीतल रविकांत उंधाडे, श्री. अमोल देशमुख याप्रसंगी उपस्थित होते. मनपातर्फे ५८९ किलो सिंगल युज प्लास्टिक जप्त केले. फॅक्टरी मालक हार्दिक गाडिया यांच्यावर प्रथम गुन्ह्याकरिता 5 हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

# एम्समध्ये पाच वर्षात दुपटीने वाढले मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये (एम्स नागपूर) २०२० ते जुलै २०२४ या पाच वर्षात रूग्ण मृत्यूंची संख्या दुपटीने वाढली आहे. २०२० मध्ये २५ मृत्यू झाले होते. ती संख्या २०२३ मध्ये एकदम १०१९ मृत्यूवर गेली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी मागितलेल्या माहितीत हे वास्तव उघड झाले आहे.

ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये २०२१ मध्ये ३०६, २०२२ मध्ये ६८८, २०२३ मध्ये १०१९ आणि जुलै २०२४ पर्यंत ७५६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली आहे. या शिवाय २०१९ मध्ये ओपीडीत १५,६६६७, २०२० : ८७,२३२, २०२१ : १,११,७३९, २०२२ : ३,८६,९०१, २०२३ : ५,५७,०९२ आणि जुलै २०२४ पर्यंत ३,८७,४९७ रूग्णांची तपासणी करण्यात आली. एम्स एक वैद्यकीय संशोधन सार्वजनिक उच्च शिक्षण संस्था आहे. जुलै २०१४ मध्ये घोषित केलेल्या "फेज-४' ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसपैकी एक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भूमिपूजन झाले होते.

# गुंड गजाआड

**नागपूर :** गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने गस्तीदरम्यान एका तडीपार गुंडाला अटक केली. हिमांशू नामदेव चिंचुळकर (24) रा. तलमले लेआऊट, ओमनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. हिमांशू हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गुन्हे नोंद आहेत. 30 जुलै 2024 रोजी परिमंडळ क्र. 3 च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला 6 महिन्यांसाठी नागपूर जिल्ह्यातून तडीपार केले होते. बुधवारी सकाळी 11 वाजताच्या सुमारास सामाजिक सुरक्षा विभागाचे पथक कळमना ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. तलमले लेआऊटच्या शीतला माता मंदिरजवळ पोलिसांना हिमांशू फिरताना दिसला.

# सायबर गुन्ह्यात वाढ पोलीसही त्रस्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

देशासह महाराष्ट्रात सुद्धा सायबर गुन्ह्याच्या घटनेला वेग आला आहे. याचेच परिणाम 23 10 2024 रोजी नागपूर येथील दाभा परिसरातील एका महिलेला व्हाट्सअप वर फोन आला.

महिलेने फोन उचलताच समोरच्या व्यक्तीने महिलेला विचारले तुमचा मुलगा पुण्याला राहतो का सदर महिलेने हो म्हणताच आरोपीने सांगितले की तुमचा मुलगा अत्याचार प्रकरणांमध्ये अडकलेला आहे. मुलाला वाचवायचे असेल तर एक लाख वीस हजार आत्ताच फोन पे वर पाठवा नाहीतर तुमच्या मुलाला कोणीही वाचवू शकणार नाही. महिलेने घाबरून त्वरित आरोपीला फोन पे वर 9500 रू. पाठवले व महिलेने पतीला फोनवर पैसे पाठवण्यास सांगितले.


फियार्दीच्या पतीने स्वतःच्या मुलाच्या फोन पे वर पैसे पाठवताच मुलाने आईला फोन करून विचारले की पैसे कशासाठी पाठवले तेव्हा सर्व भांडा फुटला कारण मुलगा पुण्यातील एका कंपनीमध्ये काम करतो व त्यावेळी तो कंपनीतच होता. आरोपी वारंवार उर्वरित पैशाची मागणी करू लागला.

तेव्हा फियार्दी महिलेने आरोपीला असे का केले असा जाब विचारला असता आरोपीने फोन बंद केला फियार्दी महिला दाभा परिसरात राहत असल्यामुळे गिट्टीखदान पोलीस स्टेशन गाठणार असल्याचे महिलेने स्वतः सांगितले.


## एलआयसी चौक ते ऑटोमोटिव्ह चौक पर्यंतच्या

## डबल डेकर उड्डाणपुलाचा

## लोकार्पण समारंभ



मा. ना. श्री. एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य






“दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा, कनेक्टिव्हीटी, उत्पादकता, शाश्वत उपाय आणि सुरक्षा या सर्वाची हमी देणाऱ्या अत्याधुनिक पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी आमचे सरकार ते सर्व प्रयत्न करीत आहे.”
मा. ना. श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान

**दिनांक :** शनिवार, 5 ऑक्टोबर 2024 । **वेळ :** दुपारी 12 वाजता । **स्थळ :** एलआयसी चौक, नागपूर

मा. डॉ. नितीन राऊत, आमदार, उत्तर-नागपूर | मा. श्री. विकास ठाकरे, आमदार, पश्चिम-नागपूर

यांच्या विशेष उपस्थितीत



मा. ना. श्री. नितिन गडकरी
केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक व महामार्ग विभाग, भारत सरकार
यांच्या शुभहस्ते

उपस्थित विधानपरिषद/ विधानसभा सदस्य महोदय

मा. श्री. प्रविण दटके, आमदार | मा. श्री. अभिजीत वंजारी, आमदार | मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, आमदार | मा. श्री. सुधाकर अडबाले, आमदार

मा. डॉ. परिणय फुके, आमदार | मा. श्री. कृपाल तुमाने, आमदार | मा. श्री. कृष्णा खोपडे, आमदार, पूर्व-नागपूर | मा. श्री. विकास कुंभारे, आमदार, मध्य-नागपूर | मा. श्री. मोहन मते, आमदार, दक्षिण-नागपूर

यांच्या प्रमुख उपस्थितीत



मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री, नागपूर जिल्हा
यांच्या अध्यक्षतेखाली

**एलआयसी चौक ते ऑटोमोटिव्ह चौक पर्यंतच्या डबल डेकर उड्डाणपुलाचे वैशिष्ट्ये :**

- 5.67 किमी लांबीचा डबल डेकर फ्लायओव्हर 4 लेनचा आहे.
- गुरुद्वारा (गड्डीगोदाम) येथे चार-स्तरीय वाहतूक व्यवस्था निर्माण होणार आहे. देशातील ही पहिली संरचना आहे ज्यामध्ये



1. पहिल्या स्तरावर राष्ट्रीय महामार्ग आहे
2. दुसऱ्या स्तरावर भारतीय रेल्वे ट्रॅक
3. तिसऱ्या स्तरावर उड्डाणपुल
4. चौथ्या स्तरावर मेट्रो मार्ग आहे

- या उड्डाणपुलावर पाच मेट्रो स्थानके असुन ती गड्डीगोदाम चौक, कडबी चौक, इंदोरा चौक, नारी रोड आणि ऑटोमोटिव्ह चौक आहेत.
- कामठी मार्गावरील या उड्डाणपुलामुळे या मार्गावरील वाहतूक कोंडीतून दिलासा मिळणार असून, कामठीहून येणाऱ्या-जाणाऱ्यांना या उड्डाणपुलावरून थेट प्रवास करता येणार आहे, ज्यामुळे वेळ व इंधनाचीही बचत होणार आहे.
- हा मार्ग महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्पांकडे जातो हे उल्लेखनीय आहे की, नागपूर शहराची टायगर कॅपिटल अशी वेगळी ओळख आहे.

Courtesy : Orange City Foundation

# हजारो रूग्णांनी घेतला आरोग्य शिबिराचा लाभ

■ **महासागर प्रतिनिधी**
**मौदा , दि. ४ :**

साद माणुसकीची धनदिप बहुउद्देशीय संस्था नाशिक द्वारा व मौदा पंचायत समिती सभापती स्वप्नील श्रावणकर व मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने धनदीप बहुउद्देशीय संस्थेचे संचालक पत्रकार तुषार कुंजेकर यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील खात येथील समाज भवनच्या प्रांगणात भव्य मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यात खात परिसरातील हजारो महिला. पुरुषांनी व इतर नागरिकांनी मोफत आरोग्याची तपासणी केली. ग्रामीण भागात आरोग्याच्या अनेक समस्या आहेत. मात्र आर्थिक अडचणीपोटी ग्रामस्थ योग्य उपचार घेऊ शकत नाही.

ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या आरोग्याच्या तपासणीसाठी नागपूर येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर वानाडोंगरी येथील 25 तज्ञ डॉक्टरांची चमू खात दाखल करून भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे सभापती स्वप्नील श्रावणकर यांनी समारोपीय कार्यक्रमात सांगितले.



यात औषधीशास्त्र विभाग वैभव फुंडकर, दंतरोग विभाग सायली इंगळे, अस्थिरोग विभाग अमोल पापेवार, स्त्रीरोग विभाग विधी जैन, बालरोग विभाग शगीरा शर्मा, नेत्ररोग विभाग श्रद्धा नांदिकर, नेत्ररोग विभाग सोहम गाडेवार, नेपाळ कावडे, दिनेश पारधी, वेदांत उघडे, राजेंद्र वैराळे, आशिष शेळके यांच्यासह अनेक डॉक्टरांची उपस्थिती होती.

धनदिप बहुउद्देशीय संस्था नाशिक अध्यक्ष यमुनाताई अवकाळे यांच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये अनेक जिल्हा तालुका व गाव पातळीवर संस्थेच्या वतीने गरीब व गरजू विद्यार्थी तसेच अनेक गरजू महिलांना मदतीचा हात म्हणून संस्थेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आगळे वेगळे उपक्रम संस्थेच्या माध्यमातून सुरू असतात. ग्रामीण भागामध्ये आरोग्याच्या अनेक समस्या आहेत मात्र आर्थिक अडचणी मुळे गरीब व गरजू कुटुंबीय योग्य उपचार घेऊ शकत नाही याकरिता ग्रामीण भागातील जनतेला योग्य तो उपचार घेता यावा याकरिता आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये आरोग्याच्या अडचणी निर्माण होऊ नये त्याकरिता आम्ही सदैव तत्पर राहू असे वक्तव्य धनदीप बहुउद्देशीय संस्थाचे संचालक तुषार कुंजेकर यांनी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमाला उपस्थित म्हणून जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण सभापती अवंतिका लेकुरवाडे, मौदा पंचायत समिती सभापती स्वप्नील श्रावणकर, दुर्गा ठाकरे पं.स.सदस्य, माधुरी वैद्य सरपंच, कांचन देवतारे उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य राकेश बागडे, तुलसा गिरीपुंजे, ज्योतीपाल गजभिये, कैलास वैद्य, अक्षय जगनाडे, सचिन रावते, मनोज कावडे, सुनील ढोलवार, लोकेशा करे सचिन निरगुडकर, लोकेश मोहतुरे, बालवीरसिंग रावते, आशिष दळणे, अंकुश पटले,निशा बागडे,ज्योती कुंजेकर सीमा खोब्रागडे महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रघुनाथ शहारे, तालुकाध्यक्ष शैलेश रोशनखेडे, तुषार कुंजेकर, अजय मते, नाना नानवटकर, चक्रधर गभने, महेंद्र चकोले, नारायण जर्वेकर, दिलीप इंगोले व ग्रामस्थ उपस्थित होते.

# 'उमेद'च्या कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन




■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक , दि. ४ :**

उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने प्रलंबित मागण्यासाठी बेमुदत कामबंद आंदोलन पुकारण्यात आले असून,दि. ३ ऑक्टोबर पासून येथील कर्मचाऱ्यांनी पंचायत समिति कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (उमेद) तालुक्यात हजारो महिला स्वयंसहाय्यता समूहामार्फत जोडल्या गेल्या आहेत. या महिलांना प्रशिक्षण देणे, वित्तीय व्यवस्थापनाचे महत्त्व तसेच त्यांच्या उपजीविकेमध्ये वाढ होण्यासाठी उमेदचे कर्मचारी, अधिकारी रात्रंदिवस परिश्रम करून अभियानासाठी काम करीत आहेत. परंतु त्यांच्या मागण्यांकडे राज्य सरकार दुर्लक्ष करीत असल्याचा या कर्मचाऱ्यांचा आरोप आहे.

यामुळेच दि. १० ते १२ जुलै दरम्यान मुंबई येथे अधिवेशन कालावधीत आंदोलन करण्यात आले. मात्र, आंदोलनावेळी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता मुख्यमंत्री व ग्रामविकासमंत्री यांनी अजून केलेली नाही. त्यामुळे अभियानाच्या सर्व महिला, कार्यरत केडर, कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाला स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कर्मचारी, अधिकारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घ्यावे, समुदाय संसाधन व्यक्ती यांना आशासेविका, अंगणवाडी सेविका यांच्याप्रमाणे शासकीय दर्जा देण्यात यावा, या मागण्यांसाठी काम बंद करून पंचायत समिति कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

यावेळी उपोषणात अध्यक्ष रामटेक तालुका उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनाचे अध्यक्षा मल्खा दिनेश चोखांद्रे, सचिव, रामटेक तालुका उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना सीमा सुरेंद्र बिरनवार व तालुक्यातील सर्व उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोत्ती अभियानातील महिला बचत गटाचा सर्व सीआरपी, बँक सखी, कृषी सखी, पशु सखी, व कर्मचारी डोये, मरस्कोल्हे, पडोळे, दिवटे उपस्थित होते.

## काटोल व नरखेड येथील थांबे पूर्ववत सुरू केल्याबद्दल रेल्वेमंत्र्यांचे आभार

■ **महासागर प्रतिनिधी**
**काटोली, दि. ४ :**

अमरावती जबलपूर एक्स्प्रेसचे काटोल आणि नरखेड येथील, चेन्नई-नवी दिल्ली एक्स्प्रेसचे नरखेड येथील आणि कोरबा-बिलासपूर-अमृतसर-छत्तीसगड एक्स्प्रेसचे काटोल येथील रेल्वेचे थांबे सुरू करण्यास रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे.

काटोल आणि नरखेड परिसरातून रेल्वेच्या माध्यमातून लाखो लोकं प्रवास करतात. या तीन गाड्यांचे बंद असलेले थांबे पूर्ववत सुरू केल्यामुळे या भागातील प्रवाश्यांना नक्कीच फायदा होणार आहे. या भागातील प्रवाशांची गरज लक्षात घेत रेल्वे मंत्रालयाने काटोल व नरखेड येथील बंद असलेले थांबे पूर्ववत सुरू केल्याबद्दल रेल्वे मंत्री श्री अश्विनी वैष्णवजी व भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळेजी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो", अशी प्रतिक्रिया भाजपाचे प्रवक्ते व ओबीसी मोर्चा प्रदेश प्रभारी, माजी आमदार डॉ आशिषराव देशमुख यांनी व्यक्त केली.

# खैरीमध्ये गांधी जयंतीवर सफाई अभियान

■ **महासागर प्रतिनिधी**
**कामठी , दि. ४ :**

कामठी जवळील खैरी गावात राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्ताने खैरी ग्राम पंचायत कार्यालय परिसरात खैरी व रोजगार संघ नागपुर च्या संयुक्त विद्यमाने खैरी गावात स्वच्छता व युवकांमध्ये संवाद उपक्रम आणि स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. महात्मा गांधी, संत गाडगे बाबा व दिवंगत पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांच्या फोटोचे पुजन व अभिवादन करून कार्यक्रम सुरू करण्यात आला. उपस्थितांना रोपे देवुन स्वागत करण्यात आले. अभिजीत धांडे, भाविक कापसे, शुभम धांडे यांना पुस्तके भेट देवुन स्वागत केले. यानंतर सर्वांनी हातात फडे घेवुन गावात साफसफाई केली. कार्यक्रमात संजय नथे, गजानन बोबडे, वसंतराव वराडे, उद्धव साबळे, सरपंच यौगिता धांडे, उपसरपंच राम ठाकरे, अमोल सोनेकर, त्रीशीला नगरारे, माया कानफाडे, किशोर धांडे सहित अनेकजन उपस्थीत होते.



## मध्य रेल्वे नागपूर विभागाकडून ताडाली यार्ड येथे तिसरी लाईन सुरू

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने 01 ऑक्टोबर 2024 रोजी 19:50 वाजता ताडाली यार्ड येथे 3री लाईन कनेक्टिव्हिटी यशस्वीरित्या सुरू केली. या नवीन मार्गामुळे कार्यक्षमतेत वाढ होईल आणि ताडाली यार्ड येथे वाहतूक कोंडी कमी होईल, जे रेल्वे वाहतुकीसाठी एक महत्त्वाचे जंक्शन आहे. पहिली ट्रेन, 12296 एक्सप्रेस, त्याच दिवशी 19:58 वाजता नव्याने सुरू झालेल्या मार्गावरून डाऊन दिशेने गेली. ट्रेनच्या सुरक्षित प्रवासामुळे नव्याने स्थापित केलेल्या पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर झाला. तिस?या लाईन कनेक्टिव्हिटीसाठी सर्व सुरक्षा प्रोटोकॉल आणि ऑपरेशनल मानके पाळली गेली आहेत याची खात्री करून कार्यान्वित करण्यापूर्वी संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांकडून सुरक्षितता प्रमाणपत्र योग्यरित्या प्राप्त केले गेले. हा विकास रेल्वे पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी आणि प्रवासी आणि मालवाहतूक चालकांना चांगली सेवा सुनिश्चित करण्यासाठी मध्य रेल्वेच्या सततच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. ताडाली यार्ड येथे 3री लाईन जोडल्याने कोचिंग आणि माल दोन्ही सुरळीत आणि अधिक कार्यक्षम रेल्वे ऑपरेशनमध्ये लक्षणीय योगदान मिळेल.

## निधन

### सविता सोनटक्के



■ **महासागर प्रतिनिधी,**
**हिंगणा , दि. ४ :**

साईनगर, डिंगडोह निवासी सविता शेषराव सोनटक्के (६८) यांचे आज सकाळी १० वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी पाच वाजता डिंगडोह येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी शिक्षा शिरोमणी पुरस्काराने सन्मानित

■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ४ :**



कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक चे कुलगुरू आणि भारतीय दर्शन आणि न्यायशास्त्राचे प्रगाढ विद्वान प्रो. हरेराम त्रिपाठी यांना विश्व जागृती मिशन द्वारे शिक्षा शिरोमणी पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

विश्व जागृती मिशनचे संस्थापक परमपूजनीय सुधांशुजी महाराज यांच्या शुभहस्ते श्राद्ध पर्व महोत्सवात न्यायकोविद, पदवाक्यपमाणज्ञ, बादरायण व्यास पुरस्काराने सन्मानित कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांना संस्कृत उच्च शिक्षण तसेच पारंपरिक शास्त्रातील विशेष योगदानासाठी शिक्षा शिरोमणी सन्मानाने गौरवान्वित करण्यात आले. क्षेत्रातील महर्षी वेदव्यास गृरुकुल विद्यापीठ, आनंद धाम आश्रम, नवी दिल्ली येथे पुरस्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी संन्यासी ओंकारानंद विशेषत्वाने उपस्थित होते. धर्मसंघ पीठाधीश्वर ब्रम्हचारी शंकर देव चैतन्य होते.

कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांनी हा पुरस्कार विनम्रतेने स्वीकारीत असून, परमपूजनीय सुधांशुजी महाराजांचा शुभाशीर्वाद मिळणे हे परमभाग्य असल्याचे नमूद केले.

प्रो. हरेराम त्रिपाठी हे भारतीय दर्शनशास्त्र, नव्यन्याय, सांख्ययोग, न्यायशास्त्राचे प्रख्यात विद्वान व दार्शनिक आहेत. त्यांना संस्कृत क्षेत्रातील विविध प्रशासकीय व शैक्षणिक कायार्चा अनुभव आहे. प्रो. त्रिपाठी हे संपूणार्नंद संस्कृत विश्वविद्यालयाचे पूर्व कुलगुरू आहेत.

त्यांनी आतापर्यंत चार संशोधन प्रकल्प पूर्ण केले असून, ४० हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहे. सतत कार्यमग्न असलेल्या व विविध संस्थांमध्ये कार्य करण्याचा अनुभव असलेल्या प्रो. त्रिपाठी यांनी विश्वविद्यालयाच्या विकासासाठी आतापर्यंत ६० कोटी अनुदान तसेच संशोधन प्रकल्प व परिषदांकरिता अनुदान प्राप्त करून दिले आहे. त्यांच्या कार्यकाळात वारंगा आंतरराष्ट्रीय परिसराच्या वास्तूचे कार्य जलदगतीने सुरू असून त्याचे लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे. प्रो त्रिपाठी यांना संस्कृत क्षेत्रातील अतुलनीय योगदानाकरिता भारत सरकारतर्फे महर्षी बादरायण राष्ट्रपती पुरस्कार, कार, शांकर वेदान्त पुरस्कार, पाणिनी सम्मान तसेच उत्तर प्रदेश संस्कृत संस्थानचा विशिष्ट सेवा पुरस्कारासह अनेकानेक सन्मान प्राप्त झाले आहेत.

प्रो. हरेराम त्रिपाठी यांना हा सन्मान प्राप्त झाल्याबद्दल विश्वविद्यालयाचे कुलसचिव प्रो. कृष्णकुमार पाण्डेय आणि सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# १ लाखाच्या मालावर डल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

कामानिमित्त बाहेर जाताच अज्ञात आरोपीने घरफोडी करून दागिने व रोकड असा एकूण 1 लाख 7 हजार 600 रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना वाडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी आकाश अशोक शेळके (42) रा. जय पॅलेस अपार्टमेंट, कमलानगर, वाडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. बुधवारी दुपारी आकाश घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचा कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील सोन्याचांदीचे दागिने व रोख 50 हजार असा एकूण 1,07,600 रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. सायंकाळी 6.40 वाजताच्या सुमारास आकाश घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पुढील तपास सुरू आहे.

# राष्ट्रीय आदर्श विद्यालय प्रश्नमंजुषेत जिल्ह्यात प्रथम

■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. ४ :**

महाराष्ट्र शासन वन विभाग (सामाजिक वनीकरण) नागपूर यांच्यातर्फे वन्यजीव सप्ताह अंतर्गत परिसंस्था पुनरुज्जीवन व जीर्णोद्धार या विषयावर राष्ट्रीय हरित सेनेच्या नोंदणीकृत शाळांची जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा गुरुनानक भवन, नागपूर येथे ३ ऑक्टोबरला घेण्यात आली.

या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध नामांकित शाळांचा सहभाग असल्याने अतिशय चुरशीच्या स्पर्धेत राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ कला महाविद्यालय नवेगाव खैरी या शाळेतील विद्यार्थ्यांनी लेखी, बहुपर्यायी व हकप्रश्नांची सर्वोत्तम योग्य उत्तरे देऊन नागपूर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाचे स्थान पटकावले.




पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या पश्चिम भागात असलेल्या गाव खेड्यातील विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य दाखवून प्राप्त केलेल्या यशाबद्दल वनसंरक्षक गीता नन्नावरे, विभागीय वनाधिकारी संदीप क्षीरसागर (सामा. वनी), किशोर कैलुके (वनपरिक्षेत्र अधिकारी (सामा. वनी.) पारशिवनी, संस्थेचे अध्यक्ष आनंदरावजी देशमुख (माजी आमदार), सचिव मयंकराव देशमुख, मुख्याध्यापक रवींद्र चन्ने यांनी शाळेचे स्पर्धक निसर्गदूत वैभव सहारे, सक्षम सोनेकर, यश डायरे आणि राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक शिक्षक साक्षोधन कडबे यांचे अभिनंदन केले.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या पश्चिम भागात वसलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या यशाबद्दल त्यांच्यावर संपूर्ण जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मागील वीस वर्षांपासून राष्ट्रीय आदर्श विद्यालयाच्या माध्यमातून पश्चिम पेंच व्याघ्र प्रकल्पातील बफर झोनमधील गावात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाच्या संदर्भात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शाळेला छत्रपती श्री शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार २०१९ प्राप्त झालेला आहे. याप्रसंगी जिल्ह्यातील समस्त वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचारी, स्पर्धेतील सहभागी शाळांचे शिक्षक तसेच पारशिवनी तालुक्यातील वनपाल अनिल राठोड, सुरज चोपडा, शाळेतील शिक्षक प्रशांत पोकळे, दिलीप पवार, अमित मेश्राम, सतीश जुननकर, शैलेंद्र देशमुख, रितेश मैंद, वनरक्षक सुरज चोपडा, वनसेवक मनोहर शेंडे, ढोके तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक यांचे द्वारा विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.

## आज वाडी नगर परिषद इमारत व उड्डानपूलाचा लोकार्पण सोहळा




■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. ४ :**

नगर परिषद वाडीच्या प्रशासकीय इमारतीचा लोकापर्ण सोहळा, भूमिगत गटार योजनेचा भूमीपूजन सोहळा शनिवार ५ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता तसेच वाडीतील चार पदरी उड्डाणपुलाचा लोकापर्ण सोहळा शनिवार ५ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ४.३० वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार समीर मेघे, आ. प्रविण दटके आ. अभिजित वंजारी, आ. चंद्रशेखर बावनकुळे आ. सुधाकर अडबाले आ. डॉ. परिणय फुके आ. कृपाल तुमाने , आ. टेकचंद सावरकर, जि.प. अध्यक्षा मुक्ता कोकड्डे ,जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन वाडी नगर परिषदचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. विजय देशमुख यांनी केले आहे.

# स्वच्छता पखवाड्याच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी स्वच्छ स्टेशन थीमवर स्वच्छता मोहीम

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ४ :**

रेल्वे स्वच्छता पखवाड्याच्या चौथ्या दिवशी 03 व 04 सप्टेंबर'24 रोजी दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर विभागातर्फे स्वच्छ स्थानके या विषयावर नमिता यांच्या नेतृत्वाखाली नागपूर विभागातील स्थानकांवर तीव्र स्वच्छता मोहीम राबविण्यात आली त्रिपाठी, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नागपूर विभागातील नामनिर्देशित वरिष्ठ विभागीय अधिकाऱ्यांनी विभागातील प्रमुख स्थानकांवर व्यावसायिक निरीक्षक, पर्यवेक्षक, कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्था, रेल्वे समिती सदस्य, स्काऊट-गाईड यांच्या सहभागाने स्वच्छता मोहीम राबवून लोकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

विभागातील सर्व स्थानकांवर पुरेशा संख्येने डस्टबीनची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि ओला व सुका कचरा स्वतंत्र डस्टबिनमध्ये टाकणे, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि नाल्यांची स्वच्छता, प्लास्टिक बॉटल क्रश मशीनची क्षमता, प्लास्टिक कचरा निर्मिती क्षेत्र, प्लास्टिकवर विशेष भर देण्यात आला. वापर थांबवण्यासाठी समुपदेशन इ. प्लॅटफॉर्मवरील प्रवाशांचे समुपदेशन आणि सीसीटीव्ही इत्यादींच्या माध्यमातून स्वच्छता उपक्रमांवर देखरेख ठेवण्याची खात्री करण्यात आली. दैनंदिन जीवनात स्वच्छतेचा अवलंब करून प्रवाशांमध्ये जनजागृती करण्याची विनंती केली. स्थानकावर उपलब्ध असलेल्या सर्व रेल्वे युनिटमध्ये स्वच्छता राखण्याच्या आणि न वापरलेल्या साहित्याची विल्हेवाट लावण्याच्या सूचना दिल्या.



या कालावधीत प्लॅटफॉर्म, प्रवासी प्रतीक्षालय, केटरिंग स्टॉल तसेच संपूर्ण स्टेशन परिसरात चांगली स्वच्छता राखण्यात आली. साफसफाईसाठी वापरल्या जाणाऱ्या मशीनची उपलब्धता आणि कार्य स्थिती, बाटली क्रशिंग मशीन, डस्टबिन आणि उपकरणे यांची उपलब्धता देखील सुनिश्चित केली गेली.

तपासणी दरम्यान, स्टेशन परिसर आणि सामान्यतः अस्वच्छ परिसर स्वच्छ करण्यात आला आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. स्टेशन परिसराभोवती हायड्रंट पाईप्सची योग्य देखभाल सुनिश्चित करण्यासाठी नाल्यांच्या साफसफाईसह, योग्य स्टॅकिंग पद्धती देखील सुनिश्चित केल्या गेल्या. 05 आणि 06 सप्टेंबर'24 रोजी स्वच्छ ट्रेन या थीमवर स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

# आव्हानात्मक परिस्थितीची बलस्थाने, कमजोर दुवे, संधी आणि धोके यांचे विश्लेषण करून कृती करा : अर्जुन राम मेघवाल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

प्रशिक्षण हा जीवनाचा अविभाज्य पैलू असून जीवनात आव्हानात्मक परिस्थितीचे स्वॉट एनालिसिस अर्थात बलस्थाने, कमजोर दुवे, संधी आणि धोके यांचे विश्लेषण करून त्या आधारावर कृती करावी असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार), कायदा आणि न्याय मंत्रालय आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज नागपूरमध्ये केले.नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी येथे इन्कम टॅक्स ॲपलीट ट्रेब्युनल - आयटीएटी अर्थात आयकर अपील न्यायाधिकरण सदस्यांकरिता तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन आज मेघवाल यांच्या हस्ते झाले.



त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आयटीएटीचे अध्यक्ष सी.व्ही बडंग, एनएडीटीचे प्रधान महासंचालक (प्रशिक्षण), संजय बहादूर, एनएडीटीचे महासंचालक पी. सेल्वागणेश, आयटीएटीच्या पुणे विभागाचे उपाध्यक्ष आर.के. पांडा प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी सदस्यांना संबोधित करताना केंद्रीय मंत्री मेघवाल यांनी सांगितले की, आयकर कायद्यासंदभार्तील अपील स्वरूपाच्या अत्यंत गुंतागुंतीच्या केसेस, भारतातील अधिकारी इतर पाश्चात्य देशातील सदस्यांपेक्षा योग्य रीतीने हाताळतात.

त्यांनी या सर्वांना आव्हानांना संधी आणि शक्तीत रूपांतरित करण्याचे आवाहन केले. अपिलीय अधिकाऱ्यांना केवळ चार्जशीट आणि निलंबनाच्या दंडात्मक कृतींपेक्षा सुधारात्मक कारवाईच्या महत्त्वावर भर देण्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटकीय सत्रामध्ये वैयक्तिक अनुभवाची आठवण करून आणि मोक्ष महाजन यांचे उदाहरण उद्धृत करून, राजस्थानच्या उद्योजकांना एक शासकीय अधिकारी म्हणून त्यांच्या पूर्वीच्या कारकिर्दीत आयकर अपिलासंदर्भात न्याय मिळवून दिल्याचे त्यांनी उपस्थितांना सांगितले. या कार्यक्रमाच्या उद्घाटकीय सत्राचे आभार प्रदर्शन आयटीएटीच्या पुणे विभागाचे उपाध्यक्ष आर.के. पांडा यांनी केले. या कार्यक्रमानंतर अर्जुन राम मेघवाल यांनी भारतीय महसूल सेवेच्या 77 व्या बॅचच्या अधिकारी प्रशिक्षणार्थींनाही संबोधित केले. त्यांनी अधिकारी प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या कृतीचा देश आणि मानवतेला फायदा होईल.

# एमपीएससी अध्यक्षांना फडणवीसांचा फोन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) संयुक्त गट-ब व गट-क-२०२४ च्या जाहिरातीची स्पर्धा परीक्षार्थी चातकाप्रमाणे वाट बघत असताना वर्ष उलटूनही अद्याप पदभरतीची चिन्हे दिसत नसल्याने उमेदवारांची चिंता वाढली आहे. मराठा आरक्षणामुळे जाहिरातीत बदल करायचा असून शासनाकडून सुधारित मागणीपत्र एमपीएससीला अद्यापही प्राप्त न झाल्याने संयुक्त परीक्षेची जाहिरात रखडल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे मोठ्या संख्येने पदे असलेल्या पोलीस उपनिरीक्षक पदाचेही मागणीपत्र अद्याप प्राप्त झालेले नाही. मात्र, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या परीक्षेच्या संदर्भात फार महत्त्वाची घोषणा केली आहे. त्यामुळे आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी परीक्षेची जाहिरात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शासन सेवेतील गट ब आणि क पदांसाठीची जाहिरात पुढच्या आठवड्यातच काढण्यात येणार आहे. याबाबतची माहिती खुद्द राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. फडणवीसांनी दिलेल्या या माहितीमुळे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गट ब आणि क पदांची जाहिरात काढण्यासाठी आपण एमपीएससी अध्यक्षांना मी फोन करून विनंती केल्याची माहितीही फडणवीस यांनी ट्विट करत दिली आहे. आपल्या एक्स अकाऊंटवर त्यांनी लिहिले की, शासन सेवेतील गट ब आणि क पदांसाठीची जाहिरात तत्काळ प्रकाशित करण्यात यावी, यासाठी अनेक विद्यार्थ्यांनी माझ्याकडे मागणी केली होती. आज अध्यक्षांना मी फोन करून यासंदर्भात विनंती केली. त्यांनी येत्या आठवड्यातच ही जाहिरात काढण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे. यामुळे इच्छूक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

दुसरीकडे फडणवीसांच्या याच ट्विटवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. रोहित पवारांनी ट्विटमध्ये लिहिले की, संयुक्त परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध करण्यासाठी आयोगाची कुठलीच हरकत नाही, केवळ आपल्या गृहविभागाकडून पीएसआय पदाचे मागणीपत्रक आयोगाकडे गेले नसल्याने जाहिरात प्रसिद्ध होऊ शकलेली नाही.

त्यामुळे आपल्या विभागाने तात्काळ रिक्त पदांचे मागणी पत्रक आयोगाला पाठवून सहकार्य केल्यास जाहिरात त्वरित प्रसिद्ध होऊ शकते. राज्यात पीएसआयच्या जवळपास २५०० जागा रिक्त आहेत. त्यामुळे ज्याप्रमाणे २०१२ मध्ये तत्कालीन गृहमंत्री स्व.आर आर आबांनी १८५२ जागांची भरती केली होती.

# वाहतुकीसाठी खुला होणार कामठी मार्गावरील उड्डाणपूल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

सात वर्षांच्या प्रतीक्षेनंतर, कामठी रोड डबलडेकर उड्डाणपूल शनिवार, 5 ऑक्टोबर रोजी वाहनांच्या वाहतुकीसाठी खुला होणार आहे. तथापि, वाहतूक सुरळीत करण्याचा फ्लायओव्हरचा हेतू असूनही, लिबर्टी टॉकीज आणि एलआयसी स्क्वेअरजवळील आधीच गजबजलेल्या भागात वाहतूक कोंडीची चिंता वाढत आहे.

नागपूर मेट्रोने वाहतूक व्यवस्थापनाची जबाबदारी नागपूर वाहतूक विभागाकडे सोपवली असली तरी स्थानिक प्रवासी मात्र साशंक आहेत. नवीन उड्डाणपुलामुळे एलआयसी स्क्वेअर आणि कॉन्स्टिट्यूशन स्क्वेअर मधील वाहतूक समस्या आणखी वाढण्याची शक्यता आहे, जिथे आता अनेक उड्डाणपूल एकत्र येतात.

कामठी रोड उड्डाणपुलाच्या समावेशासह, आता तीन उड्डाणपूल आहेत. सदर-मानकापूर-काटोल रोड उड्डाणपूल, राम झुला उड्डाणपूल आणि नवीन कामठी रोड उड्डाणपूल - जे एलआयसी स्क्वेअर आणि कॉन्स्टिट्यूशन स्क्वेअर दरम्यान कमी अंतरावर एकमेकांना छेदतात. सदर उड्डाणपुलामुळे आधीच जामची समस्या निर्माण होत आहे, त्यामुळे वाहतूक पोलिसांना रेसिडेन्सी रोडवरून वाहने वळवावी लागत आहेत. एलआयसी स्क्वेअरजवळील कामठी उड्डाणपूल उतरल्याने परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे.

# सात कोटी खर्चूनही प्रशिक्षणाचे विमान जमिनीवरच
# ओबीसी प्रवगातील मुलांची फरफट

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच ओबीसी समाजातील मुलांना वैमानिकाचे प्रशिक्षण देऊ इच्छिणाऱ्या महाज्योती आणि राज्य सरकारच्या कुचकामी धोरणामुळे प्रशिक्षणार्थी वैमानिकांना त्यांच्या भविष्याची चिंता सतावत आहे. या योजनेसाठी आतापर्यंत साडेसात कोटी रुपयांचा खर्च करूनही अनेकांना एका तासाचेही प्रशिक्षण मिळालेले नाही. त्यामुळे हे प्रशिक्षणार्थी मागच्या तीन दिवसांपासून नागपुरात उपोषणाला बसले आहेत.

महाज्योतीने राज्यातील ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवगातील युवकांना वैमानिकाचे प्रशिक्षण देण्यासाठी योजना सुरू केली. त्यासाठी महाज्योती आणि नागपूर फ्लाईंग क्लब यांच्यात करार झाला. महाज्योतीने नागपूर फ्लाईंग क्लबला साडेसात कोटी रुपये दिले. या प्रशिक्षणासाठी इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवण्यात आले. राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील २० युवकांची या प्रशिक्षणासाठी निवड झाली. १ नोव्हेंबर २०२२ ला प्रशिक्षण सुरू झाले. प्रशिक्षणाचा कालावधी १८ महिन्यांचा आहे आणि किमान २०० तास विमान उडवण्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाचा कालावधी ३० एप्रिल २०२४ ला संपला. पण, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले नाही. काही विद्यार्थ्यांना तर एक तास देखील विमान उडवण्याचे प्रशिक्षण दिले गेले नाही.

दोन वर्षांच्या कालावधीत विद्यार्थ्यांना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) व्यावसायिक पायलट परवाना (सीपीएल) परीक्षांसाठी योग्य आणि पूर्ण ग्राऊंड क्लासेस मिळाले नाहीत. महाज्योती आणि नागपूर फ्लाईंग क्लब यांच्या गलथान कारभारामुळे असे घडले, असा आरोप प्रशिक्षणार्थींनी केला आहे. शिवाय त्यांचे महत्त्वाचे दोन वर्ष देखील वाया गेले आहेत. पूर्ण प्रशिक्षण द्या म्हणून सातत्याने पाठपुरावा करूनही शासनाने दखल न घेतल्याने या प्रशिक्षणार्थींनी उपोषण सुरू केले आहे. नागपूर फ्लाईंग क्लब व्यतिरिक्त इतर प्रतिष्ठित संस्थेतून प्रशिक्षण देण्यात यावे, महाज्योतीचा वैमानिक प्रशिक्षण हा उपक्रम १०० टक्के प्रायोजित आहे. तरी देखील फ्लाईंग क्लबने प्रशिक्षणार्थींना शुल्क आकारले आहे. ती रक्कम परत मिळावी आणि प्रशिक्षणाला विलंब झाल्याने विद्यावेतन देण्यात यावे, अशी या प्रशिक्षणार्थींची मागणी आहे.

गेल्या २३ महिन्यात तीन प्रशिक्षणार्थींना शून्य, एका प्रशिक्षणार्थीला एक तास, एकाला तीन तास उड्डाणाचे प्रशिक्षण देण्यात आले. सर्वाधिक ३५ तासांचे प्रशिक्षण एकाच प्रशिक्षणार्थीला मिळाले.

# न्यायाधीशांच्या घरी चोरट्यांचा डल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ४ :**

शास्त्री वॉर्ड येथील रहिवासी व फिर्यादी मनीषा मुकुल कल्याणकर यांच्या घरी चोरट्यांनी डल्ला मारला असून ३ लाख १७ हजार ३२० रुपयांचे दागिने लंपास केले आहे. ही घटना गुरुवारी ३ ऑक्टोबर सकाळच्या सुमारास उघडकीस आली. फियार्दीचे पती अक्कलकोट येथे न्यायाधीश आहे.

फियार्दी मनिषा कल्याणकर या शास्त्री वॉर्डस्थित घरी नवरात्रानिमित्त पूजाअर्चा करण्यासाठी रामटेकात आल्या होत्या. नवरात्रीच्या पूजेकरिता एक महिला घट घेऊन आली असता तिने लहान घट असल्यामुळे हा घट परत केला. त्यानंतर ती महिला परत निघून गेली. काही वेळात तीन लाखांचे दागिने लंपास, मनीषा कल्याणकर यांना दैनंदिन वापराचे मंगळसूत्र खाली पडलेले दिसले. त्यांना संशय आला. घरातील कपाटाची पाहणी केली असता सोन्याच्या दागिन्यांपैकी मंगळसूत्र, नेकलेस, पाटल्या, अंगठी, गोफ व टॉप्स, सोन्याचे छोटे नाणे कुणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. तत्काळ घटनेची तक्रार रामटेक पोलीस ठाण्यात करण्यात आली. भारतीय न्याय संहिता कलम ३०३ अन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली. चोरी गेलेल्या दागिन्यांमध्ये मोठे सोन्याचे मंगळसूत्र किंमत एक लाख ६२ हजार ३२० रुपये, सोन्याचे नेकलेस किंमत ६० हजार रुपये, सोन्याच्या पाटल्या किंमत दोन लाख रुपये, सोन्याच्या दोन अंगठ्या किंमत ४८ हजार रुपये, सोन्याचा गोप किंमत ६० हजार रुपये, सोनसाखळी किंमत २४ हजार रुपये, सोन्याचे कानातील टॉप्स किंमत ४४ हजार, सोन्याचे छोटे चार नाणे किंमत १६ हजार रुपये तसेच चांदीचे लक्ष्मी नाणे किंमत एक हजार रुपये व रोख दोन हजार रुपये, असा एकूण तीन लाख १४ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. पुढील तपास रामटेक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आसाराम शेटे यांच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

# राणी दुर्गावती जयंती व जोगेंद्रनाथ मंडल स्मृती दिन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

गोंडवाना साम्राज्याच्या राजमाता वीरांगणा राणी दुर्गावती मडावी यांची 5 ऑक्टोंबर रोजी 500 वी जयंती आहे. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना बंगाल प्रांतातून सर्वप्रथम संविधान सभेत निवडून पाठविणारे महाप्राण जोगेंद्रनाथ मंडल यांचा 56 वा स्मृती दिवस आहे. बसपा च्या कही हम भूल ना जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत 5 ऑक्टोंबर रोजी राणी दुर्गावती चौक यादव नगर येथील वीरांगणा दुर्गावतींच्या पुतळ्याला सकाळी 10 वाजता तसेच मान्यवर कांशीराम मार्गावरील बसपा च्या मुख्यालयात जोगेंद्रनाथ मंडल ह्यांना 11 वाजता या दोन्ही महापुरुषांना बसपाच्या वतीने माल्यार्पण करून अभिवादन करण्यात येईल.





याप्रसंगी डॉ नीलकांत कुलसुंगे महापुरुषांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकतील. बसपाचे प्रदेश, जिल्हा, शहर, विधानसभा, सेक्टर व बूथ स्तरावरील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन बसपाचे महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले.

# डॉ. अविनाश आवलगावकर यांचा रिद्धपूर मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाल्याबद्दल सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ४ :**

वंदनीय गोविंदप्रभू यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर (अमरावती) येथे महाराष्ट्र शासनाने मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली, ही केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगातील सर्व मराठी भाषकांसाठी अतिशय आनंदाची व अभिमानाची बाब आहे.



या विद्यापीठाच्या कुलगुरुपदी मा.डॉ. अविनाश आवलगावकर यांची नेमणूक झाली, ही वरूड परिसरातील सर्व नागरिकांसाठी गौरवाची बाब आहे वरूड तालुक्यातील 'काटी' या लहानशा गावात त्यांचा जन्म झाला, पुढे राजुरा येथील शाळेत त्यांचे शिक्षण झाले व विद्यापीठाच्या शीर्षस्थ पदावर त्यांची पहिले कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली, त्याप्रीत्यर्थ त्यांचा सत्कार करण्याचे योजिले आहे.

हा सत्कार चंद्रपूर येथील ८५ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व प्रसिद्ध समीक्षक, साहित्यिक मा. प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या शुभहस्ते व डोंबिवली येथील ९० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व प्रसिद्ध समीक्षक मा. डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ गौरव प्रतिष्ठान व वरुड परिसर मित्र परिवार, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी राहतील.

हा कार्यक्रम शनिवार दि. ५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सायं. ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सत्कार प्रसंगी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन विदर्भ गौरव प्रतिष्ठान, वरूड परिसर मित्र परिवार आणि स्नातकोत्तर मराठी विभाग माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वतीने करण्यात येत आहे.

# पोलिसांनी धाड टाकून ४ दारु विक्रेत्या महिलांना पकडले

**नागपूर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त ड्राय-डे असतानाही अवैध दारू विक्रेत्यांकडून दारूची विक्री करण्यात आली. यशोधरानगर पोलिस आणि परिमंडळ 3 च्या विशेष पथकाने वेगवेगळ्या ठिकाणी धाड टाकून अवैधरित्या दारूची विक्री करणाऱ्या 4 महिलांना अटक केली. यशोधरानगर पोलिसांनी संजय गांधीनगरात सरोज आनंद बोरकर (60) हिला दारूची विक्री करताना पकडले. मालाबाबत विचारले असता तिने शेजारी राहणाऱ्या राखी अरविंद मोटघरे (48) च्या घरी ठेवला असल्याची माहिती दिली. पोलिसांनी राखीच्या घरी धाड टाकून देशी दारूच्या 522 आणि विदेशी दारूच्या 160 बॉटल जप्त केल्या. दोघींनाही ताब्यात घेऊन पोलिसांनी 46,170 रुपयांचा माल जप्त केला. झोन 3 च्या पथकाने पाचपावलीच्या आदर्शनगरात ललिता सागर धनविजय (62) च्या घरी धाड टाकली. तिच्या घरातून देशी दारूच्या 30 बॉटल जप्त केल्या.

# व्यवसायिकाच्या कार्यालयात ४.२८ लाखांची चोरी

**नागपूर :** अज्ञात आरोपीने एका व्यवसायिकाचे गोदाम आणि कार्यालय फोडून 4.28 लाख रुपयांवर डल्ला मारला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी राहुल नंदलाल चांडक (43) रा. गार्डन एन्क्लेव्ह अपार्टमेंट, मॉडेल मिल रोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. पारडीच्या सोनबानगरात राहुल यांचे गोकुल इंटरप्रायजेस नावाने गोदाम आणि गोदामावरच कार्यलय आहे. रात्री 10 वाजताच्या सुमारास राहुल कार्यालय आणि गोदाम बंद करून घरी गेले होते. मध्यरात्रीला चोरांनी खिडकीवर लागलेले टीन वाकवून पीओपीची तोडफोड करून आत प्रवेश केला.

# अपघात विम्याचे पैसे उकळण्यासाठी रचला कट, पण पोलिसच अडकले

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**

अपघात विम्याचे पैसे उकळण्यासाठी लकडगंज पोलीस ठाण्यातील तत्कालीन सहायक पोलीस उपनिरीक्षकाने तिघांना हाताशी धरुन अपघाताचा बनाव रचला. तोतया साक्षिदार आणि तक्रारदाराचा जबाब घेऊन न्यायालयात आरोपपत्र पाठवले. मात्र, त्यांची योजना फसली आणि पोलीस उपनिरीक्षकासह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. राजकुमार पन्नालाल उपाध्याय असे आरोपी पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे. नुकताच बजाजनगर पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर सुद्धा खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा धुळीस मिळाली.

शिवमौली जयवंत दोरनारवार हे नागपूर नागरिक सहकारी बँकेत शाखा व्यवस्थापक पदावर कार्यरत होते. ३१ डिसेंबर २०१६ रोजी ते पायी बँकेत जात होते. दरम्यान, त्यांना एका वाहनाने धडक दिली. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणात सहायक पोलीस निरीक्षक कॉंक्रीटवार यांनी गुन्हा दाखल केला होता. तर तत्कालीन सहायक पोलीस उपनिरीक्षक राजकुमार उपाध्याय हे या अपघात प्रकरणाचे तपास अधिकारी होते. त्यांनी विमा कंपनीचे पैसे उकळण्यासाठी कट रचला. न्यायालयातील लिपिक विजय सहदेव गायकवाड, श्रीकृष्ण अजाबराव थोरात आणि अभिजीत विनोद दुरुतकर यांना कटात सहभागी केले. विमा कंपनीकडून मिळणारी रक्कम समसमान वाटून घेण्याचे चौघांमध्ये ठरले. त्यासाठी त्यांनी बनावट वाहन, तोतया आरोपी आणि बनावट साक्षीदार तयार केला. पोलीस कर्मचारी राजकुमार उपाध्याय यांनी बनावट कथानक रचून अपघाताचे आरोपपत्र तयार केले. साक्षीदार प्रितम लाभसेटवार यांचा जबाब घेतला. आरोपपत्र पाठविल्यानंतर अपघातात मृत्यू पावलेल्या कुटुंबियांना पैसे मिळविण्यासाठी कट रचला.

सीआयडीच्या पोलीस निरीक्षक विजया अलोणे (अकोला) यांच्याकडे या प्रकरणाचा तपास होता. त्यांनी या प्रकरणातील साक्षिदार, पंच आणि घटनास्थळाची पाहणी केली. पोलीस उपनिरीक्षक राजकुमार उपाध्याय याने बनावट अपघाताचे चित्रण केल्याचे लक्षात आले. त्यामुळे गुरुवारी लकडगंज पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली.

# बोलीभाषा टिकविणे प्रत्येकाची जबाबदारी : सरिता गाखरे

■ **महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. ४ :**

अलीकडे बोलीभाषा लुप्त होत चालली आहे. प्रत्येक समाजनिहाय त्यांची वेगळी भाषा आहे. ती भाषा टिकविण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. ज्येष्ठ नागरिकांनी बोली भाषेतून संवाद साधणे आवश्यक आहे. तेव्हाच ही भाषा तग धरून राहील, असे मत वर्धा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सरिता गाखरे यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय भोयर, पवार महासंघाच्या काटोल शाखेतर्फे रविवारी (दि. २९) राजा भोज बालसंस्कार भवनात आयोजित गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्तांचा सत्कार आणि समाजाचा स्नेहमिलन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती चरणसिंग ठाकूर यांच्याहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी छिंदवाडा (म. प्र.) येथील हॉर्टिकल्चर कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. विजय पराडकर होते. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर देशमुख,



भोयर, पवार समाजाचा स्नेहमिलन सोहळा

कारंजा नगरपंचायतचे उपाध्यक्ष भगवान बोवाडे, नामदेव बारंगे, हभप लिलाधर चोपडे, विजय डोंगरे, भगवान बन्नगरे, महासंघाच्या काटोल शाखेचे अध्यक्ष प्रा. वसंत खवसे, व्यावसायिक श्रावण खवसे, ग्रामगीताचार्य पिंगला देशमुख, स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. जयश्री चौधरी, कृषितज्ज्ञ विजय डोंगरे, कांचन रमधम यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना गाखरे यांनी, व्यस्ततेतून समाजासाठी प्रत्येकांनी वेळ देण्याचे आवाहन करीत समाज म्हणून नव्हे तर कुटुंब म्हणून विकासाची वाटचाल करावी, असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक कार्याध्यक्ष मनोहर पठाडे यांनी केले.

उद्घाटक चरणसिंग ठाकूर यांनी समाजाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करीत सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन याप्रसंगी दिले. याप्रसंगी काटोल शाखेचे अध्यक्ष प्रा. वसंत खवसे यांच्यासह मान्यवरांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक दिलीप गाखरे, सेवानिवृत्त ग्रामसेवक गुरुदेव किनकर, मुख्यमंत्री माझी शाळा सुदंर शाळा अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आजनगाव जि.प.शाळेचे मुख्याध्यापक मनोहर पठाडे, भोरगड येथील गजानन हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेंद्र काटोले, उमरी येथील जि.प.शाळेतील नवोपक्रमशील शिक्षक चित्तेश्वर ढोले, देवग्राम येथील जीवनविकास विद्यालयाचे नवोपक्रमशील शिक्षक मदन ढोले यांच्यासह प्रगतीशील शेतकरी अनिल काटोले, ग्रामसेवक चंद्रकांत चोपडे तसेच गुणवंत विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचाही सत्कार करण्यात आला.

आयोजनासाठी सल्लागार प्रा. शेषराव बारंगे, सचिव डॉ. विलास फरकाडे, कोषाध्यक्ष अरुण मुन्ने, सहसचिव अर्जुन कडवे, ईश्वर घागरे, वासुदेव चोपडे, विजय डोंगरे, जगदीश खवसे, दिलीप गाखरे, प्रा. नरेंद्र कटरे, चिंतेश्वर ढोले, डॉ. नीलेश ढोबाळे, राकेश कासलीकर, मनीष कामडी तसेच महिला मंडळ आणि सल्लागार सदस्यांनी सहकार्य केले.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. पराडकर यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाची वेळ वाढविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. गावातील विद्यार्थ्यांना पुढे येण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा निर्माण होणे आणि त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. त्यासाठी उत्कृष्ट विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा सत्कार करा. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी घरातील वातावरण तसे तयार करा असे आवाहन करीत दुसऱ्या समाजातील प्रगती बघण्यापेक्षा स्वतःच्या समाजातील आदर्श असलेले व्यक्ती डोळ्यासमोर ठेवण्याचा मौलिक सल्लाही त्यांनी दिला.

अखिल भारतीय भोयर, पवार महासंघाच्या काटोल शाखेतर्फे आयोजित सोहळ्यात नवराष्ट्र - नवभारतचे वृत्तसंपादक प्रा. डॉ. गणेश खवसे यांना समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. समाजाप्रती बांधिलकी, शिक्षणक्षेत्रातील योगदान यासह क्षेत्रातील घेतलेल्या भरारीबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.